|| श्री ||

९ ध्यानदीप:

-श्री भारतीतीर्थांनीं मागच्या प्रकरणाच्या शेवटच्या श्लोकांत 'जो सतत ब्रह्मचिंतन करितो तो मुक्त होतो' असें सांगितलें. पण अनेक प्रतिबंधामुळें सर्वांसच तें करितां येत नाहीं. कांहीं असेंहि लोक आढळतात कीं ज्यांना श्रवणादि साधनांची जरी रुचि असली व ते जरी त्याविषयीं प्रत्यन करीत असले तरी त्यांचें चित्त अनेक मालांनीं भरलेलें असल्यामुळें स्थिर होत नाहीं. हा सर्व सत्य प्रकार ध्यानांत आणून दयालु ग्रंथकार या नवम प्रकरणांत मोक्षरूप फल देणाऱ्या तत्त्वसाक्षात्काराच्या अत्यंत उपयोगी अशी उपासना करण्याविषयीं उपदेश करणार आहेत. पण त्याकरितां अगोदर ब्रह्मतत्त्वाच्या उपासनेनेंहि मोक्ष होतो अशी प्रतिज्ञा करितात-

संवादिभ्रमवद्ब्रह्मतत्त्वोपास्त्याऽपि मुच्यते ।
उत्तरे तापनीयेऽत: श्रुतोपास्तिरनेकधा ॥१॥

अन्वयार्थ - [संवादिभ्रमवत् ब्रह्मतत्त्वोपास्त्या अपि मुच्यते] संवादि भ्रमाप्रमाणें ब्रह्मतत्त्वाच्या उपासनेनेंहि साधक मुक्त होतो. [अत: उत्तरे तापनीये उपास्ति: अनेकधा श्रुता] आणि एवढ्याकरितांच उत्तरतापनीयोपनिषदांत उपासना अनेक प्रकारें सांगितलेलीं आहे.

प्रकाश:- ज्याप्रमाणें संवादिभ्रमामुळें प्रवृत्त झालेल्या पुरुषास इष्ट पदार्थ प्राप्त होतो, त्याप्रमाणें ब्रह्माच्या उपासनेनेंहि मोक्ष मिळतो. याविषयीं प्रमाण काय म्हणून कोणी विचारील तर सांगतों. अथर्ववेदाचें पूर्वोत्तरतापनीयसंज्ञक उपनिषद् आहे. त्यांत व विशेषत: उत्तरतापनीयांत ही उपासना अनेक प्रकारें सांगितलेली आहे. अर्थात् ती श्रुतिप्रोक्त असल्यामुळें कोणाहि आस्तिक वैदिकास ग्राह्य होय. ॥१॥

-पहिल्या श्लोकांत 'संवादिभ्रमाप्रमाणें' असें म्हटलें आहे. पण संवादी भ्रम म्हणजे काय हें सांगण्याकरितां श्रीसुरेश्वराचार्यांचें प्रस्तुत भ्रमांचें प्रतिपादक वार्तिक येथें घेतात -

मणिप्रदीपप्रभयोर्मणिबुध्याऽभिधावतो:
मिथ्याज्ञानाविशेषेऽपि विशेषोऽर्थक्रियां प्रति ॥२॥

अन्वयार्थ - [मणिप्रदीपप्रभयो: मणिबुद्ध्या-भिधावतो: मिथ्याज्ञानाविशेषे अपि] मण्याची प्रभा व दीपाची प्रभा याच्याकडे हा मणि आहे असें समजून धांवणाऱ्या दोघांचेंहि मिथ्याज्ञान जरी सारखेंच असलें तरी [अर्थक्रियां प्रति विशेष: अस्ति] अर्थक्रियेमध्यें (सफल प्रवृत्तींत) भेद असतो.

प्रकाश:- एकाने दुरून एका रत्नाची प्रभा पाहिली व दुसऱ्यानें दिव्याची पाहिली. आणि दोघांनाहि हा मणी आहे असें वाटून ते तिकडे मोठ्या आशेनें धांवूं लागले. नुसत्या प्रभेलाच मणी मानल्यामुळें त्या दोघांचेंहि ज्ञान जरी भ्रामक होतें तरी त्यांस त्या भ्रामक ज्ञानामुळेंच फल निरनिराळें मिळालें. म्हणजे जो मण्याच्या प्रभेला मणी समजून तिकडे गेला त्यास खरोखरींच मणी मिळाला व त्यामुळें अत्यानद झाला. पण ज्यानें दिव्याच्या प्रभेला मणी समजून तिकडे धांव मारिली होती त्याला नुस्त्या भ्रमांचा व निराशा झाल्यामुळें दु:खाचा लाभ झाला. ॥२॥

-पुढील तीन श्लोकांत या वार्तिकाचें स्पष्टीकरण करितात -

दीपोऽपवरकस्यांतर्वर्तते तत्प्रभा बहि: ।
दृश्यते द्वार्यथान्यत्र तद्वद्दृष्टा मणे: प्रभा ॥३

अन्वयार्थ - [दीप: अपवरकस्य अंतर् वर्तते-] एखाद्या मंदिराच्या खिडकींत दिवा ठेवलेला असतो. [च तत्प्रभा बहि: द्वारि दृश्यते-] व त्याची रत्नासारखी वर्तुलाकार प्रभा बाहेरच्या द्वारांत दिसते. [अथ अन्यत्र तद्वत् मणे: प्रभा दृष्टा-] तसाच दुसऱ्या एका गृहांतील खिडकींत मणि आहे व त्याचीहि दिव्याच्या प्रभेप्रमाणेंच रत्नाकार प्रभा दिसली.

दूरे प्रभाद्वयं दृष्ट्वा मणिबुद्ध्याऽभिधावतो: ।
प्रभायां मणिबुद्धिस्तु मिथ्याज्ञानं द्वयोरपि ।।४

अन्वयार्थ - [दूर प्रभाद्वयं दृष्ट्वा-] दूर दोन प्रभा पाहून [मणिबुद्ध्या अभिधावतो: द्वयो: अपि-] तो मणि आहे, अशा बुद्धीनें धांवणाऱ्या दोघांचेंहि [प्रभायां मणिबुद्धि: तु मिथ्याज्ञानं एव-] प्रभेच्या ठिकाणीं मणिबुद्धि करणें हें मिथ्याज्ञानच होय.

न लभ्यते मणिर्दीपप्रभां प्रत्यभिधावता ।
प्रभायां धावताऽवश्यं लभ्येतैव मणिर्मणे: ।।५

अन्वयार्थ - [दीपप्रभां प्रति अभिधावता पुरूषेण मणि: न लभ्यते-] दीपप्रभेकडे धांवणाऱ्या पुरुषाला रत्नाची प्राप्ति होत नाहीं [मणे: प्रभायां अभिधावता तु मणि: अवश्यं लभ्येत एव-] पण मण्याच्या प्रभेकडे धांवणारास रत्न अवश्य मिळतें.

प्रकाश:- याविषयीं अशी कल्पना करावी कीं, एखाद्या राजमंदिरांत कोनाड्यामध्यें दिवा ठेवलेला आहे व त्याच्या भिंतीस बाहेरून लहानसें छिद्र आहे. दुरून पहाणारास त्यांतून प्रभा दिसते. पंडित अच्युतरायांनीं "किड्यांचा उपद्रव कमी व्हावा म्हणून राजाच्या किंवा श्रीमंताच्या घरीं जाळीदार कंदिल लावून उघड्या जागेंत ठेवितात व त्याच्या जाळींतून वर्तुळ प्रभा बाहेर पडते. हें श्रीमंतांच्या घरीं जाणाऱ्यायेणाऱ्यांस माहित आहेच." असें म्हटलें आहे. प्रस्तुत ग्रंथकारांच्या वेळीं आपला देश राजकीय ऐश्वर्याचा उपभोग घेत असल्यामुळें त्यांचा हा उल्लेख अगदीं बरोबर आहे. पण सांप्रतकालीं महाराष्ट्राच्या दुर्दैवामुळें तसा प्रकार नाहीं. व त्यामुळें अशा प्रकारचा कंदील पुष्कळांस पाहावयास मिळण्याचीहि मारामार आहे. असो; अशा प्रकारची प्रभा पाहून कोणी रत्नाकरितां हपापलेला मनुष्य 'हें रत्न आहे; सहज सांपडण्यासारखें असल्यास पाहूं या.' असें म्हणून तिकडे पळत सुटतो. तसाच दुसरा एक दुसऱ्या कोठें पडलेल्या रत्नाचीं वर्तुळ प्रभा पाहून रत्नाच्या आशेनें तिकडे धांवतो. रत्नाची प्रभाहि दिव्याप्रमाणेंच चोहोंकडे पसरत असल्यामुळें वेलींनीं किंवा पानांनीं आच्छादित अशा एकाद्या वृक्षाच्या तळीं तें पडलेलें असून, सर्व बाजूंनी आच्छादित झालेलें आहे, व एकीकडूनच त्याची वर्तुळ प्रभा पडत आहे अशी कल्पना करावी. हे दोघेहि लोभी वर्तुळाकार प्रभेलाच रत्न समजल्यामुळें मिथ्याज्ञानवान् आहेत; हें उघड आहे. पण जो दिव्याच्या प्रभेस रत्न समजतो त्याचे श्रम व्यर्थ होतात व जो रत्नाच्या प्रभेस रत्न समजतो त्याचे श्रम सफल होतात. ॥३,४,५॥

-ह्याप्रमाणे वार्तिकाचा अर्थ सांगून आतां त्यांतील ससंवादी भ्रम कोणता व विसंवादी कोणता हें सांगतात-

दीप्रभामणिभ्रांतिर्विसंवादिभ्रम. स्मृत ।
मणिप्रभामणिभ्रांति: संवादिभ्रम उच्यते ।।६

अन्वयार्थ - [दीप्रभामणिभ्रांति: विसंवादिभ्रम: स्मृत:-] दिव्याच्या प्रभेमध्यें जी मण्याची भ्रांति तो विसंवादी भ्रम होय [तथा मणिप्रभामणिभ्रांति: संवादिभ्रम: उच्यते-] व रत्नाच्या प्रभेमध्यें जी मण्याची भ्रांति तो संवादी भ्रम आहे, असें म्हणतात

प्रकाश·- ज्या भ्रांतीमुळें केवळ श्रमाचाच लाभ होतो ती विसंवादी भ्राति व जिच्यामुळें इष्ट पदार्थांची

प्राप्ति होते ती ससंवादि भ्रांति होय. ॥६॥

-ह्याप्रमाणें प्रत्यक्षविषयांतील भ्रम दाखवून अनुमानविषयांतील संवादी भ्रम दाखवितात-

बाष्पं धूमतया बुद्ध्वा तत्रांगारानुमानत: ।
वन्हिर्यदृच्छया लब्ध: स संवादिभ्रमो मत: ॥७

अन्वयार्थ - [बाष्पं धूमतया बुद्ध्वा-] **बाष्पाला धूर मानून [तत्र अंगारानुमानत: प्रवृत्तेन-] त्या ठिकाणीं अग्नीचें अनुमान करून प्रवृत्त झालेल्या पुरुषाला [यदृच्छया वन्हि: लब्ध:-] जर दैववशात् अग्नि सांपडला तर [स: संवादिभ्रम: मत:-] तो संवादी भ्रम होय, असें मानलेलें आहे.**

प्रकाश:- विशेषत: थंडीच्या दिवसांत सकाळीं तळ्यांतून निघणारी वाफ पाहून एकाद्यास तो धूरच आहे असें वाटण्याचा व त्यावरून अग्नीचें अनुमान होण्याचा पुष्कळ संभव असतो. आणि असें अनुमान झाल्यामुळें तिकडे अग्नीच्या आशेनें किंवा 'आग लागली आहे' अशा भीतीनें तो गेल्यास जर त्याला दैववशात् अग्नि दिसला तर या धुराविषयींच्या भ्रमास संवादिभ्रम म्हणतात. हें संवादी अनुमानाचें उदाहरण होय. ॥७॥

- आगमविषयक भ्रम दाखवितात-

गोदावर्युदकं गंगोदकं मत्वा विशुद्धये ।
संप्रोक्ष्य शुद्धिमाप्नोति स संवादिभ्रमो मत: ॥८

अन्वयार्थ - [गोदावर्युदकं गंगोदकं मत्वा-] **गोदावरीचें उदक गंगोदक आहे असें मानून [विशुद्धये संप्रोक्ष्य-] शुद्धीकरितां त्यानें प्रोक्षण करून [शुद्धिं आप्नोति-] शुद्धीला प्राप्त होतो. [स: संवादिभ्रम: मत:-] तो संवादिभ्रम होय.**

प्रकाश:- संवादि आगमभ्रमाचें हें उदाहरण आहे. पुराणांतील वर्णन ऐकून त्यावरून गोदावरीचें उदक गंगोदकच आहे, असा निश्चय करणें हा वस्तुत: भ्रम आहे. पण शरीराची शुद्धि होणें हें कार्य केवल भावनेनेंहि होतें असा सर्व धार्मिकांचा अनुभव आहे तस्मात् हा जरी भ्रम असला तरी तो विसंवादी नसून संवादी आहे; असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ॥८॥

-आगमजन्य संवादिभ्रमाचें आणखी एक उदाहरण देतात -

ज्वरेणाप्त: सन्निपातं भ्रांत्या नारायणं स्मरन् ।
मृत: स्वर्गमवाप्नोति स संवादिभ्रमो मत: ॥९

अन्वयार्थ - [ज्वरेण संनिपातं आप्त:-] **ज्वराच्या योगानें ज्यास त्रिदोष झाला आहे, [अत: एव भ्रांत्या नारायणं स्मरन् मृत:-] त्यामुळेंच भ्रमानें नारायणाचें स्मरण करून जो मरण पावला आहे, तो [स्वर्गं अवाप्नोति-] स्वर्गास प्राप्त होतो. [स: संवादिभ्रम: मत:-] हा संवादी भ्रम मानिलेला आहे.**

प्रकाश:- ज्वरामुळें ज्याला संनिपात झाला आहे व त्यामुळें भ्रांतीनेंच 'नारायण, नारायण' असें म्हणत त्यानें प्राण सोडला आहे तो स्वर्गास जातो. याविषयीं पुराणांत अनेक कथा आहेत. आधुनिकांना त्या आज फारशा पटण्यासारख्या नाहींत हें खरें. पण ज्यांना आगमप्रमाण मान्य आहे, अशा श्रद्धाळु पुरुषाकरितांच या भ्रमाचा येथे उल्लेख केला आहे असें समजावें. सारांश 'नारायण' शब्द अंतकालीं भ्रमानें जरी मुखांतून निघाला तरी त्याचें फल मिळत असल्यामुळें तो भ्रमहि संवादी होय. ॥९॥

-अशा या त्रिविध संवादिभ्रमाच्या उदाहरणानें सिद्ध झालेला अर्थ सांगतात-

प्रत्यक्षस्यानुमानस्य तथा शास्त्रस्य गोचरे ।
उक्तन्यायेन संवादि भ्रमा: सन्ति हि कोटिश: ॥१०

अन्वयार्थ - [उक्तन्यायेन प्रत्यक्षस्य अनुमानस्य तथा शास्त्रस्य गोचरे-] **पूर्वोक्तन्यायानें प्रत्यक्ष, अनुमान व तसेंच शास्त्र यांच्या विषयांत [संवादिभ्रमा: कोटिश: सन्ति हि-] संवादिभ्रम**

कोट्यवधि आहेत हें प्रसिद्ध आहे.

प्रकाश:- प्रत्यक्षादि तिन्ही संवादी भ्रमांचीं उदाहरणें वर दिलीं आहेत व त्याचप्रमाणें आणखीं असंख्य उदाहरणें मिळण्यासारखीं आहेत. ॥१०॥

-आतां यांना जर संवादी भ्रम न मानलें तर त्यांची उपपत्तिच लागत नाहीं, असें दाखवून उक्तार्थ दृढ करितात -

अन्यथा मृत्तिकादारुशिला: स्युर्देवता: कथम् ।
अग्नित्वादिधियोपास्या: कथं वा योषिदादय: ॥११

अन्वयार्थ - [अन्यथा मृत्तिका-दारु-शिला: देवता: कथं स्यु:-] असें जर न मानलें तर माती, लांकुड व पाषाण देव कसे होतील [योषिदादय: वा अग्नित्वादिधिया कथं उपास्या: स्यु:-] किंवा स्त्री-पुरुषादिक अग्नित्वबुद्धीनें उपासना करण्यास योग्य कसे होतील ?

प्रकाश:- पूर्वोक्त आगमादिजन्य भ्रमास संवादी जर न मानलें तर मृत्तिकेची, लांकडी किंवा दगडी मूर्ति देवता कशी होईल ? व तिच्या उपासनेनें चित्तशुद्धीसारखीं परम फलें जीं मिळतात त्यांची उपपत्ति कशी लागेल ? पार्थिवलिंग, गणपति, इत्यादि मृण्मय देवतांचे अनेक उपासक कृतकृत्य झाल्याचें दिसतें. कृष्णातीरीं श्रीकृष्णाबाईची लांकडी मूर्ति बसवून माघमासीं सर्वत्र उत्सव होत असतात व त्या मूर्तीवर श्रद्धा ठेवणारे अनेक भक्त शमदमादिसंपन्न झालेले आढळतात. प्रसिद्ध विठ्ठलमूर्ति पाषाणाची असूनहि ज्ञानदेव, तुकाराम इत्यादि तिचे भक्त सर्व महाराष्ट्राचा उद्धार करून निजधामास गेले, हें आबालवृद्धांस ठाऊक आहे. तसेंच छान्दोग्यामध्यें "हे गौतमा, स्त्री हाच अग्नि आहे, व त्यामुळें ब्रह्मलोकांची प्राप्ति होते असेंहि स्पष्टपणे म्हटलें आहे. अर्थात् भावनेमुळें निव्वळ भ्रमहि संवादी भ्रम होतो हें निर्विवाद होय. ॥११॥

-येथवर उपपादन केलेल्या संवादी भ्रमाचा अर्थ थोडक्यांत सांगतात -

अयथावस्तुविज्ञानात्फलं लभ्यत ईप्सितम् ।
काकतालीयत: सोऽयं संवादिभ्रम उच्यते ॥१२

अन्वयार्थ - [यस्मात् अयथावस्तुविज्ञानात् ईप्सितं फलं काकतालीयत: लभ्यते-] ज्या विपरीत ज्ञानापासून इष्ट फल दैववशात् मिळतें [स: अयं संवादिभ्रम: उच्यते-] तो हा संवादी भ्रम होय, असें म्हटलें जातें.

प्रकाश:- या सर्व प्रतिपादनाचें तात्पर्य असें कीं शास्त्रविहित किंवा अविहित अशा ज्या विपरीत भावनेच्या योगानेंहि काकतालीयन्यायानें इष्ट फल मिळतें त्यास संवादी भ्रम म्हणतात. अर्थात् ज्या भ्रमाच्या योगानें इष्ट फल मिळत नाहीं तो विसंवादी भ्रम होय. काकतालीयन्याय म्हणजे कावळा बसावयास व डहाळी मोडावयास एक गांठ पडणें. ॥१२॥

-'अहोपण, खोट्या ब्रह्मोपासनेपासून सम्यग्ज्ञानानेंच प्राप्त होणारें मुक्ति हें फल कसें मिळेल ?' उत्तर-

स्वयं भ्रमोऽपि संवादी यथा सम्यक्फलप्रद: ।
ब्रह्मतत्त्वोपासनाऽपि तथा मुक्तिफलप्रदा ॥१३

अन्वयार्थ - [संवादी स्वयं भ्रम: अपि यथा सम्यक् फलप्रद:-] संवादी भ्रम स्वत: भ्रम असूनहि जसा यथार्थ फल देतो, [तथा ब्रह्मतत्त्वोपासना अपि मुक्तिफलप्रदा भवति-] त्याप्रमाणें ब्रह्मतत्त्वाची उपासनाहि मुक्तिरूप फल देते.

प्रकाश:- या प्रकरणाच्या प्रथम श्लोकांत ब्रह्मतत्त्वोपासनेला संवादी भ्रमाचा दृष्टांत दिला होता, हें वाचकांच्या ध्यानांत असेलच. त्या दृष्टांताचें एवढा वेळ विवेचन करून तोच न्याय ब्रह्मतत्त्वोपासनेस कसा लागू पडतो, तें येथें सांगितलें आहे. संवादी भ्रम जरी स्वत: भ्रम असला तरी तो इष्ट फल जसें देऊं शकतो, त्याचप्रमाणें ब्रह्मतत्त्वाची उपासनाहि जरी भ्रमरूप

असली तरी ती इष्ट फल जी मुक्ति तिला देऊं शकते. **शंका**:- पण असें जर म्हटलें तर 'ज्ञानावांचून मुक्ति नाहीं' या श्रुतिवचनाचा बाध नाहीं का होणार ? **समाधान**:- श्रुतिवचनाचा बाध होईल असें कोणतेंहि विधान आम्ही करीत नसतों. संवादी भ्रमांत मण्याच्या प्रभेस मणी समजूत तो त्याच्याकडे धांवतो तो त्या भ्रमामुळें मण्याजवळ जाऊन पोंचतो; व 'अरे मी ज्याला मणी समजलों होतों तो मणी नव्हे' असें त्यास समजतें. पण- ही मण्याप्रमाणें दिसणारी प्रभा कशाची आहे तें पहावें-असें त्यास सहजच वाटतें व त्यामुळें शेवटीं मणी मिळतो. त्याप्रमाणेंच ब्रह्मतत्त्वाच्या उपासनेमुळें साधक जितेंद्रियत्वादि गुणसंपन्न होऊन पूर्णपणें अंतर्मुख होतो; व भृगुपुत्र वारुणीप्रमाणें किंवा इंद्राप्रमाणें विचार केल्यावर त्यास आत्मसाक्षात्कार होतो. सारांश संवादी भ्रम व ब्रह्मतत्त्वोपासना यांच्यामध्यें सर्वप्रकारें साम्य आहे. ॥१३॥

-अहोपण, ब्रह्मतत्त्वाला जाणून त्याची उपासना केली जाते कीं न जाणतांच ? जाणून उपासना केली जात असेल तर ती व्यर्थ आहे. कारण मोक्षांचे साधन जें ज्ञान तें तर विद्यमानच असतें. बरें न जाणतां उपासना केली जात असेल तर तिच्या विषयांचे ज्ञान असल्यावांचून उपासनाच संभवत नाहीं.' अशी शंका घेऊन सांगतात-

वेदान्तेभ्यो ब्रह्मतत्त्वखंडैकरसात्मकम् ।
परोक्षमवगम्यैतदहमस्मीत्युपासते ॥१४

अन्वयार्थ - [वेदान्तेभ्य: अखंडैकारसात्मकं ब्रह्मतत्त्वं परोक्षं अवगम्य-] वेदान्त वाक्यांच्या योगानें अखंड एकरसरूप ब्रह्मतत्त्वास परोक्ष जाणून [एतत् अहं अस्मि इति उपासते-] 'तें मी आहें' अशी उपासना करितात.

प्रकाश:- वेदान्तवाक्याचें श्रद्धापूर्वक श्रवण केल्यानें ब्रह्मतत्त्वाचें परोक्षज्ञान होतें. म्हणजे तें अविच्छिन्न एकरसरूप आहे असें नुसतें समजतें. पण त्या निश्चयपूर्वक समजलेल्या स्वरूपाचा साक्षात्कार झालेला नसतो. यास्तव त्याच्या साक्षात्कारार्थ 'तें ब्रह्मच मी आहें' अशी भावना करून साधक उपासना करितो. ॥१४॥

-उपास्य ब्रह्मतत्त्वाच्या परोक्षज्ञानाचें स्वरूप --

प्रत्यग्व्यक्तिमनुल्लिख्य शास्त्राद्विष्ण्वादिमूर्तिवत् ।
अस्ति ब्रह्मेति सामान्यज्ञानमत्र परोक्षधी: ॥१५

अन्वयार्थ - [प्रत्यग्व्यक्तिं अनुल्लिख्य-] साक्षी आत्म्यास विषय न करितां [शास्त्रात् 'ब्रह्म अस्ति' इति विष्ण्वादिमूर्तिवत् सामान्यज्ञानं-] शास्त्रावरून 'ब्रह्म आहे' असें विष्णु, शिव इत्यादिकांच्या मूर्तींप्रमाणें जें सामान्य ज्ञान होतें, तेंच [अत्र परोक्षधी: विवक्षिता--] येथें 'परोक्ष ज्ञान' म्हणून विवक्षित आहे.

प्रकाश:- भगवान् विष्णु, चतुर्भुज, शंकचक्रगदांधारी, शेषयायी इत्यादि प्रकारचा आहे असें शास्त्रावरून जरी ज्ञान झालें तरी ती ती मूर्ति प्रत्यक्ष दिसत नाहीं. तसेंच शास्त्रावरून 'ब्रह्म आहे' असा निश्चय होणें हेंच परोक्ष ज्ञान होय. या ज्ञानामध्यें वस्तूचा साक्षात्कार होत नसल्यामुळें त्यास परोक्ष म्हणण्याचा शास्त्रीय प्रघात आहे. ॥१५॥

-'अहो पण शास्त्रावरून विष्ण्वादि मूर्तींचा चतुर्भुजत्वादि विशेष प्रतीत होतो, मग त्या ज्ञानाला परोक्षत्व कसें ?' उत्तर -

चतुर्भुजाद्यवगतावपि मूर्तिमनुल्लिखन् ।
अक्षै: परोक्षज्ञान्येव न तदा विष्णुमीक्षते ॥१६

अन्वयार्थ - [शास्त्रात् चतुर्भुजाद्यवगतौ अपि-] शास्त्रावरून 'चतुर्भुज' इत्यादि आकाराचें ज्ञान जरी झालें तरी [मूर्तिं अनुल्लिखन् पुरुष: परोक्षज्ञानी एव-] त्यास साक्षात् न पहाणारा पुरुष परोक्ष ज्ञानीच होय. [अत: तदा अक्षै: विष्णुं न ईक्षते-] त्यामुळें ध्यानसमयीं तो नेत्रांनीं भगवान

विष्णूस प्रत्यक्ष पहात नाहीं.

-'तर मग तें भ्रमज्ञान आहे, असें म्हटलें पाहिजे. कारण त्या ज्ञानाचा विषय प्रत्यक्ष दिसत नाहीं ?' उत्तर --

परोक्षत्वापराधेन भवेन्नातत्त्ववेदनम् ।
प्रमाणेनैव शास्त्रेण सत्यमूर्तेर्विभासनात् ॥१७

अन्वयार्थ - [परोक्षत्वापराधेन अतत्त्ववेदनं न भवेत्-] परोक्षत्व या एवढ्याच दोषामुळें तें भ्रमज्ञान होत नाहीं. [इह तु प्रमाणेन एव शास्त्रेण सत्यमूर्तेः विभासनात्-] व प्रस्तुत उदाहरणांत तर प्रमाणभूत शास्त्रानेंच विष्ण्वादि सत्य मूर्तीचें ज्ञान करून दिलें आहे.

प्रकाशः- परोक्षज्ञान हें भ्रांतीचें कारण नव्हे. कारण भ्रांति व परोक्षज्ञान यांच्यामध्यें कार्यकारणभाव दिसत नाहीं. शिवाय शास्त्र हें प्रमाण आहे. तेव्हां याच्यावरून ज्याचें ज्ञान होतें तो भ्रम असें कसें म्हणतां येईल ? ॥१६।१७॥

-'अहोपण, सच्चिदानंदरूपाला विषय करणाऱ्या शास्त्रजन्य ब्रह्मतत्त्वज्ञानाला परोक्षत्व कसें ?' उत्तर -

सच्चिदानन्दरूपस्य शास्त्राद्भानेऽप्यनुल्लिखन् ।
प्रत्यञ्चं साक्षिणं तत्तु ब्रह्म साक्षान्न वीक्षते ॥१८

अन्वयार्थ - [सच्चिदानंदरूपस्य शास्त्रात् भाने अपि-] सच्चिदानंदरूप ब्रह्माचें शास्त्रावरून जरी भान झालें तरी [प्रत्यञ्चं साक्षिणं अनुल्लिखन्-] प्रत्यक् साक्षीला विषय न करणारा पुरुष [तत् ब्रह्म साक्षात् न वीक्षते-] त्या ब्रह्माला साक्षात् पहात नाहीं.

प्रकाशः- केवल ब्रह्म आहे असें जाणण्यापासून फारसा लाभ नसतो तर तें प्रत्यक् आत्माच आहे असें जाणणें हे मोक्षदायक आहे. पण ज्याला परोक्षज्ञानच झालेलें असतें त्यास ब्रह्मसाक्षात्कार होत नाहीं हें उघडच आहे. ॥१८॥

-'तर मग तशा प्रकारच्या ब्रह्मज्ञानाला तत्त्वज्ञानत्व कसें ?' उत्तर --

शास्त्रोक्तेनैव मार्गेण सच्चिदानन्दनिश्चयात् ।
परोक्षमपि तज्ज्ञानं तत्त्वज्ञानं न तु भ्रमः ॥१९

अन्वयार्थ - [तत् ज्ञानं परोक्षं अपि-] तें ज्ञान जरी परोक्ष असलें तरी [शास्त्रोक्तेन एव मार्गेण सच्चिदानन्दनिश्चयात्-] शास्त्रोक्त प्रकारानेंच ब्रह्माच्या सच्चिदानंदरूपत्वाचा निश्चय करवीत असल्यामुळें [तत्त्वज्ञान एव तु भ्रमः न-] तत्त्वज्ञानच आहे, भ्रम नव्हे.

प्रकाशः- भगवान् विष्णूच्या मूर्तीचें ज्ञान शास्त्रीय असल्यामुळें तें जसें यथार्थ होय; असें पूर्वी सांगितलें आहे, तसेंच ब्रह्म सच्चिदानंदरूप आहे हें ज्ञानहि शास्त्रीय असल्यामुळें यथार्थ होय. व त्यामुळेंच त्यास भ्रम असें म्हणता येणार नाहीं. या सर्व प्रतिपादनावरून वैदिक धर्मी मनुष्यास शास्त्रावर किती दृढ विश्वास ठेवावयास पाहिजे, हें व्यक्त होत आहे. ॥१९॥

-'अहोपण, सत्यज्ञानादि वाक्यांनीं ब्रह्माच्या सच्चिदानंदरूपत्वाप्रमाणें तत्त्वमस्यादि वाक्यांच्या योगानें त्याच्या प्रत्यगात्मरूपत्वाचेंहि ज्ञान होतें. अर्थात् शास्त्रजन्य ज्ञानहि प्रत्यगात्म्याला विषय करीत असल्यामुळें अपरोक्षच आहे,' अशी आशंका घेऊन सांगतात-

ब्रह्म यद्यपि शास्त्रेषु प्रत्यक्त्वेनैव वर्णितम् ।
महावाक्यैस्तथाऽप्येतद्दुर्बोधमविचारिणः ॥२०

अन्वयार्थ - [यद्यपि शास्त्रेषु ब्रह्म महावाक्यैः प्रत्यक्त्वेन एव वर्णितम्-] जरी शास्त्रांत ब्रह्माचें महावाक्यांच्या योगानें प्रत्यग्रूपानेंच वर्णन केलेलें आहे, [तथापि एतत् अविचारिणः दुर्बोधम्-] तरी तें अविचाऱ्यांस दुर्बोध आहे.

प्रकाशः- 'तत्त्वमसि' इत्यादि शास्त्रीय महावाक्यांच्या द्वारा ब्रह्म अंतर्यामी आत्माच आहे,

असें शतशः वर्णिलें आहे. पण तें दुर्दैवी सामान्य पुरुषांस अति दुर्बोध आहे. व त्यामुळें केवल महावाक्यांवरून अपरोक्ष साक्षात्कार होत नाहीं. सारांश 'आत्मतत्त्व दुर्ज्ञेय आहे.' असें जें पूर्वीच्या आचार्यांनीं म्हटलें आहे तें योग्यच होय. ॥२०॥

-'अहोपण, तत्त्वज्ञान प्रमाणभूत वस्तूच्या अधीन असतें. येथें 'तत्त्वमस्यादि' वाक्यरूप प्रमाणहि आहे व ब्रह्मात्मैक्यरूप वस्तुहि विद्यमान आहे. मग विचारावांचून अपरोक्ष ज्ञान दुर्बोध का ?' उत्तर -

देहाद्यात्मत्वविभ्रांतौ जाग्रत्यां न हठात्पुमान् ।
ब्रह्मात्मत्वेन विज्ञातुं क्षमते मंदधीत्वत: ॥२१

अन्वयार्थ - [देहाद्यात्मत्वविभ्रान्तौ जाग्रत्यां-] देहादि अनात्म पदार्थास आत्मा समजणें ही भ्रांति जीवंत असतांना [पुमान् मंदधीत्वत:-] पुरुष मंदबुद्धित्वामुळें [हठात् ब्रह्म आत्मत्वेन विज्ञातुं न क्षमते-] बलात्कारानेंच 'ब्रह्म आत्मा आहे' असें जाणण्यास समर्थ होत नाहीं.

प्रकाश:- देहादिकांस आत्मा समजणें हा भ्रम आहे व त्याची निवृत्ति केवल विचारानेंच होणें शक्य आहे. यास्तव इतर कितीहि सामग्री जरी तयार असली तरी विचारावांचून 'ब्रह्म आत्मा आहे' असें ज्ञान होत नाहीं ॥२१॥

-'तर मग देहेंद्रियादिविषयक द्वैतभ्रम विद्यमान असल्यामुळें अद्वैत ब्रह्मविषयक परोक्षज्ञानहि होणार नाहीं' अशी आशंका घेऊन 'अपरोक्ष द्वैतभ्रम परोक्ष अद्वैत ज्ञानाच्या विरोधी नसल्यामुळें श्रद्धावान् पुरुषाला शास्त्रावरून परोक्षज्ञान होऊं शकतें' असें सांगतात-

ब्रह्ममात्रं सुविज्ञेयं श्रद्धालोः शास्त्रदर्शिन: ।
अपरोक्षद्वैतबुद्धि: परोक्षाद्वैतबुद्ध्यनुत् ॥२२

अन्वयार्थ - [यत: अपरोक्षद्वैतबुद्धि: परोक्षाद्वैत-बुद्ध्यनुत्-] ज्या अर्थीं अपरोक्ष द्वैतबुद्धि परोक्ष अद्वैतबुद्धीचा नाश करूं शकत नाहीं, [अत:श्रद्धालो: शास्त्रदर्शिन: ब्रह्ममात्रं सुविज्ञेयं-] त्याअर्थी श्रद्धालु शास्त्रदर्शी पुरुषाला केवल ब्रह्म सहज समजण्या-सारखें आहे.

प्रकाश:- प्राण्यास द्वैतसाक्षात्कार जरी होत असला तरी तो परोक्ष अद्वैत ज्ञानाशीं विरोध करीत नाहीं. कारण एकाच वस्तुविषयींचीं दोन भिन्न ज्ञानें एकाच वेळीं अंत:करणांत राहूं शकत नाहींत; असा नियम आहे. व त्यामुळें एकाच कालीं अंत:करणांत द्वैताचें किंवा अद्वैताचें परोक्ष व अपरोक्ष ज्ञान राहणें असंभवनीय आहे. पण द्वैताचें अपरोक्ष व अद्वैताचें परोक्ष अशीं भिन्न विषयक ज्ञानें राहण्यास कांहीं हरकत नाहीं. पूर्वोक्त 'तूंच दहावा आहेस' या दृष्टांतांतील आपल्या सोबत्यास मोजणाऱ्या दहाव्या मनुष्यास नऊ जणांचें जेव्हां साक्षात् ज्ञान होतें, तेव्हांच "दहावा मेला नाहीं, तो जीवंत आहे" या आप्तवाक्यावरून होणारें परोक्षज्ञान झालें आहे. सारांश द्वैताचें अपरोक्षज्ञान व अद्वैताचें परोक्षज्ञान यांच्यामध्यें तिळभरहि विरोध नसल्यामुळें श्रद्धेनें शास्त्रावलोकन करणाऱ्या पुरुषास द्वैतानुभवकालींच ब्रह्माचें परोक्षज्ञान होणें शक्य आहे. ॥२२॥

-अपरोक्ष भ्रम परोक्ष तत्त्वज्ञानाच्या विरोधी नाहीं, याविषयीं दृष्टान्त -

अपरोक्षशिलाबुद्धिर्न परोक्षेशतां नुदेत् ।
प्रतिमादिषु विष्णुत्वे को वा विप्रतिपद्यते ॥२३

अन्वयार्थ - [अपरोक्षशिलाबुद्धि: परोक्षेशतां न नुदेत्-] शालग्राम, बाण इत्यादि प्रतिमांच्या ठिकाणची साक्षात् शिलाबुद्धि परोक्ष ईश्वरतेला घालवीत नाहीं. [प्रतिमादिषु विष्णुत्वे क: वा विप्रतिपद्यते-] कारण प्रतिमादिकांतील विष्णुत्वा-विषयीं कोण विवाद करणार आहे ? कोणी नाहीं.

प्रकाश:- श्रीभारतीतीर्थांनीं ज्यावेळीं हा श्लोक लिहिला त्यावेळीं पुढें कांहीं शतकांनीं आपला हा देश नास्तिकांचें आगर होणार आहे, व मूर्तिपूजादिक वैदिक आचारांचीं भरचवाठ्यावर नि:शंकपणें निंदा होणार

आहे, हें त्यांच्या ध्यानीं मनीं तरी आलें असेल कीं नाहीं याची शंका आहे. असो; येथील उल्लेख केवल श्रद्धाळु पुरुषांस उद्देशूनच असल्यामुळें शालिग्रामादि शिला आहेत असें जरी स्पष्टपणें भासत असलें; तरी शास्त्रांवरून सिद्ध होणारें त्यांतील देवत्व नष्ट होत नाहीं असें जें म्हटलें आहे, तें युक्तच आहे. सारांश श्रद्धाळु पुरुषाच्या मनांत साक्षात् शिलबुद्धि व परोक्ष विष्णुबुद्धि राहूं शकते. ॥२३॥

-'कांहीं नास्तिक परोक्ष विष्णुबुद्धीविषयीं वाद करीत असतात !' उत्तर --

अश्रद्धालोरविश्वासो नोदाहरणमर्हति ।
श्रद्धालोरेव सर्वत्र वैदिकेष्वधिकारत: ॥२४

अन्वयार्थ - [सर्वत्र वैदिकेषु श्रद्धालो: एव अधिकारत:-] **सर्व वैदिक अनुष्ठानांमध्यें श्रद्धावान् पुरुषाचाच अधिकार असल्यामुळें** [अश्रद्धालो: अविश्वास: उदाहरणं न अर्हति-] **अश्रद्धालु पुरुषाचा अविश्वास हें कांहीं योग्य उदाहरण नव्हे.**

प्रकाश:- ईश्वराच्या सृष्टींत 'नास्तिक' हाहि एक मनुष्यांचा प्रकार अनादिच आहे. आतां कांहीं काल त्यांचें प्राबल्य होतें व कांहीं वेळ अप्राबल्य असतें एवढेंच. कलियुगांत उत्तरोत्तर त्यांचें प्राबल्य होणार आहे असें सर्वज्ञ ऋषींनीं पूर्वींच भाकित करून ठेविलें आहे. व त्यांच्या त्या भविष्याचा आज आपणांस कांहींसा प्रत्ययहि येत आहे. अर्थात् आजच्याइतकें जरी नसले तरी श्रीभारतीतीर्थांच्या वेळींहि नास्तिक श्रुतिस्मृतिपुराणोक्त उपदेशावर आक्षेप घेणारे होते. त्यांस उद्देशून ग्रंथकार म्हणतात कीं, वैदिक अनुष्ठानामध्यें केवल श्रद्धाळु पुरुषांचाच अधिकार असल्यामुळें 'त्याविषयीं अश्रद्धाळु पुरुष वाद करीत असतात कीं नाहीं ?' असें म्हणून त्यांचें उदाहरण देणें अयुक्त आहे. कारण त्यांचा तो विषयच नसल्यामुळें त्याविषयीं चर्चा करण्याचा वस्तुत: त्यांस मुळींच अधिकार नाहीं. ॥२४॥

-यावरून सिद्ध काय झालें, तें सांगतात--

सकृदाप्तोपदेशेन परोक्षज्ञानमुद्भवेत् ।
विष्णुमूर्त्युपदेशो हि न मीमांसामपेक्षते ॥२५

अन्वयार्थ - [सकृदाप्तोपदेशेन परोक्षज्ञानं उद्भवेत्-] एकदाच आप्तवचनाचा उपदेश झाल्यानें परोक्षज्ञान उत्पन्न होतें. [हि विष्णुमूर्त्युपदेश: **मीमांसां न अपेक्षते**-] कारण विष्णुमूर्तीचा उपदेश **मीमांसेची अपेक्षा करीत नाहीं.**

प्रकाश:- चवदाव्या श्लोकापासून गेल्या चोविसाव्या श्लोकापर्यंत परोक्ष ज्ञानाविषयीं सोपपत्तिक विवेचन केलें आहे. त्यावरून आप्तवचनाचा उपदेश होतांच परोक्ष ज्ञान उत्पन्न होतें असें सिद्ध होतें. याविषयीं लौकिक अनुभवहि आहे. कसा म्हणून म्हणशील तर सांगतों- ही विष्णूची मूर्ति आहे, असा शालिग्रामास उद्देशून कोणी (माता, पिता, शास्त्र इत्यादि) आप्तानें उपदेश केला असतां, त्याविषयीं कधीं कोणी श्रद्धाळू विचार करीत बसतो का ? कधींच नाहीं. तसाच हा प्रस्तुत प्रकार होय. ॥२५॥

-'तर मग पूर्वमीमांसादि ग्रंथांमध्यें विचार केलेला जो आढळतो तो कां ?'उत्तर -

कर्मोपास्ती विचार्येते अनुष्ठेयाविनिर्णयात् ।
बहुशाखाविप्रकीर्णं निर्णेतुं क: प्रभुर्नर: ॥२६

अन्वयार्थ [अनुष्ठेयाविनिर्णयात् कर्मोपास्ती विचार्येते-] **अनुष्ठान करण्यास योग्य अशा-कर्म व उपासना - यांचा निर्णय होत नसल्यामुळें कर्म व उपासना यांविषयीं विचार केला जातो.** [बहुशाखाविप्रकीर्णं निर्णेतुं क: नर: प्रभु: अस्ति-] **कारण अनेक शाखांमध्यें सांगितलेल्या व त्यामुळें अगदीं व्यामिश्र झालेल्या कर्मादिकांचा निर्णय करण्यास कोण पुरुष समर्थ आहे ?**

प्रकाश:- अनेक शाखांतून एकच कर्म अगदीं भिन्न भिन्न प्रकारें करण्याविषयीं सांगितलेलें असतें.

अथवा प्रत्येक शाखेंत क्वचित् भिन्न भिन्न कर्मेंहि आढळतात. उपासनेचाहि तोच प्रकार आहे. त्यामुळें सामान्यबुद्धीच्या मनुष्यास त्यांच्या अनुष्ठानाचा निर्णय करितां येत नाहीं. म्हणून त्या सव संदिग्धकर्मादिकांचा निर्णय करण्याकरितां पूर्वमीमांसादि ग्रंथ प्रवृत्त झाले आहेत. ॥२६॥

-'त्यांचा निर्णय करितां येत नसल्यास अनुष्ठानच करावयास नको, असें होतें !' उत्तर --

निर्णीतोऽर्थः कल्पसूत्रैर्ग्रथितस्तावताऽऽस्तिकः ।
विचारमन्तरेणापि शक्तोऽनुष्ठातुमंजसा ॥२७

अन्वयार्थ - [निर्णीतः अर्थः कल्पसूत्रैः ग्रथितः अस्ति-] जैमिनि इत्यादि आचार्यांनीं ज्याचा मीमांसेच्या द्वारा निर्णय केला आहे तोच अनुष्ठानाचा प्रकार कल्पसूत्रांनीं ग्रथित केला आहे. म्हणजे त्याचा एके ठिकाणीं संग्रह केला आहे, [तावता आस्तिकः विचारं अन्तरेणअपि अंजसा अनुष्ठातुं शक्तः अस्ति-] त्यावरून आस्तिक विचारावांचूनहि अनुष्ठान करण्यास समर्थ होतो.

प्रकाशः- जैमिनी मुनींनीं 'अथातो धर्मजिज्ञासा' हें जिचें प्रथम सूत्र आहे अशी धर्ममीमांसा रचिली, तिचे बारा अध्याय आहेत. या विस्तृत ग्रंथामध्यें कर्मकांडमय सर्व वेदांची एकवाक्यता केलेली आहे. त्यांतील निर्णय पाहून भिन्न भिन्न शाखेचीं कल्पसूत्रें आश्वलायन, आपस्तंब, बौधायन, कात्यायन इत्यादि मुनींनीं रचिलीं. त्यांच्या योगानें कोणताहि वैदिक विधि कोणी कसा करावा हें तात्काल समजतें. साराश या सूत्रांच्या सहायानें कोणीहि आस्तिक पुरुष विशेष विचारांत न पडता सहज अनुष्ठान करूं शकतो. आणि त्यामुळें कल्पसूत्र हें एक वेदाचें अंग होऊन राहिलें आहे. ॥२७॥

-'कल्पसूत्रादि ग्रंथांमध्यें तर केवळ कर्मांचाच विचार केलेला आहे; उपासनांचा नाहीं, त्यामुळें उपासनाचे अनुष्ठान संभवत नाहीं' उत्तर --

उपास्तीनामनुष्ठानमार्षग्रंथेषु वर्णितम् ।
विचाराक्षममर्त्याश्च तच्छ्रुत्वोपासते गुरोः ॥२८

अन्वयार्थ - [उपास्तीनां अनुष्ठानं आर्षग्रंथेषु वर्णितं अस्ति-] उपासनाचें अनुष्ठान ऋषिप्रणीत ग्रंथांमध्यें वर्णिलें आहे [च विचाराक्षममर्त्याः गुरोः तत् श्रुत्वा उपासते-] व विचार करण्यास असमर्थ असलेले पुरुष गुरुमुखानें तें ऐकून उपासना करितात.

प्रकाशः- ब्रह्मदेवाचें ब्राह्मतंत्र, वसिष्ठमुनिप्रणीत वासिष्ठतंत्र इत्यादि अनेक तंत्रग्रंथांत उपासना कशी करावी इत्यादि प्रकार सांगितला आहे, व ज्याना स्वतः विचार करण्याची शक्ति नसते त्यांना योग्य गुरूंपासून त्यांचा उपदेश घेऊन उपासना करितां येते. ॥२८॥

-'तर मग आधुनिक लोक वेदवाक्यांचा विचार कां करितात ?' उत्तर --

वेदवाक्यानि निर्णेतुमिच्छन्मीमांसतां जनः ।
आप्तोपदेशमात्रेण ह्यनुष्ठानं हि संभवेत् ॥२९

अन्वयार्थ - [वेदवाक्यानि निर्णेतुं इच्छन् जनः मीमांसतां हि-] वेदवाक्यांचा निर्णय करण्याची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें मीमांसा खुशाल करावी. [आप्तोपदेशमात्रेण अनुष्ठानं संभवेत् हि-] पण केवल आप्ताच्या उपदेशावरूनच अनुष्ठान होऊं शकतें.

प्रकाशः- वेदवाक्यांचा आपण निर्णय करावा असें ज्याला वाटत असेल, त्यानें मीमांसा केल्यास आमची त्यांस ना नाहीं. आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं कोणालाहि कल्पसूत्रादि आप्तवचनांवरून अनुष्ठान करितां येतें ॥२९॥

-'मग ब्रह्मोपासनेप्रमाणें ब्रह्मसाक्षात्कारहि नुस्त्या उपदेशानेंच सिद्ध होईल ?' उत्तर --

ब्रह्मसाक्षात्कृतिस्त्वेवं विचारेण विना नृणाम् ।
आप्तोपदेशमात्रेण न संभवति कुत्रचित् ॥३०

अन्वयार्थ - [तु एवं नृणां ब्रह्मसाक्षात्कृति: विचारेण विना आप्तोपदेशमात्रेण कुत्रचित् न संभवति-] पण ह्याप्रमाणें मनुष्यांचा ब्रह्मसाक्षात्कार विचारावांचून केवल आप्ताच्या उपदेशानेंच कधींहि संभवत नाहीं.

प्रकाश: - कर्म व उपासना यांचें अनुष्ठान जसें केवल आप्ताच्या उपदेशावरून होऊं शकतें, त्याप्रमाणें ब्रह्माचा साक्षात्कार होऊं शकत नाहीं. तर त्यास विचाराचें अवश्य सहाय लागतें. ॥३०॥

-नुस्त्या आप्तोपदेशानें उपासनोपयोगी परोक्ष ज्ञान होतें, अपरोक्ष ज्ञान विचारावांचून होत नाहीं, असें जें सांगितलें त्याचें कारण सांगतात-

परोक्षज्ञानमश्रद्धा प्रतिबध्नाति नेतरत् ।
अविचारोऽपरोक्षस्य ज्ञानस्य प्रतिबंधक: ॥३१

अन्वयार्थ - [अश्रद्धा परोक्षज्ञानं प्रतिबघ्नाति न इतरत्-] अश्रद्धा परोक्षज्ञानाला प्रतिबंध करिते, अविचार नव्हे. [अपरोक्षस्य ज्ञानस्य प्रतिबंधक: अविचार: अस्ति-] पण अपरोक्ष ज्ञानाला प्रतिबंध करणारा अविचार आहे.

प्रकाश:- परोक्षज्ञानास केवल अविश्वासच हटवीत असतो. यास्तव त्याची निवृत्ति झाली कीं परोक्षज्ञानास एका आप्तवचनावांचून दुसऱ्या कशाचीहि गरज लागत नाहीं. पण अपरोक्षज्ञानास अविचार एकसारखा प्रतिबंध करीत असल्यामुळें त्याच्या निवृत्तीचा उपाय योजणें अत्यंत अवश्यक असतें. व एका विचाराच्या योगानेंच त्याची निवृत्ति होणें शक्य असल्यामुळें आत्मसाक्षात्कारास विचाराची फार गरज असते. ॥३१॥

-'अहोपण, विचार करूनहि जर अपरोक्ष ज्ञान न होईल तर काय करावें ?' उत्तर -

विचार्याप्यापरोक्ष्येण ब्रह्मात्मानं न वेत्ति चेत् ।
आपरोक्ष्यावसानत्वाद्भूयो भूयो विचारयेत् ॥३२

अन्वयार्थ - [विचार्य अपि आपरोक्ष्येण ब्रह्मात्मानं न वेत्ति चेत्-] विचार करूनहि अपरोक्षत: ब्रह्मात्म्याचें ज्ञान न झाल्यास [अपरोक्ष्यावसानत्वात् भूय: भूय: विचारयेत्-] विचाराची साक्षात्कारामध्येंच परिसमाप्ति होत असल्यामुळें पुन: पुन: विचार करावा.

प्रकाश:- वेदान्तश्रवणानंतर एकांतांत बसून विचार केल्यास, भृगुपुत्र वारुणीप्रमाणें किंवा इंद्राप्रमाणें त्याचें पर्यवसान अद्वैतात्मसाक्षात्कारामध्यें होणार हें उघडच आहे. पण ज्यांना धीर नसतो ते थोडासा विचार करून 'साक्षात्कार अजून का होत नाहीं' म्हणून व्याकुळ होऊन विचारूं लागतात. यास्तव ग्रंथकार म्हणतात कीं, विचाराची आवृत्ति करावी. आत्मा व ब्रह्म यांच्या ऐक्याचा साक्षात्कार होईतों विचारास कंटाळूं नये. ॥३२॥

'अहोपण, पुन: पुन: विचार करूनहि साक्षात्कार न झाल्यास विचार व्यर्थ होतो !' उत्तर --

विचारयन्नामरणं नैवात्मानं लभेत चेत् ।
जन्मांतरे लभेतैव प्रतिबंधक्षये सति ॥ ३३

अन्वयार्थ - [आमरणं विचारयन् एव आत्मानं न लभेत चित्-] मरणापर्यंत विचार करणाराहि आत्म्याला जर प्राप्त न होईल तर [प्रतिबंधक्षये सति जन्मान्तरे लभेत एव-] प्रतिबंधाचा क्षय झाला असतां दुसऱ्या जन्मीं त्याला आत्मलाभ होतोच.

प्रकाश:- आत्मसाक्षात्कार न होऊं देणारे अनेक प्रबळ प्रतिबंध असल्यास जन्मभर विचार करूनहि कांहीं लाभ होत नाहीं हें खरें. पण त्यामुळें केलेला विचार फुकट गेला असें कधींहि समजूं नये. कारण जें प्रतिबंध या जन्मीं साक्षात्कारास हटवीत होते, त्यांचा क्षय झाल्यावर पुढच्या जन्मीं इष्टलाभ सहज होतो. ॥३३॥

-'पण हे कशावरून अवगत होतें' अशी आशंका घेऊन ब्रह्मसूत्रकार व्यासांनीं 'ऐहिकमप्यप्रस्तुतप्रतिबन्धे

तद्दर्शनात्'- ब्र.मी.अ. ३ पा. ४ सू. ५१ - या सूत्रांत तसें सांगितलें आहे, असें सांगतात-

इह वाऽमुत्र वा विद्येत्येवं सूत्रकृतोदितम् ।
शृण्वंतोऽप्यत्र बहवो यन्न विद्युरिति श्रुतिः ॥३४

अन्वयार्थ - ['इह वा अमुत्र वा विद्या' इति सूत्रकृता उदितं अस्ति-] इहलोकीं किंवा परलोकीं विद्या प्राप्त होते असें सूत्रकारांनीं म्हटलें आहे. [च 'अत्र बहवः शृण्वंतः अपि यत् न विद्युः' इति श्रुतिः अस्ति-] व 'या जन्मीं पुष्कळ लोक श्रवण करीत असूनहि ज्यास जाणत नाहींत;' अशा अर्थाची श्रुति आहे.

प्रकाशः- शारीरक मीमांसेच्या तिसऱ्या अध्यायाच्या चवथ्या पादाचें एकावन्नावें सूत्र 'ऐहिकमप्यप्रस्तुतप्रतिबंधे तद्दर्शनात्' असें आहे. याचा अर्थः- प्रस्तुत प्रतिबंध नसल्यास या जन्मींहि विद्या उत्पन्न होते; कारण हीच गोष्ट श्रुतीनें सांगितली आहे. या सूत्रावरील भाष्यांत आचार्यांनीं श्रुति व स्मृति यांचीं प्रमाणें घेऊन व अनुकूल युक्तींचाहि आश्रय करून-कांहीं प्रबल प्रतिबंध नसल्यास या जन्मीं विचारानंतर लागलेंच आत्मज्ञान होतें. व तसें नसल्यास म्हणजे अगोदरच फल देण्यास तयार झालेला प्रतिबंध साक्षात्कारास हटवीत असल्यास, त्याच्या क्षयानंतर दुसऱ्या जन्मीं विद्या प्राप्त होते - असें सिद्ध केलें आहे. -त्याप्रमाणें काठोपनिषदांतील दुसऱ्या वल्लीच्या सातव्या मंत्रांत, भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या चाळीस व पंचेचाळीस श्लोकाच्या उत्तरार्धांत आणि त्रेचाळीसाव्या श्लोकाच्या पूर्वार्धांत-प्रस्तुत गोष्टच सांगितली आहे. ॥३४॥

-या जन्मीं श्रवणादि करणाराला जन्मान्तरीं अपरोक्ष ज्ञान होतें, याविषयीं 'गर्भे नु सन्नन्वेषामवेदमहं०' हें ऐतरेयोपनिषदांतील वाक्य अर्थतः पढतात -

गर्भ एव शयानः सन् वामदेवोऽवबुद्धवान् ।
पूर्वाभ्यस्तविचारेण यद्वदध्ययनादिषु ॥३५

अन्वयार्थ - [यद्वत् अध्ययनादिषु तद्वत्-] ज्याप्रमाणें अध्ययनादिकांमध्यें होतें त्याप्रमाणें [वामदेवः गर्भे एव शयानः सन्-] वामदेव गर्भामध्यें शयन करीत असतांनाच [पूर्वाभ्यस्तविचारेण अवबुद्धवान्-] पूर्वीं ज्याचा अभ्यास केला आहे अशा विचाराच्या योगानें जाणता झाला.

प्रकाशः- वामदेवानें पूर्वजन्मीं जरी पूर्ण विचार केला होता, तरी प्रबल प्रतिबंधामुळें त्यास त्या जन्मीं साक्षात्कार झाला नाहीं. पण त्या प्रतिबंधाचा क्षय होतांच गर्भवासामध्यें असतांनाच त्यास 'मी सर्व देवांचा उत्पादक आहें' असा साक्षात्कार झाला. हा असा अघटित प्रकार कसा घडतो म्हणून कोणास आश्चर्य वाटेल म्हणून 'अध्ययनादिकाप्रमाणें' असा त्यास दृष्टान्त दिला आहे. ॥३५॥

-त्या दृष्टान्ताचें आतां स्पष्टीकरण करितात -

बहुवारमधीतेऽपि तदा नायाति चेत्पुनः ।
दिनांतरेऽनधीत्यैव पूर्वाधीतं स्मरेत्पुमान् ॥३६

अन्वयार्थ - [बहुवारं अधीते अपि तदा न आयाति चेत्-] पुष्कळ वेळ अध्ययन केल्यावरहि त्यावेळीं जर तें न आलें, तर [पुनः दिनांतरे अनधीत्य एव पुमान् पूर्वाधीतं स्मरेत्-] पुनरपि दुसऱ्या दिवशीं अध्ययन केल्यावांचून पुरुषास पूर्वदिवशीं अध्ययन केलेल्याचें स्मरण होतें.

प्रकाशः- ह्या श्लोकांत सांगितलेली गोष्ट विद्यार्थ्यांच्या मनांत तत्काल बिंबेल. कारण, एकादे वेळीं कितीहि जरी घोकंपट्टी केली, तरी तो पाठ त्यावेळीं तोंडपाठ म्हणतां येत नाहीं. पण दुसऱ्या दिवशीं प्रयत्नावांचूनच तो तोंडपाठ म्हणून दाखवितां येतो. त्याचप्रमाणें पूर्वाभ्यासामुळें वामदेवास दुसऱ्या जन्मीं आपोआप साक्षात्कार झाला. ॥३६॥

- 'अध्ययनादिषु' येथील 'आदि-' शब्दानें विवक्षित असलेले दुसरे दृष्टान्त सांगतात -

कालेन परिपच्यन्ते कृषिगर्भादयो यथा ।
तद्वदात्मविचारोऽपि शनैः कालेन पच्यते ॥३७

अन्वयार्थ - [यथा कृषिगर्भादयः कालेन परिपच्यन्ते-] ज्याप्रमाणें शेत, गर्भ इत्यादि कालाच्या योगानें परिपक्व होतात; [तद्वत् आत्मविचारः अपि कालेन शनैः पच्यते-] त्याप्रमाणें आत्मविचारहि कालाच्या योगानें हळु हळू पक्व होतो.

प्रकाशः- शेत, गर्भ, झाड इत्यादि पदार्थांच्या वृद्धीस जशी कालाची अपेक्षा असते; म्हणजे ते एकदम न वाढतां रोज थोडे थोडे वाढतात, त्याप्रमाणें आत्मविचारहि हळु हळू परिपक्व होतो. ॥३७॥

-तत्त्वाचा अनेकदा विचार केला तरी प्रतिबंधामुळें साक्षात्कार होत नाहीं, हें श्रीसुरेश्वराचार्यांनींहि सांगितलें आहे, असें आतां सांगतात-

पुनः पुनर्विचारेऽपि त्रिविधप्रतिबंधतः ।
न वेत्ति तत्त्वमित्येतद्वार्तिके सम्यगीरितम् ॥३८

अन्वयार्थ - [पुनः पुनः विचारे अपि त्रिविधप्रतिबंधतः पुरुषः तत्त्वं न वेत्ति-] वारंवार विचार केला तरी तीन प्रकारच्या प्रतिबंधामुळें पुरुष तत्त्व जाणत नाहीं; [इति एतत् वार्तिके सम्यक् ईरितम् अस्ति-] असें हें वार्तिकांतहि स्पष्टपणें सांगितलेलें आहे.

प्रकाशः- भूत, वर्तमान व भविष्य असे कालावरून होणारे तीन प्रतिबंध आहेत, व त्याच्यामुळें विचारजन्य ज्ञानाची उत्पत्ति होत नाहीं. असें वार्तिककारांनीं सांगितलें आहे ॥३८॥

-सुरेश्वराचार्यांच्या ज्या वार्तिकांत पूर्वोक्त तीन प्रतिबंध उदाहरणांसह दाखविले आहेत, तीं वार्तिकेंच येथें घेतात -

कुतस्तज्ज्ञानमिति चेत्तद्धि बंधपरिक्षयात् ।
असावपि च भूतो वा भावी वा वर्ततेऽथ वा ॥३९

अन्यार्थ - [तत् ज्ञानं कुतः इति चेत्-] तर मग तें ज्ञान कसें होतें ? असें विचारशील तर, [तत् हि बंधपरिक्षयात्-] तें प्रतिबंधाच्या क्षयामुळें होतें, असे समज. [असौ अपि भूतः वा भावी वा अथ वर्तते वा-] हा प्रतिबंधहि भूत किंवा भावी अथवा वर्तमान असतो.

प्रकाशः- ह्या वार्तिकांत भूतादि तीन प्रतिबंधांचा नामनिर्देश केलेला आहे. त्यांचें व्याख्यान आतां क्रमानेंच होणारें असल्यामुळें, येथें विस्तार करीत नाहीं. ॥३९॥

अधीतवेदवेदार्थोऽप्यत एव न मुच्यते ।
हिरण्यनिधिदृष्टान्तादिदमेव हि दर्शितम् ॥४०

अन्वयार्थ - [अतः एव अधीतवेदवेदार्थः अपि न मुच्यते-] असा त्रिविध प्रतिबंध असल्यामुळेंच वेद व वेदांचा अर्थ यांचा ज्यानें अभ्यास केला आहे, असा पुरुषहि मुक्त होत नाहीं. [हिरण्यनिधिदृष्टान्तात् इदं एव हि दर्शितं अस्ति-] सुवर्णाच्या सांठ्याच्या दृष्टान्तानें श्रुतीनेंहि हेंच दाखविलें आहे.

प्रकाशः- एकाद्या शेतांत सोन्याचा मोठा सांठा असावा. पण जन्भर अहोरात्र त्या शेतांत वरवर खपणाऱ्या शेतकऱ्यास तो ठाऊक नसावा. म्हणजे त्यामुळें तो जसा दरिद्र भोगीत असतो, त्याप्रमाणें केवल वेद व वेदार्थ यांचाच अभ्यास करणारांचीहि स्थिति होते. सारांश प्रतिबंध जोंपर्यंत ज्ञानास हटवीत असतात तोपर्यंत कितीहि जरी अध्ययन केलें तरी तें निष्फल होय. ॥४०॥

-'अहोपण भूतप्रतिबंध कोठें उपलब्ध होत नाहीं,' म्हणून म्हणाल तर सांगतों -

अतीतेनापि महिषीस्नेहेन प्रतिबंधतः ।
भिक्षुस्तत्त्वं न वेदेति गाथा लोके प्रगीयते ॥४१

अन्वयार्थ - [अतीतेन महिषीस्नेहेन अपि प्रतिबंधतः-] मागच्या महिषीवरील प्रेमामुळेंहि प्रतिबंध होऊन [भिक्षुः तत्त्वं न वेद-] भिक्षूस तत्त्वज्ञान झालें नाहीं; [इति गाथा लोके प्रगीयते-] अशी दंतकथा लोकांत सांगितली जाते.

प्रकाशः- कोणा एका गृहस्थाचें एका राणीशीं प्रेम जडले होतें, व तो पुष्कळ दिवस तिच्या प्रेमाचा अनुभव घेत होता. पुढें कर्मधर्मसंयोगानें त्यास उपरति झाली व त्यानें संन्यास घेतला. पण त्या पूर्वस्नेह-रूपी प्रतिबंधामुळें त्यास गुरूंनीं जरी परोपरींनें उपदेश केला तरी तत्त्वज्ञान झालें नाहीं. अशी लौकिक कहाणी आहे व ती भूतप्रतिबंधाचें उदाहरण असल्यामुळें येथें घेतली आहे. ॥४१॥

-'मग त्याला ज्ञानोत्पत्ति कशी झाली ?' उत्तर -

अनुसृत्य गुरुः स्नेहं महिष्यां तत्त्वमुक्तवान् ।
ततो यथावद्वेदैष प्रतिबंधस्य संक्षयात् ॥४२

अन्वयार्थ - [गुरुः स्नेहं अनुसृत्य महिष्यां तत्त्वं उक्तवान्-] गुरु स्नेहाला अनुसरून महिषीमधील तत्त्वच सांगता झाला, [ततः एषः प्रतिबंधस्य संक्षयात् यथावत् वेद-] तेव्हां तो प्रतिबंधाचा पूर्णपणें क्षय झाल्यामुळें, तत्त्वाला शास्त्रोक्तरीत्या जाणता झाला.

प्रकाशः- तत्त्वोपदेशक गुरु चतुर असले म्हणजे ते शिष्यास हरतऱ्हेनें कृतार्थ करून सोडतात, असा सामान्य नियम आहे. व त्यास अनुसरूनच या पूर्वोक्त यतींच्या गुरूंनीं त्यास कृतार्थ करून सोडलें. आपल्या शिष्यास वारंवार उपदेश करूनहि कांहीं निष्पन्न होत नाहीं, असें पाहतांच त्यांनीं कोणत्या प्रबल प्रतिबंधामुळें असें होत आहे, याचा विचार केला; व त्यामुळें राणीचा स्नेह याच्या ज्ञानास बाध करीत आहे, असें त्यांस समजलें. तेव्हां लगेच त्यांनीं त्या राणीमध्यें जें तत्त्व होतें त्याचाच उपदेश केला. व त्यामुळें तो यति थोडक्याच वेळांत कृतार्थ झाला. आपल्या महाराष्ट्रांतील साधुवर्य एकनाथांच्या चिरंजीवांविषयीं अशाच प्रकारची आख्यायिका आहे. ज्या वेश्येवर पुत्राचें प्रेम होतें, तिलाच किरीटकुंडलयुक्त देवी समजून तिचें एकांतांत ध्यान करावयास नाथांनीं सांगितलें, व ह्या युक्तीनें त्यांचे चिरंजीव कृतार्थ झाले. सारांश ''योजकस्तत्र दुर्लभः'' ही म्हण सर्वत्र लागू पडते. ॥४२॥

-ह्याप्रमाणें गेल्या दोन श्लोकांत अतीत प्रतिबंधाचें उदाहरणासह प्रतिपादन करून आतां या श्लोकांत वर्तमान प्रतिबंधांचें स्वरूप सांगतात-

प्रतिबन्धो वर्तमानो विषयासक्तिलक्षणः ।
प्रज्ञामांद्यं कुतर्कश्च विपर्ययदुराग्रहः ॥४३

अन्वयार्थ - [वर्तमानः प्रतिबंधः विषयासक्ति-लक्षणः प्रज्ञामांद्यं कुतर्कः च विपर्यय-दुराग्रहः-] वर्तमानप्रतिबंध १ विषयासक्तिरूप, २ बुद्धिमांद्य, ३ कुतर्क व ४ विपर्ययाविषयीं दुराग्रह, असा चार प्रकारचा आहे.

प्रकाशः- चित्ताची विषयामध्यें प्रीति असणें; बुद्धि मंद असणें; शुष्कतर्क लढवून श्रुतीचा भलताच अर्थ करणें, आत्म्याच्या ठिकाणीं कर्तृत्वादि धर्म आहेत, असें समजून त्याविषयीं उगीच आग्रह धरणें इत्यादि वर्तमान प्रतिबंध होत. ॥४३॥

- या प्रतिबंधाची निवृत्ति कशी होते, तें सांगतात --

शमाद्यैः श्रवणाद्यैश्च तत्र तत्रोचितैः क्षयम् ।
नीतेऽस्मिन्प्रतिबन्धेऽतः स्वस्य ब्रह्मत्वमश्नुते ॥४४

अन्वयार्थ - [तत्र तत्र उचितैः शमाद्यैः च श्रवणाद्यैः-] त्या त्या प्रतिबंधास उचित अशी शमादि व श्रवणादि उपायांच्या योगानें [अस्मिन् प्रतिबंधे

क्षयं नीते सति-] ह्या प्रतिबंधाचा क्षय करून टाकिला असतां [अत: स्वस्य ब्रह्मत्वं अश्नुते-] त्यामुळें साधक आपल्या ब्रह्मभावास प्राप्त होतो.

प्रकाश:- गेल्या श्लोकांत सांगितलेल्या चार प्रकारच्या वर्तमान प्रतिबंधापैकीं विषयासक्तिरूप प्रतिबंधाचा क्षय शमादि सहा साधनांच्या योगानें; बुद्धिमांद्यरूप प्रतिबंधाचा श्रवणाच्या योगानें; कुतर्कांचा मननानें व आत्मा कर्ता आहे; जग सत्य आहे; इत्यादि विपर्ययदुराग्रहाचा निदिध्यासानें होतो. 'शमादि' यांतील आदिपदानें दम, तितिक्षा, उपरति, श्रद्धा व समाधान यांचें ग्रहण करावें. ह्याप्रमाणें त्या त्या प्रतिबंधास उचित अशा उपायांच्या अनुष्ठानानें सर्व प्रतिबंधनांचा क्षय झाला असतां, त्या कृतकृत्य साधकास आपला कूटस्थ आत्माच ब्रह्म आहे, असा साक्षात्कार होतो. ॥४४॥

-आतां भावी प्रतिबंध कोणता तें सांगतात --

आगामिप्रतिबंधश्च वामदेवे समीरित: ।
एकेन जन्मना क्षीणो भरतस्य त्रिजन्मभि: ॥४५

अन्वयार्थ - **[च आगामिप्रतिबंध: वामदेवे समीरित:-] आणि भावी प्रतिबंध वामदेवाच्या ठिकाणीं सांगितला आहे. [स: च तस्य एकेन जन्मना क्षीण:-] व तो वामदेवाच्या एका जन्मानेंच क्षीण झाला; [भरतस्य त्रिजन्माभि: क्षीण:-] भरताचा तीन जन्मांनीं क्षीण झाला.**

प्रकाश:- आगामी किंवा भावी प्रतिबंध म्हणजे पुढच्या जन्मास कारण होणारा प्रारब्धकर्माचा शेष आहे. तो प्रारब्धरूपच असल्यामुळें, त्याचा भोगावांचून क्षय होत नसतो व त्यामुळें श्रवणादि साधनांचें जरी पूर्णपणें अनुष्ठान झालेलें असलें, तरी जन्म घ्यावा लागतोच. अर्थात् प्रारब्धाची निवृत्ति केव्हां होईल याविषयीं कोणत्याच प्रकारें नियम करितां येत नाहीं. याविषयीं-वामदेवाची एकाच गर्भवासानें मुक्ति झाली; भरतास तीन जन्म घ्यावे- इत्यादि पुराणामध्यें अनेक उदाहरणें आहेत. ॥४५॥

-'अहो पण एका जन्मानें, तीन जन्मांनीं, असा कालनियम तुम्हींच सांगत आहां ।' उत्तर --

योगभ्रष्टस्य गीतायामतीते बहुजन्मनि ।
प्रतिबंधक्षय: प्रोक्तो न विचारोऽप्यनर्थक: ॥४६

अन्वयार्थ - **[गीतायां योगभ्रष्टस्य बहुजन्मनि अतीते सति प्रतिबंधक्षय: प्रोक्त:-] श्रीमद्भगवद्गीतेमध्यें योगभ्रष्ट पुरुषाचे अनेक जन्म झाल्यावर त्याच्या प्रतिबंधाचा क्षय होतो, असें सांगितलें आहे. [अत: विचार: अपि न अनर्थक:-] त्यामुळें विचारहि व्यर्थ नाहीं.**

प्रकाश:- तत्त्वसाक्षात्कार होईपर्यंत ज्याचा विचार होत नाहीं, त्यास योगभ्रष्ट असें म्हणतात. म्हणजे विचार करीत असूनहि ज्याला प्रतिबंधामुळें त्याच जन्मांत साक्षात्कार होत नाहीं तो योगभ्रष्ट होय. अशा साधकाच्या प्रतिबंधाचा क्षय अनेक जन्मांनंतर होतो; असें श्रीभगवानांनीं अर्जुनास सांगितलें आहे. त्यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. एक तर प्रतिबंधाचा क्षय केव्हां होईल याचा अनियम व दुसरी विचार कधींहि व्यर्थ होत नाहीं. प्रतिबंधामुळें जरी त्याचा सांप्रतकालीं उपयोग न झाला तरी पुढें झाल्यावांचून रहात नाहीं. ॥४६॥

-गीतेंत प्रतिपादन केलेला अर्थ गीतेंतीलच चार श्लोकांचा अनुवाद करून सांगतात --

प्राप्य पुण्यकृतां लोकानात्मतत्त्वविचारत: ।
शुचीनां श्रीमतां गेहे साभिलाषोऽभिजायते ॥४७

अन्वयार्थ - **[आत्मतत्त्वविचारत: पुण्यकृतां लोकान् प्राप्य-] आत्मतत्त्वविचाराच्या योगानें पुण्यवानांच्या स्वर्गादि लोकांस प्राप्त होऊन [साभिलाष: शुचीनां श्रीमतां गेहे अभिजायते-] अविरक्त पुरुष शुद्ध व श्रीमंत लोकांच्या कुळांत**

उत्पन्न होतो.

प्रकाश:- प्रतिबंधामुळें जरी आत्मसाक्षात्कार न झाला तरी आत्मविचाराचा महिमा अचिन्त्य असल्यामुळें, त्यास-यज्ञयागादि इष्ट; विहिर, तळें इत्यादि पूर्त व दत्त कर्मे करून अपरिमित पुण्यसंचय करणारे लोक ज्या लोकीं जातात, त्या स्वर्गसंज्ञक लोकाची प्राप्ति होते. तेथें पुष्कळ दिवस सुखोपभोग घेऊन पुढें तो इहलाकीं जन्म घेतो. पण मरणसमयीं त्याच्या मनांत ज़र ऐहिक भोगाविषयीं इच्छा राहिलेली असली तर तो अतिशुद्ध व संपन्न अशा कुलांत जन्म घेतो. ॥४७॥

-आतां विरक्त योगभ्रष्टाविषयीं दुसरा पक्ष सांगतात-

अथ वा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
नि:स्पृहो ब्रह्मतत्त्वस्य विचारात्तद्धि दुर्लभम् ॥४८

अन्वयार्थ - [अथवा नि:स्पृह: ब्रह्मतत्त्वस्य विचारात् धीमतां योगिनां एव कुले भवति-] किंवा विरक्त योगभ्रष्ट ब्रह्मतत्त्वाच्या विचारामुळें बुद्धिमान् योग्यांच्याच कुलांत उत्पन्न होतो. [तत् दुर्लभं हि-] खरोखर अशा प्रकारचा जन्म दुर्लभच होय.

प्रकाश:- मरणसमयीं अंत:करणांत पूर्ण विरक्ति उत्पन्न झाल्यास ब्रह्मविचाराच्या सामर्थ्यानें साधक स्वर्गलोकीं तर जातोच. पण तेथील भोग संपतांच तो धन्य महात्मा इहलोकीं उत्तम पण दरिद्री ब्राह्मणकुलांत उत्पन्न होतो. खरोखर असा जन्म प्राप्त होणें हें एक अघटितच होय. ॥४८॥

-या जन्माच्या दुर्लभत्वाचेंच उपपादन -

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयस्तस्मादेतद्धि दुर्लभम् ॥४९

अन्वयार्थ - [हि तत्र पौर्वदेहिकं तं बुद्धिसंयोगं लभते-] ज्या अर्थी त्या जन्मांत त्यास पूर्व जन्मांतील तो बुद्धिसंयोग प्राप्त होतो, [च तत: भूय: यतते-] व तो फिरून त्याहून अधिक प्रयत्न करितो; [तस्मात् एतत् दुर्लभं-] त्या अर्थी हा जन्म दुर्लभ होय.

प्रकाश:- पूर्व देहांत असतांना त्याला जी आत्मतत्त्वविषयक बुद्धि झालेली होती, तिचाच दरिद्रानें पीडलेल्या कुलांत पुन: उदय होतो. व नंतर तो पुनरपि झपाट्यानें प्रयत्न करून आपल्या जन्माचें सार्थक करून घेतो. एवढ्याकरितांच अशा प्रकारच्या जन्मास दुर्लभ म्हटलें आहे. जो योगभ्रष्ट श्रीमंताच्या कुलांत निर्माण झालेला असतो, त्यास जरी पौर्वदेहिक बुद्धि झाली तरी त्याची परिस्थिति अनुकूल नसल्यामुळें तिचा विकास होत नाहीं. ॥४९॥

-अधिक अभ्यासाचें कारण -

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि स: ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥५०

अन्वयार्थ - [तेन पूर्वाभ्यासेन एव अवश: अपि ह्रियते-] त्या पूर्वाभ्यासाकडूनच तो अस्वतंत्र असलेला योगभ्रष्टहि आकर्षिला जातो. [एवं अनेकजन्मसंसिद्ध: स:-] ह्याप्रमाणें अनेक जन्मीं प्रयत्न करून पूर्ण सिद्ध झालेला तो महात्मा [तत: परां गतिं याति-] तत्त्वज्ञानाच्या योगानें मुक्तीला प्राप्त होतो.

प्रकाश:- योगभ्रष्ट पुरुषाचा पूर्वाभ्यास व्यर्थ होत नसल्यामुळे, तो अभ्यासच त्यास परतंत्र करून सोडतो व आपल्या अनुष्ठानांत प्रवृत्त करितो. आणि ह्याप्रमाणें अनेक सहस्रजन्मांतील पुण्यसंचयामुळें तो उत्तम प्रकारें सिद्ध होऊन जन्ममरणपरंपरेंतून सुटतो. ॥५०॥

-आणखी एक आगामी प्रतिबंध सांगतात -

ब्रह्मलोकाभिवाञ्छायां सम्यक् सत्यां निरुध्य ताम् ।
विचारयेद्य आत्मानं न तु साक्षात्करोत्ययम् ॥५१

अन्वयार्थ - [ब्रह्मलोकाभिवाञ्छायां सम्यक् सत्यां-] ब्रह्मलोकाची दृढ इच्छा असतांना [तां निरुध्य य: आत्मानं विचारयेत्-] तिचा निरोध करून जो आत्म्याचा विचार चालवितो, [अयं तु न साक्षात् करोति-] त्याला आत्मसाक्षात्कार होत नाहीं.

प्रकाश:- ब्रह्मलोकाविषयीं दृढ इच्छा असतांना तिचा निरोध करणें चांगलें नव्हें; असें सांगण्याकरितां हा श्लोक प्रवृत्त झालेला नसून ती असतांना जरी विचार केला, तरी प्रतिबंधक्षयानंतर मोक्ष अवश्य मिळतोच, हें सांगण्याकरितां व इष्ट लोक मिळवून देण्याचेंहि सामर्थ्य विचारामध्यें आहे हें सुचविण्याकरितां प्रवृत्त झाला आहे. ॥५१॥

-'तर मग त्याला मुक्ति कधींच मिळणार नाहीं!' उत्तर --

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्था इति शास्त्रत: ।
ब्रह्मलोके स कल्पान्ते ब्रह्मणा सह मुच्यते ॥५२

अन्वयार्थ - [वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्था: इति शास्त्रत:-] 'वेदान्तविज्ञान०' इत्यादि श्रुतिरूप शास्त्रावरून [स: ब्रह्मलोके कल्पान्ते ब्रह्मणा सह मुच्यते-] तो ब्रह्मलोकीं ब्राह्मकल्पाच्या अंतीं ब्रह्मदेवासह मुक्त होतो. ('वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्था०' ही श्रुति- मुं. भा. ३.२.६, व 'ब्रह्मणा सह ते सर्वे संप्राप्ते प्रतिसंचरे । परस्यान्ते कृतात्मान: प्रविशन्ति परं पदं ॥' ही स्मृति, यांवरून ब्रह्मलोकप्राप्तीनंतर तत्त्वाला साक्षात् जाणून ब्रह्मदेवासह ते मुक्त होतात, असें सिद्ध होतें.)

प्रकाश:- 'वेदान्ताच्या पूर्ण ज्ञानामुळें ज्यांनीं पुरुषार्थाचा उत्तम प्रकारें निश्चय केला आहे, असे परोक्षज्ञानी भावी प्रतिबंधामुळें ब्रह्मलोकीं जातात व तेथें राहून ब्राह्मकल्पाच्या अंतीं ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतात' अशा अर्थाच्या श्रुति व स्मृति असल्यामुळें असले साधक ब्रह्मलोकाच्या क्षयानंतर स्वरूपांत लीन होतात; असा निर्णय करावा. ॥५२॥

-ह्याप्रमाणें 'तत्त्वविचार जरी केला तरी प्रतिबंधामुळें साक्षात्कार होत नाहीं,' असें सांगून आतां 'तीव्र पाप्यांना तर तत्त्वविचार करावा, अशी इच्छाहि होत नाहीं,' असें सांगतात -

केषांचित्स विचारोऽपि कर्मणा प्रतिबध्यते ।
श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्य इति श्रुते: ॥५३

अन्वयार्थ - ['श्रवणायापि बहुभि: य: न लभ्य:' इति श्रुते:-] 'जो परमात्मा पुष्कळ पुरुषांना केवल ऐकावयासहि मिळण्यासारखा नाहीं' अशा अर्थाची श्रुति असल्यामुळें [केषांचित् स: विचार: अपि कर्मणा प्रतिबध्यते-] कित्येकांचा तो विचारहि कर्माच्या योगानें प्रतिबद्ध होतो.

प्रकाश:- 'कर्में विचारासहि प्रतिबंध करितात' हें म्हणणें श्रुतिसिद्ध आहे. शिवाय आत्मविचार करणारे पुरुष क्वचित् आढळतात; व अनात्मविचार करणारे तर प्राय: सर्वच असतात; असा अनुभवहि आहे. ॥५३॥

-ह्याप्रमाणें गेल्या पंधरा श्लोकांत-प्रतिबंध असल्यास तत्त्वसाक्षात्कार व तत्साधनभूत विचार संभवत नाहीं-असें सांगून आतां 'विचार करण्यास असमर्थ असलेल्या पुरुषार्थेच्छूनें काय करावें?' अशी जिज्ञासा झाली असतां अठ्ठाविसाव्या श्लोकाच्या उत्तरार्धात जी प्रतिज्ञा केली होती तिचें उपपादन करितात -

अत्यन्तबुद्धिमान्द्याद्वा सामग्र्या वाऽप्यसंभवात् ।
यो विचारं न लभते ब्रह्मोपासीत सोऽनिशम् ॥५४

अन्वयार्थ - [अत्यंतबुद्धिमांद्यात् वा सामग्र्या: अपि असंभवात् वा-] अत्यंत बुद्धिमंदत्वामुळें किंवा सामग्रीच्याहि असंभवामुळें [य: विचारं न लभते-] जो विचारास प्राप्त होत नाहीं; [स: ब्रह्म अनिशं उपासीत-] त्यानें ब्रह्माची सतत उपासना करावी.

प्रकाश:- गुरु, शास्त्र, इत्यादिकांचाच लाभ न झाल्यास विचार होणें असंभवनीय आहे. सारांश आपल्या हातून विचार होत नाहीं; किंवा तो करितां येत नाहीं; असें वाटल्यास त्या साधकानें ब्रह्माची सतत उपासना करावी. अठ्ठाविसाव्या श्लोकाचा उत्तरार्ध - विचार करण्यास असमर्थ असलेले पुरुष गुरुमुखांतून तें ऐकून उपासना करितात- अशा अर्थाचा आहे हें सुज्ञ वाचक विसरले नसतीलच. ॥५४॥

-'पण निर्गुण ब्रह्मतत्त्व गुणरहित असल्यामुळें त्याची उपासना संभवत नाहीं,' अशी आशंका घेऊन 'प्रत्ययाची आवृत्ति हेंच उपासनेचें स्वरूप असल्यामुळें सगुण ब्रह्माप्रमाणें निर्गुण ब्रह्माचीहि उपासना संभवते' असें सांगतात -

निर्गुणब्रह्मतत्त्वस्य न ह्युपास्तेरसंभव: ।
सगुणब्रह्मणीवात्र प्रत्ययावृत्तिसंभवात् ॥५५

अन्वयार्थ - [सगुणब्रह्मणि इव अत्र प्रत्ययावृत्तिसंभवात्-] सगुणब्रह्माप्रमाणें निर्गुण-ब्रह्मामध्येंहि प्रत्ययाची आवृत्ति संभवत असल्यामुळें [निर्गुणब्रह्मतत्त्वस्य उपास्ते: असंभव: न हि-] निर्गुणब्रह्मतत्त्वाच्या उपासनेचा असंभव नाहीं.

प्रकाश:- ब्रह्म अमुक अमुक गुणांनीं युक्त आहे. असें समजून त्याचें वारंवार स्मरण करणें ही सगुण उपासना होय. या उपासनेमध्यें ब्रह्माचें जसें स्मरण करितां येतें तसेंच तें निर्गुण उपासनेमध्येंहि करितां येणें शक्य आहे. अर्थात् निर्गुण उपासना असंभवनीय आहे असें समजणें व्यर्थ होय. ॥५५॥

-'अहोपण निर्गुण ब्रह्म वाणी व मन यांस अगोचर आहे. त्यामुळें त्याची स्मरणरूप उपासना संभवत नाहीं,' अशी शंका घेऊन 'ज्ञानपक्षींहि हा दोष येतो' असें सांगतात --

अवाङ्मनसगम्यं तन्नोपास्यमिति चेत्तदा ।
अवाङ्मनसगम्यस्य वेदनं च संभवेत् ॥५६

अन्वयार्थ - [तत् अवाङ्मनसगम्यं न उपास्यं इति चेत्-] तें वाणी व मन यांस गोचर न होणारें ब्रह्म उपासना करण्यास योग्य नाहीं, तें उपास्य होऊं शकत नाहीं, म्हणून म्हणावें [तदा अवाङ्मनसगम्यस्य वेदनं च न संभवेत्-] तर मग वाणी व मन यांस गोचर न होणाऱ्या ब्रह्माचें ज्ञानहि संभवणार नाहीं !

प्रकाश:- उपासना म्हणजे वारंवार स्मरण करणें, असें मागच्या श्लोकाच्या विवरणांत सांगितलेंच आहे. आतां-वाणी व मन यांस निर्गुण ब्रह्म विषय होत नाहीं व त्यामुळें त्याचें स्मरणहि होणें शक्य नाहीं. कारण स्मरण ही तरी एक मनाची वृत्तीच आहे. - असें जर म्हटलें तर त्याचें ज्ञान होणेंहि अशक्य आहे, असें म्हणावें लागेल. कारण ज्ञान ही सुद्धां एक अंत:करणाची वृत्तीच आहे. ॥५६॥

-'अहोपण ब्रह्म अवाङ्मनसगोचर आहे, असें जाणणें शक्य आहे' म्हणून म्हणाल तर 'त्याची तशीच उपासनाहि करतां येणें शक्य आहे' असें सांगतात -

वागाद्यगोचराकारमित्येवं यदि वेत्त्यसौ ।
वागाद्यगोचराकारमित्युपासीत नो कुत: ॥५७

अन्वयार्थ - [वागाद्यगोचराकारं इति एवं यदि असौ वेत्ति-] त्याचा आकार वाक् व मन यांचा विषय होण्यासारखा नाहीं, असें जर हा साधक जाणतो, [तर्हि वागाद्यगोचराकारं इति कुत: न उपासीत-] तर वागादिकांस ज्याचा आकार अगोचर आहे, अशा ब्रह्माची तो उपासना कां करणार नाहीं ?

प्रकाश:- तात्पर्य, ब्रह्म अशा अशा प्रकारचें आहे, असें जर साधकास जाणतां येतें तर तसेंच त्याचें चिंतनरूप भजन कां करितां येऊं नये. ॥५७॥

-'अहोपण तें जर उपास्य झालें तर सगुण होईल'

अशी आशंका घेऊन 'त्याला वेद्यत्व आहे, असें मानल्यानेंहि सगुण होईल' असें म्हणतात -

सगुणत्वमुपास्यत्वाद्यदि वेद्यत्वतोऽपि तत् ।
वेद्यं चेल्लक्षणावृत्त्या लक्षितं समुपास्यताम् ।।५८

अन्वयार्थ - [यदि उपास्यत्वात् सगुणत्वं-] जर उपास्यत्वामुळें त्याला सगुणतेची प्राप्ति होईल असें म्हटलें [तर्हि वेद्यत्वतः अपि तत् भविष्यति एव-] तर वेद्यत्वामुळेंहि तिची प्राप्ति होईलच. [लक्षणावृत्त्या वेद्यं चेत्-] तें लक्षणावृत्तीनें वेद्य आहे, असें जर म्हटलें तर [लक्षितं समुपास्यताम्-] लक्षणावृत्तीनें ज्ञात होणाऱ्या त्याचीच उत्तम प्रकारें उपासना करावी.

प्रकाश:- सगुण ब्रह्मच उपासनेस योग्य असल्यामुळें- 'निर्गुण ब्रह्म उपास्य आहे' असें म्हटल्यास तें सगुण होईल - असें म्हणणेंहि योग्य नव्हे. कारण तें वेद्य (म्हणजे जाणण्यास योग्य) आहे, असें म्हटल्यासहि हा - दोष येणारच, आतां या ब्रह्माचें लक्षणावृत्तीनें ज्ञान होतें-असें म्हटल्यानें प्रस्तुत दोष येत नाहीं, अशी जर युक्ति लढविली तर ती उपासनेमध्येंहि लागू पडत असल्यामुळें आम्हांस इष्टच आहे. म्हणजे लक्षणेनें लक्षित असें जें निर्गुण ब्रह्म त्याचीच उपासना करावी म्हणजे झालें. ।।५८।।

-अहो, पण निर्गुणब्रह्माच्या उपासनेचा श्रुतीने निषेध केला आहे.' अशी शंका -

ब्रह्म विद्धि तदेव त्वं नत्विदं यदुपासते ।
इति श्रुतेरुपास्यत्वं निषिद्धं ब्रह्मणो यदि ।।५९

अन्वयार्थ - [तत् एव त्वं ब्रह्म विद्धि-] जें कोणत्याहि ज्ञानसाधनाचा विषय न होणारें तत्त्व तेंच ब्रह्म आहे, असें तूं जाण [यत् इदं उपासते तत् न-] साधक ज्याची उपासना करितात तें नव्हे, [इति श्रुतेः ब्रह्मणः उपास्यत्वं निषिद्धं इति यदि-] अशी श्रुति असल्यामुळें ब्रह्माचें उपास्यत्व निषिद्ध आहे, असें जर म्हणशील तर -

प्रकाश:- सामवेदाच्या तलवकार शाखेच्या केनोपनिषदांत प्रस्तुत श्रुति आहे; व तिच्यावरून ब्रह्म उपासनेचा विषय होत नाहीं असें स्पष्ट होतें, असें वाद्याचें म्हणणें आहे. याचें उत्तर पुढच्या श्लोकांत दिलें आहे. ।।५९।।

-'उपास्यत्वाप्रमाणें ब्रह्माच्या वेद्यत्वाचाहि त्याच श्रुतीने निषेध केला आहे' असें समाधान -

विदितादन्यदेवेति श्रुतेर्वेद्यत्वमस्य न ।
यथाश्रुत्यैव वेद्यं चेत्तथाश्रुत्याऽप्युपास्यताम्
।।६०

अन्वयार्थ - [विदितात् अन्यत् एव इति श्रुतेः-] 'ज्ञान वस्तूंहून तें भिन्नच आहे,' अशी श्रुति असल्यामुळें [अस्य वेद्यत्वं न-] त्याला वेद्यत्व नाहीं [यथाश्रुत्या एव वेद्यं चेत्-] पण श्रुतीनें प्रतिपादन केल्याप्रमाणेंच तें वेद्य आहे, म्हणून म्हणशील तर [तथाश्रुत्या अपि उपास्यताम्-] श्रुतीनें सांगितल्याप्रमाणेंच उपासना करावी.

प्रकाश:- पूर्वोक्तश्रुतीनेंच त्याच्या वेद्यत्वाचाहि निषेध केला आहे. वेद्यत्व म्हणजे ज्ञानाचा विषय होण्याचा स्वभाव. आतां अन्यश्रुतीनें 'ती वेद्य आहे' असें सांगितलें असल्यामुळें त्याच्या वेद्यत्वाचें आम्हीं ग्रहण करितों; असें जर म्हणाल तर अन्यश्रुतीने त्याच्या उपास्यत्वाचाहि निर्देश केलेला असल्यामुळें त्याची उपासना करावी - असें आम्हींहि म्हणूं !! उपास्यत्व म्हणजे उपासनेचा विषय होण्याचा स्वभाव. ।।६०।।

-'पण ब्रह्माचें वेद्यत्व वास्तविक नाहीं' असें जर म्हणाल; तर 'उपास्यत्वहि खरें नव्हें' असें सांगतात -

अवास्तवी वेद्यता चेदुपास्यत्वं तथा न किम् ।
वृत्तिव्याप्तिर्वेद्यता चेदुपास्यत्वेऽपि तत्समम्
।।६१

अन्वयार्थ - [वेद्यता अवास्तवी चेत्-] 'वेद्यत्व सत्य नव्हे' असें जर म्हटलें तर [उपास्यत्वं तथा न किं-] उपास्यता तशीच नव्हे का ? [वृत्तिव्याप्तिः वेद्यता चेत्-] बरें, वृत्तींचा विषय होणें म्हणजेच वेद्यता होय; असें जर म्हटलें तर [उपास्यत्वे अपि तत् समम्-] उपास्यतेच्या ठिकाणींहि तें सारखेंच लागू आहे.

प्रकाश:- उपासना व ज्ञान यांमध्यें फरक आहे. ज्ञानामध्यें अंत:करणाची वृत्ति ब्रह्माकार होत असते. पण उपासनेमध्यें तशी होत नाहीं-असें शंकाकाराचें म्हणणें आहे. त्यावर सिद्धान्ती म्हणतात कीं - तें बरोबर नाहीं. कारण ज्ञानाप्रमाणें उपासनेमध्येंहि अंत:करण ब्रह्माकार होतें. या आमच्या म्हणण्यास श्रुतीचा आधार आहे. आम्हीं उगीच कांहीं तरी सांगत आहों; असें समजूं नका. ॥६१॥

-युक्तिशून्य निंदाच करावयाची म्हटल्यास ती तुझ्या पक्षींहि संभवते-

का ते भक्तिरुपास्तौ चेत्कस्ते द्वेषस्तदीरय ।
मानाभावो व वाच्योऽस्यां बहुश्रुतिषु दर्शनात्
॥६२

अन्वयार्थ - [उपास्तौ ते कां भक्तिः इति चेत्-] उपासनेमध्यें तुझी एवढी दृढ भक्ति कां ? असें जर म्हणशील तर [ते कः द्वेषः तत् ईरय-] तुझा एवढा द्वेष कां ? तें सांग पाहूं, [बहुश्रुतिषु दर्शनात् अस्यां मानाभावः न वाच्यः-] अनेक श्रुतींमध्यें निर्देश आढळत असल्यामुळें उपासनेविषयीं प्रमाण नाहीं, असेंहि म्हणतां येणार नाहीं.

प्रकाश:- उपासनेविषयीं कांहीं प्रमाण नसल्यामुळें मी द्वेष करितों असेंहि म्हणणें युक्त नाहीं. कारण अनेक श्रुति याविषयीं प्रमाण आहेत.. ॥६२॥

-'बहुश्रुतीमध्यें उपलब्ध होत असल्यामुळें' याचेंच विवरण -

उत्तरस्मिंस्तापनीये शैब्यप्रश्नेऽथ काठके ।
माण्डूक्यादौ च सर्वत्र निर्गुणोपास्तिरीरिता ॥६३

अन्वयार्थ - [उत्तरस्मिन् तापनीये, शैब्यप्रश्ने, अथ काठके-] अथर्ववेदाच्या नृसिंहोत्तरतापनीय नामक उपनिषदांत, प्रश्नोपनिषदाच्या पांचव्या शैब्यप्रश्नांत, काठकोपनिषदाच्या दुसऱ्या वल्लींत [च मांडूक्यादौ सर्वत्र निर्गुणोपास्तिः ईरिता अस्ति-] मांडूक्याच्या आरंभींच व तैत्तिरीयादि दुसऱ्याहि अनेक उपनिषदांत निर्गुण उपासना सांगितलेली आहे.

प्रकाश:- उत्तरतापनीयामध्यें देव प्रजापतीस म्हणाले, 'हे भगवन्, अणुहून अणुरूप असलेल्या ह्या ओंकाररूप आत्म्याचें आम्हांस स्वरूप सांग''अशी देवांनीं प्रजापतीची प्रार्थना केली आहे; व त्यानें त्या निर्गुणाच्या उपासनेचा देवांस उपदेश केला आहे. प्रश्नोपनिषदांत सत्यकामनामक शैब्यानें पिप्पलादांस प्रश्न केला आहे, व त्या गुरूंनीं ''जो ह्या परम पुरुषाचें ॐ या तीन मात्रांनीं युक्त अशा अक्षराच्या द्वारा ध्यान करितो'' इत्यादि प्रकारें उपदेश केला आहे. कठवल्लींतहि यमानें नचिकेतास ''हें अक्षरच ब्रह्म आहे'' इत्यादि सांगितलें आहे. मांडुक्यांतहि ''ॐ च हें सर्व आहे'' असा आरंभ करून शेवटीं तुरीयाच्या उपासनेविषयीं उपदेश केला आहे. सारांश अशा अनेक श्रुतीमध्यें निर्गुणउपासना सांगितलेली आहे. यास्तव ती अप्रमाण आहे, असें म्हणण्याचें साहस करूं नये. ॥६३॥

-'पण, निर्गुणउपानेचें अनुष्ठान कसें करितां येईल ?' उत्तर --

अनुष्ठानप्रकारोऽस्या पंचीकरण ईरितः ।
ज्ञानसाधनमेतच्चेन्नेति केनात्र वारितम् ॥६४

अन्वयार्थ - [अस्याः अनुष्ठानप्रकारः पंचीकरणे

ईरितः अस्ति-] हिच्या अनुष्ठानाचा प्रकार पंचीकरणांत सांगितला आहे. [एतत् ज्ञानसाधनं इति चेत् अन्न न इति केन वारितम्-] 'अहो पण, हें तर ज्ञानसाधन आहे !' म्हणून म्हणशील तर 'तें ज्ञानसाधन नाहीं' असें कोण म्हणतो आहे ?

प्रकाशः- मांडुक्यादि उपनिषदांवरील भाष्यांत ठिकठिकाणीं आचार्यांनी या उपासनेचा निर्देश केला आहे. तो सर्व ठिकाणीं ज्यांना पहावयाचा असेल त्यांनीं श्रीसुरेश्वराचार्यांचें पंचीकरण पहावें. आतां-ही उपासना मुक्तीचें साक्षात् साधन नाहीं-असें जर कोणी म्हणेल तर तें आम्हांसहि इष्टच आहे. कारण ज्ञान हें मुक्तीचें साक्षात् साधन व उपासना ज्ञानाचें साधन हें आम्हांस अक्षरशः मान्य आहे. ॥६४॥

-'अहोपण सर्व लोक सगुण उपासनेचेच अनुष्ठान करितात, निर्गुणोपासना कोणीच करीत नाहींत' उत्तर-

नानुतिष्ठति कोऽप्येतदिति चेन्माऽनुतिष्ठतु ।
पुरुषस्यापराधेन किमुपास्तिः प्रदुष्यति ॥६५

अन्वयार्थ - [कः अपि एतत् न अनुतिष्ठिति इति चेत्-] कोणीहि हिचें अनुष्ठान करीत नाहीं, असें जर म्हणशील तर [मा अनुतिष्ठतु-] न कां करीनात. [पुरुषस्य अपराधेन उपास्तिः प्रदुष्यति किम्-] पुरुषाच्या अपराधानें उपासना दूषित होते कीं काय?

प्रकाशः- या श्रुतीनें सांगितलेल्या उपासनेचें जर कोणी अनुष्ठान न केलें तर त्यांत त्या उपासनेची कोणती हानि होणार आहे ? साधकाच्या अपराधामुळें साधनांची कधीं हानि होत नसते !! ॥६५॥

-आतां प्रमाणसिद्ध असलेल्या निर्गुण उपासनेचें कोणी अनुष्ठान करीत नाहींत, म्हणून ती त्याज्य ठरत नाहीं, याविषयीं दृष्टान्त -

इतोऽप्यतिशयं मत्वा मंत्रान्वश्यादिकारिणः ।
मूढा जपन्तु तेभ्योऽतिमूढाः कृषिमुपासताम् ॥६६

अन्वयार्थ - [मूढाः इतः अपि अतिशयं मत्वा-] मूढ पुरुष या सगुणोपासनेहूनहि अधिक लाभदायक मानून [वश्यादिकारिणः मंत्रान् जपन्तु-] वशीकरणादि मंत्रांचा जप करोत; [अथवा तेभ्यः अतिमूढाः कृषिं उपासताम्-] किंवा त्यांहूनहि अति मूर्ख शेतकी करोत !!

प्रकाशः- या श्लोकाचें तात्पर्य असें;- ज्ञानद्वारा मोक्षदायक निर्गुण उपासनेपेक्षां थोड्या कष्टांनीं साध्य होणारी सगुण उपासनाच बरी असें मानून जसे बरेच अविवेकी साधक सगुणोपासना करितात, त्याप्रमाणें कांहीं मूर्ख-बऱ्याच अवकाशानें स्वर्गादि पारलौकिक फल देणाऱ्या सगुण उपासनेपेक्षां येथल्या येथेंच फल. देणाऱ्या जारणमारण, उच्चाटन, वशीकरण इत्यादि मंत्रांचा जप खुशाल करोत. पण कांहीं मूर्ख सगुणोपासना सोडतात, म्हणून सर्वच जसे ती सोडीत नाहींत, त्याप्रमाणेंच बरेच अविवेकी निर्गुण उपासना सोडितात म्हणून आश्चर्याप्रमाणें क्वचित् आढळणारे मुमुक्षुहि तिचा त्याग करितील अशी आशा करणें व्यर्थ आहे. किंवा वशीकरणादि मंत्रांमध्यें नियमादिकांचा फार निर्बंध आहे, असें जाणून नियमादिकांची अपेक्षा न करणारीं शेतकीसारखीं कर्मे कांहीं अतिमूर्ख करितात, पण त्यामुळें सर्वच जसे मंत्रादिकांचा जप टाकीत नाहींत; त्याप्रमाणें संसारी पुरुष निर्गुण उपासना करीत नाहींत, म्हणून उत्तम साधकांनींहि तिचा त्याग करावा हें म्हणणें न्याय्य होणार नाहीं. ॥६६॥

-असो; आतां प्रसंगप्राप्त चर्चेचा उपसंहार करून प्रकृति विषयाकडे वळतात-

तिष्ठन्तु मूढाः प्रकृता निर्गुणोपास्तिरीर्यते ।
विद्यैक्यात्सर्वशाखास्थान् गुणानत्रोपसंहरेत् ॥६७

अन्वयार्थ - [मूढाः तिष्ठन्तु-] मूर्खांच्या गोष्टी आतां राहूं देत. [प्रकृता निर्गुणोपास्तिः ईर्यते-] प्रकृत निर्गुणोपासना सांगितली जाते. [विद्यैक्यात् सर्वशाखास्थान् गुणान् अत्र उपसंहरेत्-] ही विद्यासंज्ञक निर्गुण उपासना सर्वत्र एकरूपच

असल्यामुळें, सर्व शाखांतील गुण या उपासनेंत घ्यावेंत.

प्रकाश:- उपासनेस विद्या हें नांव आहे. व 'सर्व उपनिषदांतील उपासना एकरूपच आहे. कारण विधानादि प्रकार सर्वत्र सारखाच आहे' अशा अर्थाच्या शारीरक मीमांसेच्या तिसऱ्या अध्यायाच्या तिसऱ्या पादाच्या पहिल्या सूत्रांत सर्व शाखेंतील उपासना एकच आहे, असें ठरविलें आहे. यास्तव सर्व शाखेंतील उपनिषदांत सांगितलेले उपासनेचे भिन्न भिन्न गुण प्रत्येक उपासनेंत घ्यावे. ॥६७॥

-ते गुण विधेय व निषेध्य असे दोन प्रकारचे आहेत. त्यांतील 'आनन्दो ब्रह्म' 'विज्ञानं आनंदं ब्रह्म,' 'नित्य: शुद्धो बुद्ध: सत्यो मुक्तो निरंजन: विभुरद्वय: आनन्द: पर: प्रत्यगेकरस:' इत्यादि जे विधेय गुण त्यांचा उपसंहार 'आनंदादय: प्रधानस्य-' ३.३.११- या अधिकरणांत सांगितला आहे, असें सांगतात -

आनंदादेर्विधेयस्य गुणसंघस्य संहृति: ।
आनंदादय इत्यस्मिन् सूत्रे व्यासेन वर्णिता ॥६८

अन्वयार्थ - [आनंदादे: विधेयस्य गुणसंघस्य संहृति:-] आनंदादि विधेय गुणसमूहाचा उपसंहार करावा, असें ['आनंदादय:०' इति अस्मिन् सूत्रे व्यासेन वर्णिता-] 'आनंदादय:०' या सूत्रांत भगवान् व्यासांनीं वर्णन केलें आहे.

प्रकाश:- हे गुण दोन प्रकारचे आहेत. एक विधेय म्हणजे विधिवाक्यांवरून समजण्यासारखें. त्यांतील 'ब्रह्म आनंदरूप आहे' 'ब्रह्म विज्ञानरूप व आनंदरूप आहे' 'शुद्ध, बुद्ध, मुक्त, सत्य, निरंजन, विभु, द्वैतशून्य, आनंद, पर, सर्वान्तर्यामी, एकरस' इत्यादि भिन्न भिन्न शाखेंतील विधिवाक्यांवरून ज्ञात होणाऱ्या अनेक धर्मांचा प्रत्येक शाखेंतील निर्गुण उपासनेंत संग्रह करावा; असें 'आनंदादय: प्रधानस्य' या पूर्वोक्त अध्याय व पादाच्या अकराव्या सूत्रांत सांगितलें आहे. 'ब्रह्माचे आनंदादिक सर्व गुण सर्व शाखेंतील उपासनेंत समजावें' असा त्या सूत्राचा अर्थ आहे. ॥६८॥

-विधेय गुणांप्रमाणें निषेध्य गुणांचाहि उपसंहार करावा, असें श्रीव्यासांनींच सांगितलें आहे; असें आतां सांगतात--

अस्थूलादेर्निषेध्यस्य गुणसंघस्य संहृति: ।
तथाव्यासेन सूत्रेऽस्मिन्नुक्ताऽक्षरधियां त्विति ॥६९

अन्वयार्थ - [तथा व्यासेन 'अक्षरधियां तु०' इति अस्मिन् सूत्रे-] त्याचप्रमाणें व्यासमहर्षींनीं 'अक्षरधियां तु०' ह्या सूत्रामध्यें [अस्थूलादे: निषेध्यस्य गुणसंघस्य संहृति: उक्ता-] अस्थूलादि निषेध्य गुणसमूहाचा उपसंहार करण्याविषयीं सांगितलें आहे.

प्रकाश:- 'अस्थूलादि' येथील आदिशब्दानें ''अनणु, अह्रस्व, अदृश्य, अग्राह्य, अशब्द, अस्पर्श,अरूप, अव्यव'' इत्यादि भिन्न भिन्न शाखेंतील निषेध्य पदें घ्यावीं. 'अक्षरधियां तु०' या पूर्वोक्त अध्याय व पादाच्या तेतिसाव्या सूत्राचा अर्थ:- 'अक्षरघी म्हणजे ब्रह्मसंज्ञक धर्मीच्या ठायीं जी द्वैतविषयक विशेषांच्या निषेधाची बुद्धी, ती सर्व उपनिषदांत सारखीच आहे. कारण सर्व द्वैतविशेषांचं निराकरण करणें, हा ब्रह्माच्या प्रतिपादनाचा प्रकार सर्वत्र सारखाच आहे, व सर्व उपनिषदांचें प्रतिपाद्य जें ब्रह्म त्याचा अभेद आहे अशी प्रतिज्ञा केली आहे.' इत्यादि आहे. ॥६९॥

-'अहोपण, निर्गुण ब्रह्मोपासनेंत गुणांचा उपसंहार करणें युक्त नव्हे. कारण तो केल्यास निर्गुणोपासनत्वच नाहींसें होतें' अशी आशंका घेऊन 'सूत्रकारांनीं सांगितलेल्या उपसंहाराचाच आम्ही अनुवाद करीत असल्यामुळें आम्हांला हा प्रश्न करण्यांत काय अर्थ आहे ?' असें म्हणतात -

निर्गुणब्रह्मतत्त्वस्य विद्यायां गुणसंहृति: ।
न युज्येतेत्युपालंभो व्यासं प्रत्येव मां न तु ॥७०

अन्वयार्थ - [निर्गुणब्रह्मतत्त्वस्य विद्यायां गुणसंहृति: न युज्येत-] निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या

उपासनेंत गुणोपसंहार करणें युक्त नव्हे, [इति उपालंभ: व्यासं प्रति एव-] अशा प्रकारचा दोष व्यासांसच दिला पाहिजे [मां प्रति तु न-] मला नव्हे.

-'हिरण्यशमश्रुत्वादि गुणविशिष्ट मूर्तीचें कथन केलेलें नसल्यामुळें हें निर्गुणोपासनच आहे' म्हणून म्हणशील तर कांहीं विरोध नाहीं, असें सांगतात --

हिरण्यश्मश्रुसूर्यादिमूर्तीनामनुदाहृते: ।
अविरुद्धं निर्गुणत्वमिति चेत्तुष्यतां त्वया ॥७१

अन्वयार्थ - [हिरण्यश्मश्रुसूर्यादिमूर्तीनां अनुदाहृते: निर्गुणत्वं अविरुद्धं इति चेत्-] 'हिरण्याची श्मश्रु' इत्यादि लक्षणांनीं युक्त अशा सूर्यादि मूर्तीचा उल्लेख केलेला नसल्यामुळें आनंदादि रूप ब्रह्माच्या निर्गुणत्वाशीं कांहीं विरोध येत नाहीं, असें जर म्हणशील तर [त्वया तुष्यताम्-] तूं संतुष्ट हो.

प्रकाश:- छान्दोग्यादि उपनिषदांतून सगुणोपासनेचें प्रकरण चाललें असतां 'सूर्याची श्मश्रु सोन्याची आहे' इत्यादि प्रकारें उपास्याचें जसें वर्णन केलेलें आढळतें, तसें निर्गुणप्रकरणीं आढळत नाहीं. तेव्हां आनंद, सत्, चित् इत्यादि रूप ब्रह्म निर्गुण आहे, असें म्हणतां येण्यासारखें आहे; असें जर म्हणत असशील तर तें आम्हांस फारसें अनिष्ट नसल्यामुळें 'तूं तसेंच समज व आनंद मानून रहा' असें आम्ही मोठ्या प्रसन्नतेनें सांगतों. ॥७१॥

-'पण आनंदादि विधेय व अस्थूलादि निषेध्य गुणांचा उपास्य तत्त्वामध्यें प्रवेश होणें शक्य नसल्यामुळें त्या त्या गुणांनीं युक्त अशा ब्रह्माची उपासना कशी करितां येईल ?' उत्तर --

गुणानां लक्षकत्वेन न तत्त्वेऽन्त:प्रवेशनम् ।
इति चेदस्त्वेवमेव ब्रह्मतत्त्वमुपास्यताम् ॥७२

अन्वयार्थ - [गुणानां लक्षकत्वेन तत्त्वे अन्त: प्रवेशनम् न भवति इति चेत्-] गुणांना लक्षकता असल्यामुळें तत्त्वामध्यें त्यांचा प्रवेश होत नाहीं; असें जर म्हणशील तर [एवं एव अस्तु-] ठीक आहे, तसाच प्रकार असो. [ब्रह्मतत्त्वं उपास्यताम्-] पण ब्रह्मतत्त्वाची उपासना करावी.

प्रकाश:- आनंदादि गुणांचा ब्रह्मामध्यें प्रवेश होत नाहीं. तर ते गुण त्याचें लक्षण करणारे म्हणजे त्याची ओळख करून देणारे, (त्यास सुचविणारे) आहेत, असें जर म्हणशील तर तसें कां असेना. आनंदादि गुणांविषयीं कशीहि जरी कोणी कल्पना केली तरी त्यापासून आमची कांहीं हानि होत नाहीं. त्या गुणांच्या योगानें लक्षित होणाऱ्या ब्रह्माचीच उपासना करावी. एवढें मात्र आम्हीं सांगूं. ॥७२॥

- तसल्या उपासनेचा प्रकारच दाखवितात-

आनंदादिभिरस्थूलादिभिश्चात्माऽत्र लक्षित: ।
अखंडैकरस: सोऽहमस्मीत्येवमुपासते ॥७३

अन्वयार्थ - [अत्र य: अखंडैकरस: आत्मा आनंदादिभि: च अस्थूलादिभि: लक्षित:-] या सर्व उपनिषदांतून जो अखंड, एकरस आत्मा आनंदादिक व अस्थूलादिक गुणांच्या योगानें लक्षित आहे, [स: अहं अस्मि इति एवं मुमुक्षव: उपासते-] तो मी आहें अशा प्रकारें मुमुक्षु उपासना करितात.

प्रकाश:- सर्व उपनिषदांत सांगितलेल्या गुणांवरून ज्याचा बोध झाला आहे असें 'अखंड ब्रह्मच मी आहें' अशी निरंतर भावना करणें हीच निर्गुण उपासना होय. हिलाच अहंग्रहोपासना म्हणतात. ॥७३॥

-'तरमग आत्मज्ञान व उपासना यांत भेद कां मानला जातो ?' उत्तर -

बोधोपास्त्योर्विशेष: क इति चेदुच्यते शृणु ।
वस्तुतंत्रो भवेद्बोध: कर्तृतंत्रमुपासनम् ॥७४

अन्वयार्थ - [बोधोपास्त्यो: क: विशेष: इति चेत् उच्यते शृणु-] तर मग बोध व उपासना यांच्या मध्यें

विशेष कोणता आहे, असें जर विचारशील तर सांगतों ऐक. [बोध: वस्तुतंत्र: भवेत् उपासनं तु कर्तृतंत्रं अस्ति-] बोध वस्तुतंत्र असतो व उपासना कर्त्याच्या अधीन असते.

प्रकाश:- बोध म्हणजे ज्ञान. तें जसा पदार्थ असेल तसेंच होणें शक्य आहे. आणि तसें न झाल्यास तें यथार्थ ज्ञानच नव्हे. पण उपासनेची स्थिति तशी नसते. तर ती कर्त्याच्या भावनेवर अवलबूंन असते. म्हणजे शालीग्राम शिलेमध्यें विष्णूची भावना करणें किंवा न करणें हें मनुष्याच्या हातांत असतें हें उघड आहे. ॥७४॥

-बोध व उपासना यांतील आणखी वैलक्षण्य सिद्ध होण्यासाठी दोन श्लोकांनीं बोधाचें कारण, स्वरूप व कार्य दाखवितात -

विचाराज्जायते बोधोऽनिच्छा यं न निवर्तयेत् ।
स्वोत्पत्तिमात्रात्संसारे दहत्यखिलसत्यताम् ॥७५

अन्वयार्थ - [विचारात् बोध: जायते-] विचारापासून बोध उत्पन्न होतो. [अनिच्छा यं न निवर्तयेत्-] अनिच्छा त्याचें निवारण करूं शकत नाहीं. [स्वोत्पत्तिमात्रात् संसारे अखिलसत्यतां दहति-] आपल्या उत्पत्तीबरोबरच तो संसाराच्या ठिकाणची सर्व सत्यता जाळून टाकितो.

प्रकाश:- विचाराचा स्वभावच असा आहे, कीं तो बोधास अवश्य उत्पन्न करितोच. विचार केल्यावर बोध होऊं नये अशी जरी विचार करणाराची दृढ इच्छा असली, तरी ती त्यास हटवूं शकत नाहीं. व हा विचारजन्य बोध उत्पन्न होतांक्षणीच संसार सत्य आहे, अशाप्रकारची भावना तो नि:शेष घालवितो. ॥७५॥

-आणि-

तावताकृतकृत्य: सन्नित्यतृप्तिमुपागत: ।
जीवन्मुक्तिमनुप्राप्य प्रारब्धक्षयमीक्षते ॥७६

अन्वयार्थ - [तावता कृतकत्य: सन् नित्यतृप्तिं उपागत: मुमुक्षु:-] तेवढ्यानेंच कृतकृत्य होऊन नित्यतृप्तीला प्राप्त झालेला मुमुक्षु [जीन्मुक्तिं अनुप्राप्य प्रारब्धक्षयम् ईक्षते-] जीवन्मुक्तीस प्राप्त होऊन प्रारब्धाच्या क्षयाची प्रतीक्षा करितो.

प्रकाश:- आत्मबोध होऊन संसाराच्या असत्यत्वाची भावना झाल्यानेंच साधक कृतकृत्य होतो. व 'मला आतां अधिक कांहीं कर्तव्य नाहीं. जें कांहीं कर्तव्य होतें तें सर्व मी करून टाकिलें आहे' अशी एकदा दृढ भावना झाली कीं त्या पुरुषास कधींहि क्षीण न होणारी तृप्ति प्राप्त होते. अशाप्रकारच्या तृप्तीनंतर तो जीवन्मुक्तिसंज्ञक अवस्थेप्रत पोंचतो. व नंतर केवल प्रारब्धाचा क्षय केव्हा होतो आणि मी शरीरत्याग करून स्वरूपांत केव्हां मिळतों, एवढीच वाट पहात राहतो. ॥७६॥

-याप्रमाणें बोधाचें कारण, स्वरूप व फल सांगून उपासनेचें त्याहून वैलक्षण्य सिद्ध करण्यासाठीं तिचें कारण, स्वरूप व कार्य दाखवितात -

आप्तोपदेशं विश्वस्य श्रद्धालुरविचारयन् ।
चिंतयेत् प्रत्ययैरन्यैरनंतरितवृत्तिभि: ॥७७

अन्वयार्थ - [श्रद्धालु: आप्तोपदेशं विश्वस्य-] श्रद्धालु साधकानें आप्तोपदेशावर विश्वास ठेवून [अविचारयन् अन्यै: प्रत्ययै: अनंतरितवृत्तिभि: चिन्तयेत्-] विचार न करितां दुसऱ्या प्रत्ययांच्या योगानें अंतरित न होणाऱ्या वृत्तींच्या योगानें चिंतन करावें.

प्रकाश:- उपासनेमध्यें केवळ श्रद्धाच कारण असते. तेथें विचाराचें कांहींएक चालत नाहीं. अथवा उपासनेविषयीं विचार करूं लागल्यास त्याचा इष्ट परिणाम होत नाहीं. त्यामुळें आप्तोपदेशाविषयींहि अश्रद्धा उत्पन्न होते. यास्तव उपासकानें उपासनेविषयींच्या उपदेशाची विचाररूपी कसोटीवर परीक्षा न करीतां केवल विश्वासानें अनुष्ठान करण्यास आरंभ करावा. आतां उपासना कशी करावी म्हणून म्हणाल तर सांगतों. संसारिक पदार्थांच्या प्रत्ययांनीं

उपास्याविषयींची वृत्ति विच्छिन्न न होऊं देतां म्हणजे सतत उपास्याविषयींच अविच्छिन्न वृत्ति ठेवून त्याचें चिंतन करावें ॥७७॥

-असें चिंतन किती दिवस करावें, तें सांगतात -

यावच्चिंत्यस्वरूपत्वाभिमान: स्वस्य जायते ।
तावद्विचिंत्य पश्चाच्च तथैवामृति धारयेत् ॥७८

अन्वयार्थ - [यावत् स्वस्य चिंत्यस्वरूपत्वाभिमान: जायते-] जोंपर्यंत स्वत:ला चिंत्यस्वरूपत्वाचा अभिमान होई [तावत् विचिंत्य पश्चात् च तथा एव आमृति धारयेत्-] तोंपर्यंत चिंतन करून नंतर तसेंच मरेपर्यंत त्यास धारण करावें.

प्रकाश:- मी उपास्यरूपच आहें. म्हणजे माझें उपास्यतत्त्व व मी भिन्न नाहीं तर दोघेंहि एकच आहों, असा दृढ बोध होईतोंपर्यंत पूर्वोक्तरीत्या चिंतन करावें. आणि असा बोध झाल्यावरहि मरेयर्पंत त्याचें धारण करावें; सोडूं नये. कारण एकदा बोध झाल्यानें काम भागत नसून, तो मरेपर्यंत सतत रहावा लागतो. ॥७८॥

-उपासकाचा तद्रूपत्वाभिमान उदाहरणानें स्पष्ट करितात -

ब्रह्मचारी भिक्षमाणो युत: संवर्गविद्यया ।
संवर्गरूपतां चित्ते धारयित्वा ह्यभिक्षत ॥७९

अन्वयार्थ - [संवर्गविद्यया युत: ब्रह्मचारी भिक्षमाण: सन्-] संवर्गविद्येनें युक्त असलेला ब्रह्मचारी भिक्षा मागत असतांना [चित्ते संवर्गरूपतां धारयित्वा हि अभिक्षत-] चित्तांत 'मी संवर्गरूप आहें,' अशी भावना धरूनच भिक्षा मागता झाला.

प्रकाश:- संवर्ग या गुणांनीं युक्त असलेल्या प्राणाची उपासना करणारा कोणी एक ब्रह्मचारी प्राक्तनकर्मप्राप्त भिक्षाटण करीत असतां अभिप्रतारी नामक राजाच्या घरीं भिक्षा मागण्याकरितां गेला. तेथें मनांत धरलेलें आपलें संवर्गरूपत्व त्यानें प्रकट केलें. अशी आख्यायिका छांदोग्यात आहे. वाणी, मन इत्यादि सर्व कार्यें वायूंत लीन होत असल्यामुळें त्यास संवर्ग असें म्हणतात. असो; या आख्यायिकेवरून उपासक उपास्यरूप मीं आहें, असा अभिमान यावज्जीव बाळगतो. असें ठरतें. ॥७९॥

-मरेपर्यंत तसेंच चिंतन करण्याचें कारण सांगून 'अनिच्छा ज्याचें निराकरण करूं शकत नाहीं,' या बोधधर्माहून वैलक्षण्य सांगतात-

पुरुषस्येच्छया कर्तुमकर्तुं कर्तुमन्यथा ।
शक्योपास्तिरतो नित्यं कुर्यात्प्रत्ययसंततिम् ॥८०

अन्वयार्थ - [उपास्ति: पुरुषस्य इच्छया कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं शक्या-] उपासना पुरुषाच्या इच्छेनें करणें, न करणें किंवा कशी तरी करणें शक्य आहे. [अत: प्रत्ययसंततिं नित्यं कुर्यात्-] यास्तव प्रत्ययाचीं संतति सतत करावी.

प्रकाश:- उपासना पुरुषाच्या अधीन असते, असें पूर्वीं चवऱ्याहत्तराव्या श्लोकांत सांगितलें होतें; त्याचेंच हें येथें व्याख्यान आहे असें समजावें. उपासना करणें, न करणें, किंवा शास्त्रानें सांगितल्याप्रमाणें न करितां अन्य रीतीनें करणें, हें उपासकाच्या अधीन आहे. यास्तव त्यानें सतत तत्त्वानुसंधान करावें ॥८०॥

-'अशा सतत चिंतनाचें फल -

वेदाध्यायी ह्यप्रमत्तोऽधीते स्वप्नेऽधिवासत: ।
जपिता तु जपत्येव तथा ध्याताऽपि वासयेत्
॥८१

अन्वयार्थ - [यथा हि अप्रमत्त: वेदाध्यायी अधिवासत: स्वप्ने अधीते-] ज्याप्रमाणें सर्वदा दक्षतेनें वेदाध्ययन करणारा दृढ वासनेमुळें स्वप्नामध्येंहि अध्ययन करितो, [जपिता तु जपति एव-] किंवा जप करणारा जपच करितो, [तथा ध्याता अपि वासयेत्-] त्याप्रमाणें ध्यान करणारानेंहि

स्वप्नामध्यें सुद्धां ध्यान करावें.

प्रकाश:- जाग्रतींत मनापासून व सतत असें जर आपण एखादें कर्म करीत असलो, तर त्या कर्माच्या दृढ संस्कारामुळें आपण स्वप्नांतहि तेंच करीत असतों, असा आपणांस व कधीं कधीं दुसऱ्यासहि प्रत्यय येतो. या श्लोकांत वेदाध्ययन व जप या दोन कर्मांचा दृष्टान्त दिला आहे. स्वप्नांतील वेदाध्ययनाचा दुसऱ्यासहि कधीं कधीं प्रत्यय येतो. पण जपाचा ज्याचा त्यालाच येणें शक्य आहे. सारांश, दृढ वासनेच्या योगानें हा सर्व प्रकार घडत असल्यामुळें, सगुण किंवा निर्गुण ईश्वराचें ध्यान करणाऱ्यानें इतकें तल्लीन झालें पाहिजे आहे कीं, त्याला स्वप्नेंहि ध्यानाचींच पडावीं. 'मनीं असे तें स्वप्नीं दिसे' ही लौकिक म्हण या ध्यानासहि लागू पडण्यासारखी आहे. ॥८१॥

-स्वप्नादिकांतहि ध्यानाची अनुवृत्ति होण्याचें कारण-

विरोधिप्रत्ययं त्यक्त्वा नैरंतर्येण भावयन् ।
लभते वासनावेशात्स्वप्नादावपि भावनाम् ॥८२

अन्वयार्थ - [विरोधिप्रत्ययं त्यक्त्वा नैरंतर्येण भावयन् मुमुक्षु:-] ध्यानाच्या विरोधी असलेल्या प्रत्ययाचा त्याग करून सतत ध्यान करणारा मुमुक्षु [वासनावेशात् स्वप्नादौ अपि भावनां लभते-] संस्कारपटुत्वामुळें स्वप्नादि अवस्थांमध्येंहि ध्यानाला प्राप्त होतो.

प्रकाश:- ज्या ज्या ज्ञानाचा ध्यानांशीं विरोध असेल, त्या त्या सर्व वैषयिक ज्ञानाचा नि:शेष त्याग करून जर तूं ध्यान करूं लागलास, तर लवकरच त्याचा मनावर पूर्ण संस्कार होऊन त्यामुळें तुझें स्वप्नामध्येंहि ध्यान होऊ लागेल. ॥८२॥

-'अहोपण, प्रारब्धकर्मामुळें प्राप्त होणाऱ्या विषयांचा उपभोग घेणाऱ्या पुरुषाच्या निरंतर ध्यानाची सिद्धि कशी होणार ?' उत्तर --

भुंजानोऽपि निजारब्धमास्थातिशयतोऽनिशम् ।
ध्यातुं शक्तो न संदेहो विषयव्यसनी यथा ॥८३

अन्वयार्थ - [यथा विषयव्यसनीं तथा-] विषयाचें ज्याला व्यसन लागलें आहे, अशा पुरुषाप्रमाणें [निजारब्धं भुंजान: अपि-] आपल्या प्रारब्धकर्माचा भोग घेणाराहि [आस्थातिशयत: अनिशं ध्यातुं शक्त: अस्ति न संदेह:-] दृढ आस्थेमुळें सतत ध्यान करूं शकतो, त्यांत कांहीं संशय नाहीं.

प्रकाश:- प्राणी प्रारब्धकर्मांचें फल भोगीत असो, किंवा याहीपेक्षां आणखीं कांहीं करो, ज्याच्याविषयीं त्याच्या मनांत दृढ प्रेम असतें, तें तो हरतऱ्हेनें शेवटास नेतोच; असा व्यावहारिक अनुभवहि आहे. तेव्हां जरी मनुष्य सुखदु:खादि भोग भोगीत असला, तरी त्याची दृढ आस्था असल्यास तो भोगसमयींहि ध्यान करूं शकतो. याला व्यसनी स्त्रीचा दृष्टान्त दिला आहे. त्याचें पुढच्या श्लोकांत व्याख्यान होणार असल्यामुळें मी येथें विस्तार करीत नाहीं. ॥८३॥

- वरील दृष्टान्ताचें विवरण -

परव्यसनिनी नारी व्यग्राऽपि गृहकर्मणि ।
तदेवास्वादयत्यन्त: परसंगरसायनम् ॥८४

अन्वयार्थ - [परव्यसनिनी नारी गृहकर्मणि व्यग्रा अपि-] परपुरुषाचें जिला व्यसन लागलें आहे, अशी एखादी स्त्री गृहकृत्यांत जरी व्यग्र होऊन गेली असली, तरी [अंत: तत् एव परसंगरसायनं आस्वादयति-] मनांत त्याच परसंगरूप रसायनाचा आस्वाद घेत असते.

प्रकाश:- एखाद्या चांगल्या किंवा वाईट कामाची मनुष्यास खोडी लागली कीं, ती जातां जात नाहीं. व त्यामुळें प्रस्तुत दृष्टान्तांतील व्याभिचारिणी स्त्री जरी पतीच्या किंवा लोकाच्या किंवा घरांतील दुसऱ्या

वडीलधाऱ्या माणसाच्या भीतीमुळें घरांतील कामांत निमग्न होत असली, तरी हातानें काम करीत असतांनाच मनामध्यें त्या परपुरुषाच्या संगाची गोडी घेत असते. म्हणजे - तो पुरुष असा असा सुंदर आहे, त्याचा संग मोठा सुखावह आहे; पुन: त्याच्याकडे जाण्यास केव्हां संधी मिळेल कोण जाणें !! -इत्यादि प्रकारें त्याच्याविषयीं आनंददायक विचार ती मनांतल्या मनांत करीत असते. ॥८४॥

-'पण त्यामुळें गृहकृत्यांत कांहीं विच्छेद कसा होत नाहीं ?' उत्तर --

परसंगं स्वादयंत्या अपि नो गृहकर्म तत् ।
कुण्ठीभवेदपि त्वेतदापातेनैव वर्तते ॥८५

अन्वयार्थ - [परसंगं स्वादयन्त्या: अपि तत् गृहकर्म नो कुंठीभवेत्-] परसंगाचा आस्वाद घेणाऱ्याहि त्या स्त्रीचें तें गृहकर्म अडून रहात नाहीं. [अपि तु एतत् आपातेन एव वर्तते-] तर तें वरवरच होत असतें.

प्रकाश:- मनामध्यें परपुरुषाच्या संगाचाच जी स्वाद घेत असते, तिचें घरकाम अडून रहातें, असें नाहीं पण तें वेंठीचें होतें, मनापासून होत नाहीं. ॥८५॥

व्यसनीं स्त्रीचें काम 'आपातत:' म्हणजे वरवर होतें याचेंच स्पष्टीकरण -

गृहकृत्यव्यसनिनी यथा सम्यक्करोति तत् ।
परव्यसनिनी तद्वन्न करोत्येव सर्वथा ॥८६

अन्वयार्थ - [गृहकृत्यव्यसनिनी यथा तत् सम्यक् करोति-] घरच्या कामाचेंच जिला व्यसन लागलें आहे, ती जशी तें उत्तम प्रकारें करिते, [तद्वत् परव्यसनिनी सर्वथा न करोति एव-] त्याप्रमाणें परपुरुषाचें जिला व्यसन लागलें आहे, ती कधींच करीत नाहीं.

प्रकाश:- तात्पर्य, कोणत्याहि गोष्टीचें वेड लागून गेलें पाहिजे; म्हणजेच ती उत्तम प्रकारें पार पडते. घरच्या कामाचीच जिला रुचि लागलेली असते तिच्या व व्यसनी स्त्रीच्या कामांत कितीतरी अंतर असणार, हें उघडच आहे. ॥८६॥

-आतां या पूर्वोक्त दृष्टांताची दार्ष्टांतिकामध्यें योजना करितात-

एवं ध्यानैकनिष्ठोऽपि लेशाल्लौकिमारभेत् ।
तत्त्ववित्त्वविरोधित्वाल्लौकिकं सम्यगाचरेत्॥८७

अन्वयार्थ - [एवं ध्यानैकनिष्ठ: अपि लेशात् लौकिकं आरभेत्-] ह्याप्रमाणें केवळ ध्याननिष्ठ पुरुषहि अंशत: लौकिक कर्माचें आचरण करितो. [तत्त्ववित् तु अविरोधित्वात् लौकिकं सम्यक् आचरेत्-] पण, तत्त्वज्ञानी लौकिक कर्म विरोधी नसल्यामुळें तें उत्तम प्रकारें करितो.

प्रकाश:- ध्याननिष्ठानें परपुरुषाचें जिला व्यसन आहे, अशा स्त्रीप्रमाणें लौकिक कर्म करावें. व तत्त्वज्ञानी पुरुषानें केवल गृहकर्मामध्यें तत्पर असलेल्या स्त्रीप्रमाणें तें करावें. हा दृष्टान्तांतील गूढार्थ आहे. याचें अधिक स्पष्टीकरण पुढें होणार आहे. ॥८७॥

- लौकिक कर्म तत्त्वज्ञानाच्या विरोधी कसें नाहीं तें सांगतात -

मायामय: प्रपंचोऽयमात्मा चैतन्यरूपधृक् ।
इति बोधे विरोध: को लौकिकव्यवहारिण: ॥८८

अन्वयार्थ - [अयं प्रपंच: मायामय:-] हा प्रपंच मायामय आहे [आत्मा तु चैतन्यरूपधृक्-] व आत्मा चैतन्यरूपधारी आहे, [इति बोधे लौकिकव्यवहारिण: क: विरोध:-] असा बोध झाला असतां लौकिक व्यवहार करणारास कोणता विरोध असणार ?

प्रकाश:- संसार व आत्मा याचें एकदा यथार्थ स्वरूप समजलें कीं, लौकिक व्यवहार करण्यास कांहीं हरकत नाहीं. यास गारुड्याच्या खेळाचा प्रसिद्ध दृष्टान्त

आहे व त्याचें पूर्वीं (प्र. ७ श्लोक १७६) वर्णन झालें आहे. ॥८८॥

-आतां लौकिक व्यवहार व तत्त्वज्ञान यांचा अविरोधच स्पष्ट करितात --

अपेक्षते व्यवहृतिर्न प्रपंचस्य वस्तुताम् ।
नाप्यात्मजाड्यं किं त्वेषा साधनान्येव कांक्षति ॥८९

अन्वयार्थ - [व्यवहृति: प्रपंचस्य वस्तुतां न अपेक्षते-] व्यवहार प्रपंचाच्या वस्तुत्वाची अपेक्षा करीत नाहीं. [आत्मजाड्यं अपि न अपेक्षते-] व आत्म्याच्या जडतेचीहि अपेक्षा करीत नाहीं, [किंतु एषा साधनानि एव कांक्षति-] परंतु तो साधनांचीच इच्छा करितो.

प्रकाश:- प्रपंच खरा आहे व आत्मा जड आहे, असें जर समजलें तरच व्यवहार होणार, नाहींपेक्षां होणार नाहीं; असा जर नियम असता तर तत्त्वज्ञान व व्यवहार यांचा विरोध सिद्ध झाला असता. पण तसा कांहीं प्रकार नाहीं. शिवाय या व्यवहारास साधनांचीच अपेक्षा असते. तस्मात् साधनें असल्यास तत्त्वज्ञानकालींहि व्यवहार होणें शक्य आहे. ॥८९॥

-व्यवहाराचीं साधनें कोणतीं, तें आतां सांगतात-

मनोवाक्कायतद्बाह्यपदार्थाः साधनानि तान् ।
तत्त्वविन्नोपमृद्नाति व्यवहारोऽस्य नो कुत: ॥९०

अन्वयार्थ - [मनोवाक्कायतद्बाह्यपदार्था: साधनानि-] मन, वाणी, शरीर व त्याच्या बाहेरचे पदार्थ, हीं व्यवहाराचीं साधनें आहेत. [तान् तत्त्ववित् न उपमृद्नाति-] त्यांस तत्त्ववेत्ता नाहींसें करीत नाहीं. [अत: अस्य व्यवहार: कुत: नो भवति-] तेव्हां त्याचा व्यवहार कां नाहीं होणार ?

प्रकाश:- जग सत्य आहे, असें वाटलें तरच व्यवहार होणार असें म्हणणें युक्त नव्हे. कारण ती बुद्धि व्यवहाराचें कारण आहे, असें म्हणतां येणें शक्य नाहीं. मन, वाणी, शरीर व घर, शेत, स्त्री, पुत्र इत्यादि व्यवहाराची खरी साधनें आहेत. त्यामुळें तीं असेपर्यंत व्यवहार होणारच. शिवाय ज्ञानाबरोबर ज्ञान्याच्या व्यवहारसाधनांचा नाश होत असतो, असा कोठेंहि अनुभव नाहीं. तेव्हां साधनें असतांना व्यवहार कां बरें होऊं नये ? अवश्य झालाच पाहिजे ॥९०॥

'अहोपण विषयांचा नाश जरी झाला नसला तरी तत्त्ववेत्याला चित्ताचा नाश केला पाहिजे !' उत्तर --

उपमृद्नाति चित्तं चेद्ध्याताऽसौ न तु तत्त्ववित्।
न बुद्धिमर्दयन् दृष्टो घटतत्त्वस्य वेदिता ॥९१

अन्वयार्थ - [चित्तं उपमृद्नाति चेत् असौ ध्याता न तु तत्त्ववित्-] पुरुष चित्ताचा निरोध जर करीत असेल, तर तो ध्याता होय, तत्त्ववेत्ता नव्हे. [घटतत्त्वस्य वेदिता बुद्धिं अर्दयन् न दृष्ट:-] कारण घटाचें स्वरूप जाणणारा कोणीहि पुरुष बुद्धीचा निरोध करीत आहे, असें दिसत नाहीं.

प्रकाश:- वस्तुत: चित्ताचा नाश म्हणजे त्याचा निरोध होय. जो चित्ताचा निरोध करीत असतो, त्यास ध्यान करणारा असें म्हणतात, तत्त्वज्ञानी असें कोणी म्हणत नाहीं. कारण चित्ताचा निरोध व ज्ञान यांचें एकाच कालीं अस्तित्व संभवत नाहीं. समजा कीं, - एखादा मनुष्य एखादा पदार्थ पाहत आहे व त्याचा त्यास पूर्ण प्रत्यय येत आहे; तर त्याच वेळीं त्याचें चित्त एकाग्र झालें आहे, असें म्हणतां येईल का ? नाहीं. कारण एकाग्रसमयीं तें वृत्तिशून्य होऊनच राहत असतें. ॥९१॥

-'अहोपण, घट स्थूल असल्यामुळें स्पष्ट आहे, त्यामुळें त्याला पाहतांना चित्तनिरोध करावा लागत नाहीं. पण ब्रह्म स्थूल नसल्यामुळें त्याच्या ज्ञानाला चित्तनिरोधाची अपेक्षा आहे.' उत्तर --

सकृत्प्रत्ययमात्रेण घटश्चेद्भासते सदा ।
स्वप्रकाशोऽयमात्मा किं घटवच्च न भासते ॥९२

अन्वयार्थ - [सकृत्प्रत्ययमात्रेण घट: सदा भासते इति चेत्-] एकदा ज्ञात झाल्यानेंच जर घट सर्वदा भासतो, तर [अयं स्वप्रकाश: आत्मा घटवत् किं न भासते-] हा स्वप्रकाशरूप आत्माहि घटाप्रमाणेंच कां भासणार नाहीं ?

प्रकाश:- याचें तात्पर्य असें:- 'घट हा स्थूल पदार्थ असल्यामुळें स्पष्ट आहे. त्यामुळें त्याच्या ज्ञानास चित्ताच्या ऐकाग्र्याची अपेक्षा नसते. पण अति सूक्ष्म ब्रह्म तसें स्पष्ट नसल्यामुळें त्याच्या ज्ञानास, चित्तैकाग्र्याची आवश्यकता आहे' असें जर कोणी म्हणेल तर तें बरोबर नव्हे. कारण जड घटासहि जर 'स्पष्ट' म्हणून म्हणतां येतें, तर या स्वयंप्रकाश साक्षात् आत्म्यास 'अति स्पष्ट' म्हणावयास नको का ? व स्पष्ट अशा घटादि जड पदार्थाच्या ज्ञानास जर चित्तैकाग्र्याची जरूर नाहीं, तर अति स्पष्ट व स्वप्रकाश आत्म्याच्या ज्ञानास त्याची जरूर नाहीं; हें काय सांगावें ! ॥९२॥

-'अहोपण, ब्रह्म जरी स्वप्रकाश असलें तरी ब्रह्मविषयक बुद्धिवृत्तीलाच तत्त्वज्ञानत्व आहे. पण ती वृत्ति तर क्षणिक आहे. त्यामुळें ब्रह्मामध्यें तिचें पुन: पुन: अवस्थापन करण्याची अपेक्षा आहे' असें वादी म्हणेल म्हणून सिद्धान्ती 'मग घटादिकांनाहि तोच न्याय लागू करावयास पाहिजे' असें सांगतात -

स्वप्रकाशतया किं ते तद्बुद्धिस्तत्त्ववेदनम् ।
बुद्धिश्च क्षणनाश्येति चोद्यं तुल्यं घटादिषु ॥९३

अन्वयार्थ - [स्वप्रकाशतया ते किं -] आत्म्याच्या स्वप्रकाशतेनें तुला काय मिळणार ? [तद्बुद्धि: तत्त्ववेदनं-] आत्मविषयक बुद्धिच तत्त्वज्ञान आहे, [च बुद्धि: क्षणनाश्या-] व बुद्धि तर क्षणभंगुर आहे [इति चोद्यं घटादिषु तुल्यं-] असा जर प्रश्न केलास तर तो घटादिकामध्येंहि सारखाच आहे.

प्रकाश:- वादी:- अहोपण, आत्मा जरी स्वप्रकाश असला, तरी तद्विषयक बुद्धीच्या वृत्तीलाच तत्त्वज्ञान म्हणणार कीं नाहीं ? ती तर क्षणिक आहे. तेव्हां तिची क्षणोक्षणीं आत्म्याच्या ठायीं स्थापना केलीच पाहिजे. त्यावांचून ज्ञान कसें होईल ? **सिद्धान्ती:**- मग हाच प्रश्न घटाच्या ज्ञानाविषयींहि नाहीं का उद्भवत ॥९३॥

-यावर पुन: आक्षेप व समाधान -

घटादौ निश्चिते बुद्धिर्नश्यत्येव यदा घट: ।
इष्टो नेतुं तदा शक्य इति चेत्सममात्मनि ॥९४

अन्वयार्थ - [घटादौ निश्चिते बुद्धि: नश्यति एव-] घटादिकांचा निश्चय झाला असतां त्या विषयींची बुद्धि नष्ट होतेंच. म्हणून घटादिज्ञान क्षणिकच आहे. तथापि [यदा घट: इष्ट: तदा नेतुं शक्य:-] ज्यावेळीं घट न्यावासें वाटतें म्ह० त्याचा व्यवहार करावासें मनांत येतें त्यावेळीं त्याचा आणणें नेणें इत्यादि व्यवहार होऊं शकतो [इति चेत् आत्मनि समम्-] असें जर म्हणशील तर आत्म्याविषयींहि ते समान आहे. म्ह० एकदा आत्मनिश्चय झाला कीं त्याचाहि घटादिकाप्रमाणें हवा तेव्हां व्यवहार करितां येतो.

प्रकाश:- वादी:- घटादि पदार्थांचें ज्ञान जरी क्षणिक असलें तरी एकदा निश्चित झालेल्या घटाचा सर्वदा व्यवहार करितां येत असल्यामुळें त्याविषयीं चित्तस्थैर्याची अपेक्षा नाहीं. सिद्धान्ती:- आत्मज्ञानाचीहि स्थिती तीच आहे. म्हणजे एकदा आत्मनिश्चय झाला कीं, त्याचाहि घटादिकाप्रमाणेंच व्यवहार करितां येतो. ॥९४॥

-'आत्मनि समं' याचेंच विवरण -

निश्चित्य सकृदात्मानं यदापेक्षा तदैव तम् ।

वक्तुं मंतुं तथा ध्यातुं शक्नात्येव हि तत्त्ववित् ॥९५

अन्वयार्थ - [आत्मानं सकृत् निश्चित्य-] आत्म्याचा एकदा निश्चय करून [यदा अपेक्षा तदा एव-] पुन: जेव्हां अपेक्षा होते, तेव्हांच [तं वक्तुं मन्तुं तथा ध्यातुं तत्त्ववित् शक्नोति एव हि-] त्याच्याविषयीं बोलण्यास, मनन करण्यास व त्याचप्रमाणें ध्यान करण्यास तत्त्ववेत्ता समर्थ होतोच.

प्रकाश:- घटाप्रमाणेंच आत्म्याचा एकदा निश्चय झाला कीं, त्याच्याविषयींची बुद्धि जरी नष्ट झाली असली, तरी त्या ज्ञान्यास जेव्हां मनास वाटेल तेव्हां आत्म्याविषयीं बोलतां येतें, मनन करिता येतें; व ध्यानहि करितां येतें. ॥९५॥

-'अहोपण, उपासकाप्रमाणें तत्त्ववेत्ताहि आत्मानुसंधान करीत असल्यामुळें जगाला विसरतो !' उत्तर --

उपासक इव ध्यायल्लौकिकं विस्मरेद्यदि ।
विस्मरत्त्वेव सा ध्यानाद्विस्मृतिर्न तु वेदनात् ॥९६

अन्वयार्थ - [उपासक: इव ध्यायन् ज्ञानी यदि लौकिकं विस्मरेत्-] उपासकाप्रमाणेंच ध्यान करणारा ज्ञानीहि जर जगास विसरत असला; [तर्हि विस्मरतु एव-] तर तो खुशाल विसरो [सा विस्मृति: ध्यानात् न तु वेदनात्-] त्याची ती विस्मृति ध्यानामुळेंच होय, ज्ञानामुळें नव्हे.

प्रकाश:- उपासक, उपासनाकालीं आत्म्याचें अनुसंधान करीत असल्यामुळें जसा जगास विसरतो, तसाच हा ध्यान करणारा ज्ञानीहि जगास विसरतो, असें जर कोणी म्हटलें तर तें आम्हांस अनिष्ट नाहीं. कारण जगास विसरणें हें ध्यानाचें फल आहे; ज्ञानाचें नव्हे. ॥९६॥

-'अहोपण, तत्त्ववेत्त्यालाहि मुक्तीच्या 'सिद्धीसाठीं ब्रह्माचें ध्यान केलें पाहिजे !' उत्तर -

ध्यानं त्वैच्छिकमेतस्य वेदनान्मुक्तिसिद्धित: ।
ज्ञानादेव तु कैवल्यमिति शास्त्रेषु डिण्डिम: ॥९७

अन्वयार्थ - [वेदनात् मुक्तिसिद्धित: एतस्य ध्यानं तु ऐच्छिकं-] ज्ञानाच्या योगानें मुक्ति सिद्ध होत असल्यामुळें त्याचें ध्यान इच्छाप्रयुक्त होय. [ज्ञानात् एव तु कैवल्यं इति शास्त्रेषु डिण्डिम:-] ज्ञानाच्या योगानेंच कैवल्य मिळतें, असा शास्त्रामध्यें घोष आहे.

प्रकाश:- आत्मज्ञानी पुरुषास जर ध्यान करावेंसें वाटतच असलें, तर तो तें खुशाल करो. पण त्याचा मोक्षास कांहीं उपयोग नाहीं. मोक्ष ज्ञानामुळेंच प्राप्त होत असतो. आतां ध्यानामुळें जगाचा विसर पडून त्यामुळें दु:खादि क्लेश कमी व्हावे अशा इच्छेनेंच ज्याला तें कर्तव्य असेल, त्याला आम्हीं मोठ्या आनंदानें अनुमोदन देतों. 'ध्यानाचा खरा उपयोग ज्ञानाच्या पूर्वी असतो. व तें झाल्यावर त्याच्या योगानेंच मोक्ष मिळतो,' असा वेदान्ताचा घोष सर्वत्र आहे. ॥९७॥

-'अहोपण तत्त्ववेत्त्याच्या ध्यानाचा स्वीकार न केल्यास त्याची सदा बाह्य प्रवृत्तिच होईल !'

अशी शंका घेऊन तिचें समाधान करितात -

तत्त्वविद्यदि न ध्यायेत्प्रवर्तेत तदा बहि: ।
प्रवर्ततां सुखेनायं को बाधोऽस्य प्रवर्तने ॥९८

अन्वयार्थ - [तत्त्ववित् यदि न ध्यायेत् तदा बहि: प्रवर्तेत-] तत्त्वज्ञानें जर ध्यान न केलें तर तो बाह्य विषयांमध्यें प्रवृत्त होईल ! सिद्धांती- [अयं सुखेन प्रवर्ततां-] हा खुशाल प्रवृत्त होवो. [अस्य प्रवर्तने क: बाध:-] ह्याच्या नुस्त्या प्रवृत्तीनें कोणता बाध होणार नाही ?

प्रकाश:- तत्त्वज्ञान्यास ध्यानाची आवश्यकता आहेच, कारण त्यानें जर ध्यान न केलें तर तो प्राकृताप्रमाणें विषयामध्येंच निमग्न होऊं लागेल. मग त्याच्या ज्ञानाचा त्याला कोणता लाभ होणार ? असें

वाद्याचें म्हणणें आहे. पण तें बरोबर नाहीं. कारण ज्ञानी जरी व्यवहारांत प्रवृत्त झाला, तरी त्यापासून त्याच्या ज्ञानास बाध येत नाहीं. कारण प्रवृत्तीचीं साधनें जीं देह, इंद्रियें इत्यादि तीं असेपर्यंत प्रवृत्ति होणारच हें उघड आहे. ॥९८॥

-'पण त्याची बाह्य प्रवृत्ति होते, असें मानल्यास अतिप्रसंगहि होईल म्हणजे निषिद्ध प्रवृत्तिहि संभवेल !' अशी शंका व समाधान -

अतिप्रसंग इति चेत् प्रसंगं तावदीरय ।
प्रसंगो विधिशास्त्रं चेन्न तत्तत्त्वविदं प्रति ॥९९

अन्वयार्थ - [अतिप्रसंग: इति चेत् प्रसंग: तावत् ईरय-] अतिप्रसंग होईल असें जर म्हणशील, तर प्रसंग कोणता तें अगोदर सांग पाहू. [विधिशास्त्रं प्रसंग: इति चेत्-] विधिशास्त्र हा प्रसंग होय म्हणून जर म्हणशील, तर [तत् तत्त्वविदं प्रति न-] तें विधिशास्त्र तत्त्ववेत्त्याकरितां नाहीं.

प्रकाश:- अतिप्रसंग म्हणजे अनियम होय. 'तत्त्ववेत्ता बाहेर प्रवृत्त होईना' असें जर म्हटलें तर त्याची प्रवृत्ति यथेच्छ होऊं लागेल असें वाद्याचें म्हणणें आहे. पण सिद्धान्ती त्यास म्हणतात कीं, इंद्रियांच्या द्वारा अंत:करणाची प्रवृत्ति बाहेर होऊं दिल्यास प्रवृत्तीचा नियम राहणार नाहीं, म्हणून जें तूं म्हणतोस त्याच्या पूर्वीं नियम कोणता तें प्रथम सांग पाहूं ! या प्रश्नाचें उत्तर देण्याकरिता वादी म्हणतो - विधिशास्त्र हा नियम आहे. तेथें विधि व निषेधशास्त्र ही प्रवृत्तीची मर्यादा आहे असें समजावें. पण सिद्धांती म्हणतात कीं, तत्त्ववेत्ता विधिनिषेधाच्या मर्यादेपलीकडे गेलेला असल्यामुळें त्याचा तो नियम होऊं शकत नाहीं. ॥९९॥

-विधिनिषेधशास्त्राला अविद्वद्-विषयत्वच कसें आहे, तें दाखवितात-

वर्णाश्रमवयोवस्थाभिमानो यस्य विद्यते ।
तस्यैव च निषेधाश्च विधय: सकला अपि ॥१००

अन्वयार्थ - [यस्य वर्णाश्रमवयोवस्थाभिमान: विद्यते-] ज्याला वर्ण, आश्रम, वय, अवस्था इत्यादिकांचा अभिमान असतो [तस्य एव च निषेधा: च सकला: अपि विधय:-] त्यालाच सर्व निषेध व विधिहि असतात.

प्रकाश:- शास्त्रोक्त निषेध व विधि जे वर्णाश्रमादिकांचे अभिमानी असतात, त्यांसच लागू असतात. त्रिगुणरहित झालेल्या पारिव्राजकावर त्यांचा अंमल चालत नाहीं. ॥१००॥

-'अहोपण, तत्त्ववेत्ताहि देहधारी असल्यामुळें त्याला वर्णाश्रमादि-अभिमानित्व असणारच ?' उत्तर-

वर्णाश्रमादयो देहे मायया परिकल्पिता: ।
नात्मनो बोधरूपस्येत्येवं तस्य विनिश्चय: ॥१

अन्वयार्थ - [वर्णाश्रमादय: देहे मायया परिकल्पिता: सन्ति-] वर्ण, आश्रम इत्यादिक भाव देहाच्या ठिकाणीं मायेच्या योगानें कल्पिलेले आहेत. [बोधरूपस्य आत्मन: न-] ते बोधरूप आत्म्याचे नव्हेत. [इति एवं तस्य विनिश्चय: वर्तते-] असा त्याचा दृढनिश्चय असतो.

प्रकाश:- ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादी वर्ण व ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य इत्यादि आश्रम देहाच्या ठायीं, अज्ञानामुळें मानिले गेले आहेत. त्यांचा आत्म्याशीं कांहीं संबंध नाहीं, असा ज्ञानी पुरुषाचा दृढ निश्चय असतो. ॥१०१॥

-'अहो, तत्त्वनिश्चय राहूं दे. शास्त्र त्याचें कर्तव्य सांगतें' उत्तर --

समाधिमथ कर्माणि मा करोतु करोतु वा ।
हृदयेनास्तसर्वास्थो मुक्त एवोत्तमाशय: ॥२

अन्वयार्थ - [य: हृदयेन अस्तसर्वास्थ: उत्तमाशय: स: मुक्त: एव-] ज्यानें मनानें सर्व आस्था टाकिल्या आहेत व त्यामुळें ज्याचा अभिप्राय-ज्ञान उत्तम आहे, तो मुक्तच आहे. [अत:

स: समाधिं अथ कर्माणि करोतु वा मा करोतु-] यास्तव तो समाधि व कर्मे करो कीं न करो.

प्रकाश:- अंत:करण निस्तृष्ण झालें असतां तें अति निर्मल होतें व ही अमूल्य संपत्ति ज्याला मिळाली आहे, तो मुक्तच होय यांत शंका नाहीं. सारांश अशा पुरुषानें ध्यान, कर्में इत्यादि केलीं तरी काय न केलीं तरी काय सारखेंच ! ॥१०२॥

-विद्वानाला कर्तव्य नाहीं, याविषयीं दुसरें वचन-

नैष्कर्म्येण न तस्यार्थस्तस्यार्थोऽस्ति न कर्मभि: ।
न समाधानजप्याभ्यां यस्य निर्वासनं मन: ॥३॥

अन्वयार्थ - [यस्य मन: निर्वासनं अभूत् तस्य नैष्कर्म्येण न अर्थ:-] ज्याचें मन वासनाशून्य झालेलें असतें त्याला नैष्कर्म्यानें-कर्मराहित्यानें-संन्यासानें कांहीं लाभ नाहीं; [च तस्य कर्मभि: न अर्थ:-] तसाच त्याला कर्मापासून लाभ नाहीं [च समाधान-जप्याभ्यां न अर्थ: अस्ति-] व समाधि आणि जप यांपासूनहि कांहीं लाभ नाहीं.

प्रकाश:- ज्याच्या अंत:करणांतील द्वैतविषयक संस्कार बाधित झाले आहेत, त्या धन्य पुरुषांस संन्यास, कर्में, समाधि, जप इत्यादिकांतील कशाचाहि उपयोग नाहीं. ॥१०३॥

-'अहोपण तत्त्वज्ञानेंहि वासनानिवृत्तीसाठीं ध्यान करावें,' म्हणून म्हणाल तर सांगतों -

आत्मासंगस्ततोऽन्यत्स्यादिंद्रजालं हि मायिकम् ।
इत्यचंचलनिर्णीते कुतो मनसि वासना ॥४॥

अन्वयार्थ - [आत्मा असंग: तत: अन्यत् मायिकं इंद्रजालं हि स्यात्-] "आत्मा असंग आहे व त्याहून दुसरें सर्व मायिक इंद्रजाल आहे" [इति अचंचलनिर्णीते मनसि वासना कुत: स्यात्-] असा दृढनिश्चय झाला असतां, मनामध्यें वासना कोठून राहील ?

प्रकाश:- जोंपर्यंत चिदाभास व अंत:करण यांचें अविवेकामुळें ऐक्य होऊन राहिलेलें असते तोंपर्यंतच वासनेस थारा मिळतो. आणि चिदाभास व अंत:करण हे परस्पर विलक्षण असे दोन पदार्थ आहेत, असें एकदा समजलें कीं त्यांना राहण्यास जागाच मिळत नसल्यामुळें ज्ञानी पुरुषाच्या अंत:करणांत वासना राहत नाहींत; असा सिद्धांत आहे. ॥१०४॥

-अर्थात्-

एवं नास्ति प्रसंगोऽपि कुतोऽस्यातिप्रसंजनम् ।
प्रसंगो यस्य तस्यैव शंक्येतातिप्रसंजनम् ॥५॥

अन्वयार्थ- [एवं अस्य प्रसंग: अपि नास्ति-] ह्याप्रमाणें तत्त्वज्ञाला प्रसंगहि जर नाहीं, तर [अतिप्रसंजनं कुत:-] अतिप्रसंग कोठून असणार ? [यस्य प्रसंग: तस्य एव अतिप्रसंजनं शंक्येत-] कारण ज्याला प्रसंग असतो त्याच्याच अतिप्रसंगाची शंका येते.

प्रकाश:- गेल्या चार श्लोकांत विद्वानाचा व्यवहार अनियमित किंवा मनसोक्त होऊं लागेल, असें जें वाद्यानें म्हटलें होतें त्याचें खंडन केलें; व या श्लोकांत त्याचाच उपसंहार केला आहे. या सर्व प्रतिपादनाचें तात्पर्य 'ज्ञानी विधिनिषेधातीत आहे' या एका वाक्यांत आलें आहे ॥१०५॥

-'प्रसंग नसल्यास अतिप्रसंगहि नसतो, हें तुम्ही कशावरून म्हणतां ?' उत्तर -

विध्यभावान्न बालस्य दृश्यतेऽतिप्रसंजनम् ।
स्यात्कुतोऽतिप्रसंगोऽस्य विध्यभावे समे सति ॥६॥

अन्वयार्थ - [विध्यभावात् बालस्य अतिप्रसंजनं न दृश्यते-] विधि नसल्यामुळें बालकाचा अतिप्रसंगहि दिसत नाहीं. [विध्यभावे समे सति अस्य अतिप्रसंग: कुत: स्यात्-] मग विधीचा अभाव सारखाच असतांना तत्त्वज्ञाचाच अतिप्रसंग

कोठून होणार ?

प्रकाश:- लहान बालक विधीचा विषय होत नाहीं व त्यामुळें अति प्रसंगाचाहि त्यास गंध लागत नाहीं. तसाच ज्ञानी विधीचा विषय होत नसल्यामुळें, त्याच्या आचरणांतहि अतिप्रसंग होणार नाहीं. ॥१०६॥

-'अहोपण, बालकाला विधि नसण्याचें कारणं त्याचें अज्ञत्व आहे. तसें विद्वानाला विधि नसण्याचें कांहीं कारण नाहीं !' अशी शंका व तिचें समाधान -

न किंचिद्वेत्ति बालश्चेत्सर्वं वेत्त्येव तत्त्ववित् ।
अल्पज्ञस्यैव विधय: सर्वे स्युर्नान्ययोर्द्वयो: ॥७

अन्वयार्थ - [बाल: किंचित् अपि न वेत्ति इति चेत् तत्त्ववित् सर्वं वेत्ति एव-] 'बालक कांहींहि जाणत नाहीं,' असें जर म्हणशील तर तत्त्वज्ञ सर्व कांहीं जाणतोच. [सर्वे विधय: अल्पज्ञस्य एव स्यु: न अन्ययो: द्वयो:-] अर्थात् सर्व विधि अल्पज्ञाकरितांच आहेत; दुसऱ्या दोघांकरितां नव्हेत.

प्रकाश:- बालक अज्ञ असल्यामुळें जसें तें विधीचा विषय होत नाहीं, तसाच ज्ञानीहि पूर्ण ज्ञानी असल्यामुळें विधीचा विषय होत नाहीं. कारण जो पुरा ज्ञानी नव्हे व जो पुरा अज्ञहि नव्हे तोच विधिशास्त्र व निषेधशास्त्र यांचा विषय होत असतो. ॥१०७॥

-'अहोपण, व्यासादिकांप्रमाणें ज्याच्यामध्यें निग्रहानुग्रहसामर्थ्य असतें तोच तत्त्ववेत्ता होय, दुसरा कोणी नव्हे' अशी शंका व समाधान -

शापानुग्रहसामर्थ्यं यस्यासौ तत्त्वविद्यदि ।
तन्न शापादिसामर्थ्यं फलं स्यात्तपसो यत: ॥८

अन्वयार्थ - [यस्य शापानुग्रहसामर्थ्यं असौ यदि तत्त्ववित् तत् न-] ज्याला शाप देण्याचें व अनुग्रह करण्याचें सामर्थ्य असतें तो तत्त्ववेत्ता असें जर म्हणावें तर तें बरोबर नाहीं, [यत: शापादिसामर्थ्यं तपस: फलं स्यात्-] कारण शापादिकांचें सामर्थ्य हें तपाचें फल आहे.

प्रकाश:- शाप देऊन मत्त पुरुषांचा निग्रह करिता येणें व सत्पुरुषांवर अनुग्रह करितां येणें, हें अलौकिक सामर्थ्य आहे. तपश्चर्येच्या योगानें याची प्राप्ति होत असते. पण ज्ञान व तप यांचा विशेषसा संबंध नाहीं. त्यामुळें जो ज्ञानी असतो, तो तपस्वी असतोच; असा कांहीं नियम नाहीं. व पूर्वोक्त निग्रहानुग्रहसामर्थ्य तर तपस्वी पुरुषामध्येंच असणें शक्य आहे. यास्तव ज्याच्या अंगीं हें सामर्थ्य असेल, तोच ज्ञानी होय; असें म्हणणें युक्त नव्हे. ॥१०८॥

- आतां व्यासादि महर्षी तत्त्वज्ञ व निग्रहानुग्रह-समर्थ होते हें खरें; पण त्यांच्या निग्रहादि सामर्थ्याचा व ज्ञानाचा कांहीं संबंध नाहीं, असें आतां सांगतात -

व्यासादेरपि सामर्थ्यं दृश्यते तपसो बलात् ।
शापादिकारणादन्यत्तपो ज्ञानस्य कारणम् ॥९

अन्वयार्थ - [तपस: बलात् व्यासादे: अपि सामर्थ्यं दृश्यते-] **तपाच्या बलानें व्यासादिकांसहि हें सामर्थ्य होतें, असें दिसतें.** [शापादिकारणात् अन्यत् तप: ज्ञानस्य कारणं भवति-] **पण शापादि सामर्थ्याला कारण होणाऱ्या तपाहून दुसरें तप ज्ञानाला कारण होतें.**

प्रकाश:- व्यासादि महर्षींमध्ये जें निग्रहानुग्रहसामर्थ्य दिसत होतें तें त्यांच्या तपोबलामुळें होय. म्हणजे तो त्यांच्या तपाचा प्रभाव होय. आतां तैत्तिरीयादि उपनिषदांत ज्ञानाकरितां तप करावयासहि सांगितलेलें आहे. पण तें तप निराळें; तप् या धातूचे दोन अर्थ आहेत. एक विचार करणें; व दुसरा संताप करणें. यांतील ज्ञानाकरितां जें तप सांगितलेलें असतें, त्याचा विचार हा अर्थ व देहास कष्ट देऊन सिद्धि मिळविण्याकरितां जें तप केलें जातें, त्याचा संताप हा अर्थ होय. अर्थात् ज्ञानास कारण होणारें तप सिद्धि प्राप्त करून देणाऱ्या तपाहून भिन्न आहे. ॥१०९॥

-'तर मग व्यासादिकांमध्यें तत्त्वज्ञानित्व व शापादिकारणत्व हीं दोन्हीं कशीं ? उत्तर --

द्वयं यस्यास्ति तस्यैव सामर्थ्यज्ञानयोर्जनि: ।
एकैकं तु तत: कुर्वन्नेकैकं लभते फलम् ॥११०

अन्वयार्थ - [यस्य द्वयं अस्ति तस्य एव सामर्थ्यज्ञानयो: जनि:-] ज्याचें दोन्ही प्रकारचें तप असतें; त्याला सामर्थ्य व ज्ञान हीं दोन्हीं प्राप्त होतात. [तत: एकैकं तु कुर्वन् एकैकं फलं लभते-] अर्थात् त्यांतील एकेकच तप करणारास एकेकच फल मिळतें.

प्रकाश:- कारण जसें असेंल तसें कार्य होतें. ज्यानें प्रस्तुत सामर्थ्यास कारण होणारें व ज्ञानास कारण होणारेंहि तप केलें असेल, त्यास पूर्वोक्त सामर्थ्य व ज्ञान या दोघांचीहि प्राप्ति होते. पण ज्यानें यांतील एक एकच केलें असेल, त्यास त्या तपाप्रमाणें एकेकच फल मिळतें हें उघड आहे. ॥११०॥

-'अहोपण, शापादि सामर्थ्यहीन ज्ञानी विधिशून्य जर असला तर विहितानुष्ठान करणारांच्या निंदेला पात्र होईल :' अशी शंका व तिचें समाधान --

सामर्थ्यहीनो निंद्यश्चेद्यतिभिर्विधिवर्जित: ।
निंद्यन्ते यतयोऽप्यन्यैरनिशं भोगलंपटै: ॥१११

अन्वयार्थ - [सामर्थ्यहीन: विधिवर्जित: यतिभि:निंद्य: चेत्-] सामर्थ्यहीन असलेला विहितानुष्ठानरहित ज्ञानी विहित आचरण करणाऱ्यांना निंद्य होतो, ते त्याची निंदा करितात म्हणून म्हणाल तर [यतय: अपि अन्यै: भोगलंपटै: अनिशं निन्द्यन्ते-] त्या विहिताचरण करणारांचीहि निंदा दुसरे विषयलंपट लोक करितात. म्ह० भोगलंपट पामरांना ते निंद्य होतात.

प्रकाश:- ज्ञानी जर सामर्थ्यशून्य असला तर कर्मठ ''अरे हा ढोंगी आहे ! ज्ञानी कसला ? शास्त्रोक्त कर्मे करावयास नकोत म्हणून त्यानें ज्ञान्याचें सोंग घेतलें आहे'' असें स्पष्टपणें म्हणतात. म्हणून जर म्हणावें तर कर्मठांची निंदा विषयी लोक नाहींका करीत ? ''काय हो हा अर्वाच्य मनुष्य आहे ? सकाळीं स्नान करून दोन दोन तास नाक धरून बसतो. असले लोक जगाच्या अगदीं निरुपयोगी असून ते कालाचा अपव्यय करीत असतात. काय म्हणें रोज गीता, उपनिषदें, सूत्रें, यांचा चार चार तास पाठ करीत बसतो ! पुन: पुन: तेंच ते घोटीत बसण्यांत त्याला काय मौज वाटत असेल ती असो ! अमुक अमुक मोठा धार्मिक आहे. कारण तो रोज हजार गायत्रीचा जप करितो पण त्यापासून राष्ट्रास कोणता लाभ होत असेल, तें हरि जाणें'' इत्यादि वाक्यें सामान्य मनुष्यासहि अपरिचित असतीलसें वाटत नाहीं. सारांश, एकानें दुसऱ्याचीं निंदा करणें हें कांहीं मोठेसें प्रमाण नव्हे. कारण खरोखरी पहातां हा अज्ञानाचा परिणाम आहे. ॥१११॥

-'विषयसुखासाठीं तेहि विषयसंपादन करतील' म्हणून म्हणशील तर 'तसें केल्यास त्यांचें यतित्वच नाहींसें होईल,' असें सांगतात -

भिक्षावस्त्रादि रक्षेयुर्यद्येते भोगतुष्टये ।
अहो यतित्वमेतेषां वैराग्यभरमंथरम् ॥११२

अन्वयार्थ - [यदि एते भोगतुष्टये भिक्षावस्त्रादि रक्षेयु:-] जर हे भोगजन्य संतोषासाठीं भिक्षा, वस्त्र इत्यादि पदार्थांचें रक्षण करीत असले, [तर्हि अहो एतेषां वैराग्यभरमंथरं यतित्वम्-] तर वैराग्याच्या भारानें जड झालेलें त्यांचें यतित्व मोठें स्तुत्यच-तारिफ करण्यासारखें आहे, असेंच म्हटलें पाहिजे !

प्रकाश:- भोगजन्य सुखाकरितां जर वस्त्रादिकांचा संग्रह करावयास कोणी यति प्रवृत्त झाला, तर त्याच्या वैराग्याची कितीशी स्तुति करावी; हेंच समजत नाहीं. ॥११२॥

-'विषयलंपट पामरांकडून केल्या जाणाऱ्या निंदेनें कर्मानुष्ठान करणाऱ्या शिष्टांची कांहीं हानि नाहीं,'

म्हणून जर म्हणाल तर 'कर्मानुष्ठानांत तत्पर असलेल्या देहाभिमान्यांकडून केल्या जाणाऱ्या निंदेनें तत्त्ववेत्त्याचीहि कांहीं हानि नाहीं,' असें सांगतात-

वर्णाश्रमपरान्मूढा निंदंत्वित्युच्यते यदि ।
देहात्ममतयो बुद्धं निंदंत्वाश्रममानिनः ।।१३

अन्वयार्थ - [मूढाः वर्णाश्रमपरान् निंदन्तु इति यदि उच्यते-] मूढ लोक वर्ण व आश्रम याप्रमाणें चालणारांची निंदा करितात असें जर म्हणशील [तर्हि आश्रममानिनः देहात्ममतयः बुद्धं निंदन्तु-] तर आश्रमाचा अभिमान बाळगणारे देहात्मबुद्धि पुरुषहि तत्त्वज्ञाची निंदा करीनात (असें आम्ही म्हणतों.)

प्रकाशः- मूढांच्या निंदेनें वर्णाश्रमाभिमान्याची जशी कांहीं हानि होत नाहीं, तशीच वर्णाश्रमाभिमान्याच्या निंदेनें ज्ञानी पुरुषाचीहि कांहीं हानि नाहीं. ।।११३।।

-याप्रमाणें प्रासंगिक विचार संपवून प्रकृत विषयास अनुसरतात -

तदित्थं तत्त्वविज्ञाने साधनानुपमर्दनात् ।
ज्ञानिनाऽऽचरितुं शक्यं सम्यग्राज्यादि लौकिकम् ।।१४

अन्वयार्थ - [तत् इत्थं तत्त्वविज्ञाने सति-] ह्याप्रमाणें तत्त्वसाक्षात्कार झाला असतां [साधनानुपमर्दनात्-] देह, इंद्रियें इत्यादि साधनांचा ध्वंस होत नसल्यामुळें [ज्ञानिना लौकिकं राज्यादि सम्यक् आचरितुं शक्यम्-] ज्ञान्याला लौकिक राज्य इत्यादि कर्म उत्तम प्रकारें करितां येणें शक्य आहे.

प्रकाशः- ह्या प्रकरणाच्या सत्यायशींव्या श्लोकांत ज्ञानी लौकिक कर्म उत्तम प्रकारें करूं शकतो, असें जें म्हटलें होतें त्यावर येणाऱ्या शंकांचें एवढा वेळ समाधान केलें; व आतां त्यांचा येथें उपसंहार करीत आहेत. ।।११४।।

-'अहोपण, प्रपंच मिथ्या आहे असें ज्ञान झाल्यामुळें तत्त्ववेत्त्याला त्याविषयीं इच्छाच होणार नाहीं' असें म्हणशील तर 'त्याला स्वकर्मानुसार वागूं दे' असें सांगतात-

मिथ्यात्वबुद्ध्या तत्रेच्छा नास्ति चेत्तर्हि माऽस्तु तत् ।
ध्यायन्वाऽथ व्यवहरन्यथाऽऽरब्धं वसत्वयम् ।।१५

अन्वयार्थ - [मिथ्यात्वबुद्ध्या तत्र इच्छा नास्ति इति चेत्-] मिथ्यात्वबुद्धीमुळें त्याला प्रपंचाविषयीं इच्छाच नसते असें जर म्हणावें [तर्हि तत् मा अस्तु-] तर ती नसेना ! [अयं ध्यायम् अथवा व्यवहरन् सन् यथारब्धं वसतु-] हा ध्यान किंवा व्यवहार करीत प्रारब्धाप्रमाणें राहो.

प्रकाशः- 'प्रपंच मिथ्या आहे' असें समजल्यामुळें ज्ञान्यास प्रपंचांतील कोणत्याहि पदार्थांची इच्छा होणार नाहीं; असें जरी म्हटलें, तरी तें आम्हांस इष्टच आहे. कारण प्रपंचाविषयीं ह्यास इच्छा झालीच पाहिजे असा आमचा कोठें आग्रह आहे ? ती न झाली तर चांगलेंच. पण ज्ञान्यासहि इच्छा होते असा प्रत्यय येत असल्यास ती कां होते व तिच्यामुळें ज्ञानास बाध येतो कीं काय हें सांगणें आमचें काम आहे. व प्रारब्धाचें अतिक्रमण कोणाच्यानेंहि होणें शक्य नसल्यामुळें ज्ञानी त्यास अनुसरून पाहिजे तर ध्यान करो किंवा, व्यवहार करो. प्रारब्ध कर्म विचित्र असल्यामुळें त्यानें अमुकच करावें असा आम्हांस नियम करितां येत नाहीं. ।।११५।।

-पण उपासकाची स्थिति याहून भिन्न आहे, असें सांगतात -

उपासकस्तु सततं ध्यायन्नेव वसेद्यतः ।
ध्यानेनैव कृतं तस्य ब्रह्मत्वं विष्णुतादिवत् ।।१६

अन्वयार्थ - [उपासकः तु सततं ध्यायन् एव वसेत्-] परंतु उपासकानें सदा ध्यान करीतच असावें

[यत: विष्णुतादिवत् तस्य ब्रह्मत्वं ध्यानेन एव कृतम्-] कारण विष्णुत्वादिकांप्रमाणें त्याचें ब्रह्मत्व ध्यानानेंच केलेलें असतें.

प्रकाश:- उपासकास ब्रह्मत्वाचें सदा ध्यानच करावयास पाहिजे. कारण सगुणोपासकाची विष्णुत्व, शिवत्व इत्यादि उपास्य देवतेविषयींची भावना जशी ध्यानानेंच होत असते, तशीच ब्रह्मत्वाविषयींची भावनाहि त्याच्या ध्यानाच्या योगानेंच होणें शक्य आहे, पण ध्यानाच्या योगानें होणारी कोणतीहि भावना पारमार्थिक नसते. ॥११६॥

-'ध्यानानें संपादन केलेल्याहि ब्रह्मत्वाला पारमार्थिकत्व कां नसावें ?' अशी आशंका घेऊन 'ध्यानसंपादित वस्तूचा ध्यान सोडतांच बाध होत असतो. म्हणून त्याला पारमार्थिकत्व नाहीं' असें सांगतात-

ध्यानोपादानकं यत्तद्ध्यानाभावे विलीयते ।
वास्तवी ब्रह्मता नैव ज्ञानाभावे विलीयते ॥१७

अन्वयार्थ - [यत् ध्यानोपादानकं तत् ध्यानाभवे विलीयते-] ज्याचें ध्यान हेंच उपादान कारण असतें, तें ध्यानाच्या अभावीं नष्ट होतें. [वास्तवी ब्रह्मता तु ज्ञानाभावे न विलीयते एव-] पण पारमार्थिक ब्रह्मता ज्ञानाच्या अभावीं कधींहि लीन होत नाहीं.

प्रकाश:- विष्णु, शिव, इत्यादि इष्ट ध्येय किंवा वाणी ही धेनु आहे; श्रद्धा पत्नी आहे, इत्यादि आरोपित ध्येय सर्वदा ध्यानावर अवलंबून असतें. म्हणजे जोंपर्यंत त्या त्या ध्येयाचें साधक इतर वृत्तिशून्य मनानें चिंतन करीत असतो तोंपर्यंतच त्यांचें अस्तित्व असतें. व वृत्ति अन्य विषयाकडे गेली कीं ध्येय त्या ध्यानाबरोबरच लीन होतें. पण ब्रह्मत्वाची अशी स्थिति नसते. तें पारमार्थिक सत्य असल्यामुळें त्याविषयीं वृत्तिरूप प्रमाणभूत ज्ञान जरी नसलें तरी ब्रह्मता लीन होत नाहीं. ॥११७॥

-'तें वास्तविक असल्यामुळें ज्ञानानें उत्पन्न केलें जात नाहीं,' असें सांगतात -

ततोऽभिज्ञापकं ज्ञानं न नित्यं जनयत्यद: ।
ज्ञापकाभावमात्रेण न हि सत्यं विलीयते ॥१८

अन्वयार्थ - [यत: अद: ब्रह्मत्वं नित्यं तत: ज्ञानं तस्य अभिज्ञापकं, न जनयति-] ज्याअर्थीं हें ब्रह्मत्व नित्य आहे त्याअर्थीं ज्ञान त्याचें अवबोधक आहे, तें त्याला उत्पन्न करीत नाहीं [च सत्यं ज्ञापकाभाव-मात्रेण न विलीयते हि-] व जें सत्य असतें तें केवल त्याचा बोध करविणारें-ज्ञापक प्रमाण - नाहीं एवढ्याच कारणानें लीन होत नाहीं.

प्रकाश:- परम नित्य जें ब्रह्म त्यास वृत्तिज्ञान उत्पन्न करूं शकत नाहीं. तर तें त्याचा केवल बोध करूं शकतें. व तो तरी अज्ञानावस्थ मनुष्यालाच होणार हें उघड आहे. अर्थात् केवल ज्ञापक ज्ञान नसलें कीं, या सत्य ब्रह्मत्वाचाहि लोप होतो हें म्हणणें व्यर्थ आहे. उदाहरणार्थ - असें पहा कीं आपण एखादे वेळीं एखादें पुस्तक वाचण्यांत निमग्न होऊन गेलेले असतों व त्यामुळें तेथें असलेल्या सूर्याच्या किंवा दिव्याच्या प्रकाशाचें आपणांस त्यावेळीं भानहि नसतें. पण तेवढ्यामुळें ज्या प्रकाशामुळें आम्ही वाचूं शकलों तो प्रकाश नव्हता असें म्हणतां येईल का ? कधींहि नाहीं. तसाच प्रकार येथेंहि समजावा. वृत्ति एकदेशी असल्यामुळें ती सर्वच पदार्थाचें एकदम ग्रहण करूं शकत नाहीं. ॥११८॥

-'अहोपण, ज्ञान्याप्रमाणें उपासकाचेंहि ब्रह्मत्व पारमार्थिकच आहे' उत्तर -

अस्त्येवोपासकस्यापि वास्तवी ब्रह्मतेति चेत् ।
पामराणां तिरश्चां च वास्तवी ब्रह्मता न किम् ॥१९

अन्वयार्थ - [उपासकस्य अपि वास्तवी ब्रह्मता अस्ति एव इति चे-] उपासकाचीही पारमार्थिक ब्रह्मता आहेच असें जर म्हणाल, तर [पामराणां च तिरश्चां वास्तवी ब्रह्मता न किं-] विषयी लोक व पशु,

पक्षी इत्यादि तिर्यक् प्राणी यांना वास्तविक ब्रह्मता नाहीं कीं काय ?

प्रकाश:- उपासक अन्य दृष्टीनें पामरादिकांहून कितीहि जरी श्रेष्ठ असला तरी ब्रह्मत्वाच्या दृष्टीनें त्यांच्या वर्गांतच येतो असें याचें तात्पर्य समजावें. ॥११९॥

-'पामरादिकांना ब्रह्मत्व जरी असलें तरी तें त्यांना अज्ञात असल्यामुळें पुरुषार्थोपयोगी नाहीं,' अशी शंका व समाधान -

अज्ञानादपुमर्थत्वमुभयत्रापि तत्समम् ।
उपवासाद्यथा भिक्षा वरं ध्यानं तथान्यत: ॥२०

अन्वयार्थ - [अज्ञानात् अपुमर्थत्वं उभयत्र अपि समम्-] अज्ञानामुळें अपुरुषार्थत्व दोन्हीं ठिकाणीं एक सारखेंच आहे. [यथा उपवासात् भिक्षा तथा अन्यत: ध्यानं वरं-] जशी उपवासापेक्षां भिक्षा बरी, तसेंच दुसऱ्या साधनांहून ध्यान बरें.

प्रकाश:- आत्मसाक्षात्कार न झाल्यामुळें होणारा जो बंध तो ध्यान करणारा उपासक व पामर, पशु पक्षी इत्यादि प्राणी यांना सारखाच होणार, आतां एवढें मात्र खरें कीं 'उपवासापेक्षां भिक्षा बरी' असें जसें लोक म्हणतात, त्याप्रमाणें अगदींच पशुतुल्य राहण्यापेक्षा किंवा दुसऱ्या क्षुद्र उपायांचें अनुष्ठान करण्यापेक्षां ध्यान करणें चांगलें. ॥१२०॥

-इतर अनुष्ठानापेक्षां ध्यानाचें श्रेष्ठत्व दाखवितात-

पामराणां व्यवहृतेर्वरं कर्माद्यनुष्ठिति: ।
ततोऽपि सगुणोपास्तिर्निर्गुणोपासना तत: ॥२१

अन्वयार्थ - [पामराणां व्यवहृते: कर्माद्यनुष्ठिति: वरम्-] पामरांच्या पशुप्राय व्यवहारापेक्षां कर्मादि उपायांचें अनुष्ठान करणें चांगलें. [तत: अपि सगुणोपास्ति:-] त्याहूनहि सगुणोपासना व [तत: निर्गुणोपासना-] त्याहून निर्गुणोपासना उत्तम होय.

प्रकाश:- कर्मादि या शब्दांतील आदि या पदानें ईश्वरनामस्मरण, त्याच्या गुणांचें कीर्तन, इत्यादि उपाय समजावे. सगुणोपासना दोन प्रकारची आहे. एक प्रतीकोपासना व दुसरी अहंग्रहोपासना. प्रतीकोपासनाहि दोन प्रकारची आहे. एक कांहीं तरी प्रतीक घेऊन त्याची उपासना करणें व दुसरी सर्व सृष्टीचें प्रतीक करणें. यांतील पहिलीचें 'नाम हेंच ब्रह्म आहे असें समजून उपासना करावी' हें व दुसरीचें 'हें सर्व जगत्च ब्रह्म आहे' हें उदाहरण होय. ह्याप्रमाणें, अहंग्रहोपासनाहि दोन प्रकारची आहे. एक 'मी विष्णु आहें' असें समजून उपासना करणें व दुसरी 'मी व हें सर्व जग वासुदेव होय' असें समजून उपासना करणें. निर्गुणोपासना आतां स्पष्ट होणारच आहे. ॥१२१॥

- यांच्या उत्तरोत्तर श्रेष्ठत्वाचें कारण -

यावद्विज्ञानसामीप्यं तावच्छ्रैष्ठ्यं विवर्धते ।
ब्रह्मज्ञानायते साक्षान्निर्गुणोपासनं शनै: ॥२२

अन्वयार्थ - [यावत् विज्ञानसामीप्यं तावत् श्रैष्ठ्यं विवर्धते-] जितकें विज्ञानाचें सामीप्य असेल तितकें उपायांचें श्रेष्ठत्व वाढतें. निर्गुणोपासनेला सर्वांत श्रेष्ठ म्हणण्याचें कारण - [निर्गुणोपासनं शनै: साक्षात् ब्रह्मज्ञानायते-] निर्गुणोपासना हळुहळू साक्षात् ब्रह्मज्ञानच होते.

प्रकाश:- कर्मादिक जे अनेक उपाय आहेत, त्यांच्यामध्ये ज्ञानसमीपतेप्रमाणें श्रेष्ठत्व येत असतें. म्हणजे जो उपाय ज्ञानाच्या अगदीं जवळ असतो, तो अधिक श्रेष्ठ व जो अगदीं दूर तो अगदीं निकृष्ट होय. या न्यायानें निर्गुण उपासना थोड्याच वेळांत साक्षात् ब्रह्मज्ञानरूप होत असल्यामुळें सर्वांत श्रेष्ठ होय. ॥१२२॥

-हेंच दृष्टान्तानें दृढ करितात -

यथा संवादिविभ्रांति: फलकाले प्रमायते ।
विद्यायते तथोपास्तिर्मुक्तिकालेऽतिपाकत: ॥२३

अन्वयार्थ - [यथा संवादिविभ्रांति: फलकाले प्रमायते-] ज्याप्रमाणें संवादिभ्रम फलसमयीं प्रमारूप होतो, [तथा उपास्ति: अतिपाकत: मुक्तिकाले विद्यायते-] त्याप्रमाणें उपासना पूर्ण पक्व झाल्यामुळें मुक्तिसमयीं ज्ञानरूप होते.

प्रकाश:- संवादीभ्रम प्रथमत: जरी भ्रम असला तरी फलसमयीं कसा खरा होत असतो, हें मागें स्पष्ट झालें आहे. त्याप्रमाणें निर्गुण उपासनाहि परिपक्व झाली असतां मुक्तिसमयीं विद्यारूप होते. ॥१२३॥

-'पण संवादी भ्रम स्वत:च यथार्थज्ञानरूप नसतो; तर त्या भ्रमानें प्रवृत्त झालेल्या पुरुषाच्या इंद्रियांचा विषयाशीं संनिकर्ष होऊन यथार्थज्ञान होतें' अशी शंका व समाधान -

संवादिभ्रमत: पुंस: प्रवृत्तस्यान्यमानत: ।
प्रमेति चेत्तथोपास्तिर्मान्तरे कारणायताम् ॥२४

अन्वयार्थ - [संवादिभ्रमत: प्रवृत्तस्य पुंस: अन्यमानत: प्रमा इति चेत्-] संवादिभ्रमामुळें प्रवृत्त झालेल्या पुरुषाला दुसऱ्या प्रमाणाच्या योगानें यथार्थ ज्ञान होतें, असें जर म्हणशील तर [तथा उपास्ति: मान्तरे कारणायताम्-] तशीच उपासनाहि दुसऱ्या यथार्थ ज्ञानाचें कारण होऊं दे.

प्रकाश:- संवादि भ्रम कसा कां असेना पण तो यथार्थ ज्ञानास कारण होतो ना ? तशीच उपासनाहि ब्रह्मज्ञानास कारण होते असें समजावें म्हणजे वाद मिटला. ॥१२४॥

-'असें जर म्हटलें तर मूर्तिध्यानादिकहि चित्तैकाग्र्य संपादन करून त्याच्या द्वारा अपरोक्ष ज्ञानाचें साधन होईल !' उत्तर -

मूर्तिध्यानस्य मंत्रादेरपि कारणता यदि ।
अस्तु नाम तथाप्यत्र प्रत्यासत्तिर्विशिष्यते ॥२५

अन्वयार्थ - [यदि मंत्रादे: मूर्तिध्यानस्य अपि कारणता तर्हि अस्तु नाम-] मंत्रजप, मूर्तींचें ध्यान इत्यादिकांसहि ज्ञानकारणता आहे, असें जर म्हटलें तर ती असेना. [तथापि अत्र प्रत्यासत्ति: विशिष्यते-] पण निर्गुण उपासनेमध्यें ज्ञानाची समीपता हा विशेष आहे.

प्रकाश:- मंत्राचा जप, विष्णु, कृष्ण, राम इत्यादि मूर्तींचें ध्यान इत्यादि उपायहि ज्ञानसाधनें आहेत यांत शंका नाहीं. पण निर्गुण उपासना ज्ञानाच्या अगदीं समीप आहे. अर्थात् जप, ध्यान इत्यादिकांपेक्षां यांत कांहीं विशेष आहे. ॥१२५॥

-निर्गुण उपासना ब्रह्मज्ञानाच्या समीप कशी आहे तें सांगतात -

निर्गुणोपासनं पक्वं समाधि: स्याच्छनैस्तत: ।
य: समाधिर्निरोधाख्य: सोऽनायासेन लभ्यते ॥२६

अन्वयार्थ - [निर्गुणोपासनं यदा पक्वं भवति तदा शनै: समाधि: स्यात्-] निर्गुण उपासना जेव्हां पक्व होते, तेव्हां तीच हळुहळू सविकल्प समाधि होते. [तत: शनै: निरोधाख्य: य: समाधि: स: अनायासेन लभ्यते-] त्यानंतर सविकल्प समाधीपासून हळुहळू 'निरोध-' नामक समाधि अनायासानें प्राप्त होते.

प्रकाश:- निर्गुण उपासनेचा परिणाम सविकल्प समाधीमध्यें व तिचा निर्विकल्पसमाधीमध्यें होतो. आतां योग्यांची निर्विकल्पसमाधि व वेदांत्यांचा आत्मसाक्षात्कार यांत किंचित् फरक आहे. पण त्याचा आतां क्रमानेंच विचार व्हावयाचा असल्यामुळें येथें विस्तार करण्याचें कांहीं कारण नाहीं. ॥१२६॥

-निर्विकल्पसमाधीपासून कोणता लाभ होतो तें सांगतात -

निरोधलाभे पुंसोऽन्तरसङ्गं वस्तु शिष्यते ।
पुन: पुनर्वासितेऽस्मिन्वाक्याज्जायेत तत्त्वधी: ॥२७

अन्वयार्थ - [निरोधलाभे सति पुंस: अंत: असंगं वस्तु शिष्यते-] या निर्विकल्प समाधीचा लाभ झाला असतां पुरुषाच्या शरीरांत असंग वस्तु अवशिष्ट

राहते [अस्मिन् पुन: पुन: वासिते सति वाक्यात् तत्त्वधी: जायेत-] व तिचीच पुन: पुन: भावना केली असतां वाक्यावरून तत्त्वज्ञान उत्पन्न होतें.

प्रकाश:- प्रस्तुत समाधींत सर्व वृत्तींचा निरोध होत असतो. व त्यामुळें पतंजलींनीं हिला निर्बीज समाधी असें म्हटलें आहे. हिचा लाभ झाला असतां अर्थातच असंग वस्तु म्हणजे निरुपाधिक कूटस्थ चैतन्य राहतें. व त्याचीच वारंवार भावना केली असतां 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांच्या श्रवणानें त्या मुख्य अधिकारी पुरुषास आत्मसाक्षात्कार होतो. ॥१२७॥

-आतां तत्त्वज्ञानाचें स्वरूपच विषद करितात -

निर्विकारासंगनित्यस्वप्रकाशैकपूर्णता: ।
बुद्धौ झटिति शास्त्रोक्ता आरोहन्त्यविवादत: ॥२८

अन्वयार्थ - [शास्त्रोक्ता: निर्विकारासंगनित्यस्वप्रकाशैकपूर्णता: बुद्धौ झटिति अविवादत: आरोहन्ति-] शास्त्रोक्त निर्विकारित्व, असंगत्व, नित्यत्व, स्वप्रकाशत्व, एकत्व व पूर्णत्व हे भाव बुद्धीमध्यें तत्काल नि:शंकपणें उभे राहतात.

प्रकाश:- निर्विकल्पसमाधीच्या सतत अभ्यासामुळें शास्त्रानें सांगितलेले आत्म्याचे सर्व कल्पित धर्म आत्म्याच्या ठायीं कसे राहतात, तें समजतें. व त्यामुळें आत्म्याचें लक्ष्यरूप प्रत्ययास येतें. ॥१२८॥

-'अहोपण, निर्विकल्पसमाधीमुळें अपरोक्षज्ञान उत्पन्न होतें, याविषयीं प्रमाण काय ?' 'अमृतबिंद्वादि सर्व उपनिषदें याविषयीं प्रमाण आहेत' असें उत्तर -

योगाभ्यासस्त्वेतदर्थोऽमृतबिन्द्वादिषु श्रुत: ।
एवं च दृष्टद्वारापि हेतुत्वादन्यतो वरम् ॥२९

अन्वयार्थ - [अमृतबिंद्वादिषु तु योगाभ्यास: एतदर्थ: श्रुत: अस्ति-] अमृतबिंदु, कठ, इत्यादि उपनिषदांमध्यें तरी योगाभ्यास ह्याकरितांच सांगितलेला आहे. [एवं च दृष्टद्वारा अपि हेतुत्वात् अन्यत: वरम्-] याप्रमाणें निर्गुणोपासनेलाहि अपरोक्ष ज्ञानाचें सामीप्य संभवत असल्यामुळें निर्विकल्प समाधीच्या द्वाराहि ती ज्ञानसाधन आहे. त्यामुळें सगुणोपासनादिकांहून ती श्रेष्ठ आहे.

प्रकाश:- अमृतबिंदू, कठ, कैवल्य इत्यादि अनेक उपनिषदांतून योगाभ्यास करण्याविषयीं जें सांगितलेलें आढळतें, ते तरी या निर्विकल्पसमाधीकरितांच होय. या समाधीच्याद्वारा पुढें अपरोक्ष ज्ञान होतें. सारांश, दृष्ट व अदृष्ट या दोघांच्याहि द्वारा निर्गुण उपासना आत्मसाक्षात्कारास कारण होत असल्यामुळें ती-कर्में, सगुण उपासना, इत्यादिकांकडून श्रेष्ठ होय. ज्याचें फल या जन्मींच किंवा तात्काल मिळतें तें दृष्ट व ज्याचें परलोकीं किंवा कालांतरानें मिळतें तें अदृष्ट होय. कर्मादि उपायांचे फल अदृष्ट असतें व निर्गुण उपासनेचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष किंवा दृष्ट व अदृष्ट असतें. तस्मात् ती ज्ञानाच्या समीप असते असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. त्यामुळेंच ती श्रेष्ठ होय. ॥१२९॥

-याप्रमाणें निर्गुणोपासना अपरोक्ष ज्ञानाचें साधन आहे, असें सिद्ध झालें असतां तिचा त्याग करून अन्य साधनांमध्यें जे प्रवृत्त झालेले असतात त्यांना वृथा श्रम मात्र होतो, असें लौकिक न्यायाचें प्रदर्शन करून सांगतात-

उपेक्ष्य तत्तीर्थयात्राजपादीनेव कुर्वताम् ।
पिंडं समुत्सृज्य करं लेढीति न्याय आपतेत् ॥३०

अन्वयार्थ - [तत उपेक्ष्य तीर्थयात्राजपादीन् एव कुर्वताम् -] त्या निर्गुण उपासनेची उपेक्षा करून तीर्थयात्रा, जप इत्यादि करणारांवर ['पिंडं समुत्सृज्य करं लेढि' इति न्याय: आपतेत् -] 'लोण्याचा गोळा टाकून हात चाटतो' हा न्याय प्राप्त होतो.

प्रकाश:- निर्गुण उपासना परम फलदायक आहे. पण सर्वांनाच ती आवडत नाहीं. बरेंच लोक तिचा त्याग करून तीर्थयात्रा, जप, इष्टपूर्त कर्में इत्यादिकांतच

निमग्न होऊन राहतात. पण हातांतील लोण्याचा गोळा टाकून देऊन हात चाटीत बसण्याप्रमाणें त्यांचें तें कृत्य उपहासास्पद होय. ॥१३०॥

-'तर मग तत्त्वविचार सोडून निर्गुणोपासना करीत बसणारांनाहि हाच न्याय लागू होतो' म्हणून म्हणाल तर, 'खरें आहे' असें सांगतात -

उपासकानामप्येवं विचारत्यागतो यदि ।
बाढं तस्माद्विचारस्यासंभवे योग ईरित: ॥३१

अन्वयार्थ - [विचारत्यागत: उपासकानां अपि यदि एवं बाढं-] विचाराच्या त्यागामुळें उपासकांकडेहि प्रस्तुत दोष येतो असें जर म्हणाल तर तें खरें आहे, पण [तस्मात् एव विचारस्य असंभवे योग: ईरित: अस्ति-] त्याकरितांच विचाराचा असंभव झाल्यास योग सांगितलेला आहे.

प्रकाश:- या श्लोकांतील योग या शब्दाचा- उपासना किंवा अभ्यासयोग-असा अर्थ करावा. पूर्वोक्त दोष निर्गुण उपासकांवरहि येतो हें खरें; पण काय करावें ? त्यावांचून विचारच होत नाहीं असें समजल्यामुळें शास्त्रकारांनीं निर्गुण उपासनेचें विधान केलें आहे. सारांश, विचार जर आपोआप होता, तर प्रस्तुत उपासनेची अवश्यकता नाहीं असें म्हणतां आलें असतें ॥१३१॥

-तत्त्वविचार न संभवण्याचें कारण -

बहुव्याकुलचित्तानां विचारात्तत्त्वधीर्न हि ।
योगो मुख्यस्ततस्तेषां धीदर्पस्तेन नश्यति ॥३२

अन्वयार्थ - [बहुव्याकुलचित्तानां हि विचारात् तत्त्वधी: न-] ज्यांचें चित्त अतिशय व्याकुल झालेलें असतें, त्यांना ज्याअर्थीं विचारामुळें तत्त्वज्ञान होत नाहीं; [तत: तेषां योग: मुख्य:-] त्याअर्थीं त्यांना योगच मुख्य आहे. [तेन धीदर्प: नश्यति-] त्याच्या योगानें बुद्धीचा दर्प नष्ट होतो.

प्रकाश:- चित्त मलिन असल्यास विचारच होऊं शकत नाहीं. मग त्याच्या योगानें प्राप्त होणारें तत्त्वज्ञान तर दूरच राहिले. यास्तव अशा व्यग्र चित्ताच्या लोकांकरिता प्रस्तुत योग मुख्य आहे. कारण त्याच्या योगानें उपासकाच्या बुद्धींतील दोष नष्ट होत असतो. ॥१३२॥

- याप्रमाणें ज्यांचें चित्त व्याकुल असतें त्यांना योगच मुख्य आहे, असें सांगून ज्यांचें चित्त तसें नसतें त्यांना विचारच मुख्य आहे, असें सांगतात -

अव्याकुलधियां मोहमात्रेणाच्छादितात्मनाम् ।
सांख्यनामा विचार: स्यान्मुख्यो झटिति सिद्धिद: ॥३३

अन्वयार्थ - [अव्याकुलधियां मोहमात्रेण आच्छादितात्मनां-] ज्यांची बुद्धि व्याकुल नाहीं पण केवल मोहानें आच्छादित झालेली आहे अशा जिज्ञासूंना [सांख्यनामा विचार: मुख्य: स्यात्-] सांख्यसंज्ञक तत्त्वविचार मुख्य आहे. कारण [झटिति सिद्धिद:-] तो झटकन् सिद्धि देणारा आहे.

प्रकाश:- ज्यांच्या बुद्धीमध्यें विक्षेप राहिला नसेल पण केवळ मोहामुळें आत्मा आच्छादित झाल्यासारखा होऊन राहिला असेल, त्या उत्तम अधिकाऱ्यांकरितां ज्याला 'सांख्य' हें नांव आहे असा तत्त्वविवेक मुख्य होय; असें सांगितलेलें आहे. कारण प्रस्तुत विचार साधकास तात्काल सिद्धि देतो. ॥१३३॥

-सांख्य व योग या दोहोंनाहि तत्त्वज्ञानाच्या द्वाराच मुक्तिसाधनत्व आहे, याविषयीं गीतावाक्याचें प्रमाण-

यत्सांख्यै: प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं सांख्यं च योगं च य: पश्यति स पश्यति ॥३४

अन्वयार्थ - [यत् स्थानं सांख्यै: प्राप्यते तत् योगै: अपि गम्यते-] जें स्थान सांख्यांकडून प्राप्त करून घेतलें जातें तेंच योग्यांकडूनहि मिळविलें जातें. [अत: य: सांख्यं च योगं एकं पश्यति स:

पश्यति-] यास्तव जो सांख्य व योग फलत: एकच आहेत असें समजतो, तोच शास्त्रार्थ बरोबर जाणतो.

प्रकाश:- सांख्य म्हणजे तत्त्वज्ञानरूप योग व योग म्हणजे निष्कर्मरूप योग असें सर्व अद्वैतवाद्यांस मान्य आहे. हे दोन्ही एकच फल देणारे असल्यामुळें भिन्न नाहींत; असें ज्यास समजतें त्यासच खरा शास्त्रार्थ समजतो असें ज्ञानी म्हणतात. पंडित अच्युतरायांनीं सांख्य म्हणजे कापिलशास्त्र व योग म्हणजे पातंजल शास्त्र; आणि 'ब्रह्म व आत्मा एक आहेत' ह्या ज्ञानास प्रतिबंध करणाऱ्या दोषांचा नाश करणें हें त्यांचें एक फल-असें म्हटलें आहे. व तोच अर्थ ग्रंथकारांसहि येथें मान्य आहे असें पुढच्या श्लोकावरून दिसतें. ॥१३४॥

-केवल गीतावाक्यच नव्हे तर तन्मूलभूत श्रुतीहि याविषयीं प्रमाण आहे, असें सांगतात -

तत्कारणं सांख्ययोगाधिगम्यमिति हि श्रुति: ।
यस्तु श्रुतेर्विरुद्ध: स आभास: सांख्ययोगयो: ॥३५

अन्वयार्थ - ['तत्कारणं सांख्ययोगाधिगम्यं' इति श्रुति: अस्ति-] 'तत्कारणं सांख्य०' इत्यादि, श्रुति-श्वेताश्व. ६.-१३. प्रसिद्ध आहे. [य: तु सांख्ययोगयो: श्रुते: विरुद्ध: अर्थ: स: आभास:-] **पण श्रुतीच्या विरुद्ध असा जो सांख्य व योगशास्त्रांमध्यें अर्थ आहे तो आभास होय.**

प्रकाश:- श्वेताश्वतरोपनिषदामध्यें सहाव्या अध्यायाच्या तेराव्या मंत्राचा उत्तरार्ध-जगाच्या सृष्ट्यादिकांचें कारण व सांख्य आणि योग यांच्या योगानें प्राप्त होण्यासारखें असें जें स्वयंप्रकाश तत्त्व आहे, त्यास जाणिलें असतां पुरुष मुक्त होतो-अशा अर्थाचा आहे. व तेंच आमच्या व पूर्वोक्त प्रतिपादनास प्रबल प्रमाण होय. आतां शारीरक मीमांसेमध्यें योग व सांख्य या शास्त्रांचें खंडन केलें आहे हें खरें; पण त्याचा अर्थ असा समजावयाचा कीं, श्रुतिविरुद्ध असें जें त्या शास्त्रांतून प्रतिपादन केलेलें आहे, तें वेदान्तास मान्य नाहीं. ॥१३५॥

-'अहोपण, उपासक तत्त्वज्ञान होण्यापूर्वीच जर मरण पावला तर त्याचा मोक्ष कसा सिद्ध होणार ?' उत्तर-

उपासनं नातिपक्वमिह यस्य परत्र स: ।
मरणे ब्रह्मलोके वा तत्त्वं विज्ञाय मुच्यते ॥३६

अन्वयार्थ - [यस्य उपासनं इह अतिपक्वं न-] **ज्याची उपासना या जन्मीं अति परिपक्व होत नाहीं** [स: परत्र मरणे, ब्रह्मलोके वा तत्त्वं विज्ञाय मुच्यते-] **तो दुसऱ्या जन्मीं तत्त्वज्ञ होऊन मुक्त होतो; उपासना परिपक्व झाली असल्यास त्यास मरणसमयीं ज्ञान होतें किंवा ब्रह्मलोकाविषयीं वासना राहिलेली असल्यास तो ब्रह्मलोकीं जातो व तेथें त्यास ज्ञान होऊन मुक्ति मिळते.**

-मरणसमयीं तत्त्वज्ञान होऊन मुक्ति मिळते, याविषयीं प्रमाण -

यं यं वाऽपि स्मरन् भावं त्यजत्यंते कलेवरम्।
तं तमेवैति यच्चित्तस्तेन यातीति शास्त्रत: ॥३७

अन्वयार्थ - [अपि वा यं यं भावं स्मरन् अंते कलेवरं त्यजति-] **किंवा ज्या ज्या भावाचें स्मरण करीत अंतकाली प्राणी शरीर सोडतो** [तं तं एव एति-] **त्या त्या भावालाच तो जातो;** [च यच्चित्त: तेन याति इति शास्त्रत:-] **व 'जसें त्याचें चित्त होतें त्याच्या द्वाराच तो जातो' (प्र. ३.१०) इत्यादि शास्त्रवचनें असल्यामुळें अंतसमयीं उपासना परिपक्व झाल्यास ज्ञान होणें शक्य आहे.**

प्रकाश:- उपासना परिपक्व झालेली नसल्यास साधकास पुनर्जन्म घ्यावा लागतो व ती परिपक्व झालेली असल्यास व कोणत्याहि प्रकारची इच्छा राहिलेली

नसल्यास त्यास मरणसमयीं तत्त्वज्ञान होतें व ब्रह्म लोकाची वगैरे इच्छा राहिलैली असल्यास त्यास ब्रह्मलोकीं गेल्यावर कांहीं कालानें ज्ञान होतें. याविषयीं श्रुति व स्मृतिप्रमाणें आहेत. येथें घेतलेलें 'यं यं वा' इत्यादि वचन भगवद्गीतेंतील आहे. व 'यच्चित्त:' इत्यादि काण्वश्रुति आहे. ॥१३६; १३७॥

-'पण, पूर्वोक्त श्रुति-स्मृतिवचनें अंत्य प्रत्ययाप्रमाणें पुढचा जन्म मिळतो एवढेंच सांगत आहेत. ज्ञानाच्या योगानें मोक्ष होतो असें सांगत नाहींत' अशी शंका व समाधान -

अन्त्यप्रत्ययतो नूनं भावि जन्म तथा सति ।
निर्गुणप्रत्ययोऽपि स्यात्सगुणोपासने यथा ॥३८

अन्वयार्थ - [नूनं अन्त्यप्रत्ययत: भावि जन्म-] अंतकालच्या भावनेमुळें पुढचा जन्म मिळतो, हें खरें; [तथा सति यथा सगुणोपासने तथा निर्गुणप्रत्यय: अपि स्यात्-] पण तसा निश्चय झाला असतां ज्याप्रमाणें सगुणोपासनेमध्यें त्याप्रमाणेंच निर्गुणोपासकासहि निर्गुण ब्रह्माचा प्रत्यय येईल !

प्रकाश:- पूर्वोक्त वाक्यांवरून-पुढच्या जन्मास या जन्मांतील अन्त्य कालची वासनाच कारण आहे-एवढें ठरतें. व त्यावरून यावत् जीव सगुणोपासना केली असतां जसा अंतकाळीं पूर्वाभ्यासामुळें सगुणाचा साक्षात्कार होतो. त्याप्रमाणेंच निर्गुणोपासकासह उपासना परिपक्व झालेली असल्यास व कोणतीहि इच्छा राहिलेली नसल्यास मरणसमयीं निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार होतो; असें ठरवितां येतें. ॥१३८॥

-'निर्गुण उपासनेच्या योगानें निर्गुण ब्रह्माचीच प्राप्ति होईल. मुक्ति मिळणार नाहीं !' उत्तर -

नित्यनिर्गुणरूपं तन्नाममात्रेण गीयताम् ।
अर्थतो मोक्ष एवैष संवादिभ्रमवन्मत: ॥३९

अन्वयार्थ - [तत: नित्यनिर्गुणरूपं नाममात्रेण गीयताम्-] तें नित्य निर्गुणरूप आहे असें केवल शब्दानें म्हणा. [अर्थत: तु संवादिभ्रमवत् एष: मोक्ष: एव मत:-] पण अर्थत: संवादी भ्रमाप्रमाणें हा मोक्षच होय, असें मानलेलें आहे.

प्रकाश:- पर ब्रह्म नित्य व निर्गुण आहे, असें जर कोणास म्हणावयाचे असलें तर त्यानें खुशाल म्हणावें. कारण ज्याला आम्ही मोक्ष म्हणतों त्यालाच तुम्हीं निर्गुण ब्रह्म म्हणतां. म्हणजे शब्दांमध्यें जरी भेद असला तरी अर्थ एकच आहे. तस्मात् संवादी भ्रमास जरी भ्रम म्हटलें तरी तों जसा यथार्थ ज्ञानरूपच असतो, त्याप्रमाणें यास जरी निर्गुण ब्रह्म म्हटलें तरी तों मोक्षच होय. ॥१३९॥

-'पण निर्गुण उपासना ही एक मनाची क्रिया असल्यामुळें ती मोक्षाचें साधन आहे, असें म्हणणें विरुद्ध आहे' म्हणून म्हणशील 'तर त्या उपासनेपासून होणारें ज्ञान मोक्षसाधन असल्यामुळें त्यांत कांहीं विरोध नाहीं,' असें सांगतात -

तत्सामर्थ्याज्जायते धीर्मूलाविद्यानिवर्तिका ।
अविमुक्तोपासनेन तारकब्रह्मबुद्धिवत् ॥४०

अन्वयार्थ - [अविमुक्तोपासनेन तारकब्रह्म-बुद्धिवत्-] सगुण ब्रह्माची उपासना केल्यामुळें जसें तारक ब्रह्मांचे ज्ञान होतें, त्याप्रमाणें [तत्सामर्थ्यात् मूलाविद्यानिवर्तिका धी: जायते-] निर्गुणोपासनेच्या सामर्थ्यामुळें मूल अविद्येला निवृत्त करणारी विद्या उत्पन्न होते.

प्रकाश:- लघुजाबालोपनिषदामध्यें बृहस्पतींनीं याज्ञवल्क्यास अविमुक्तोपासना सांगितली आहे व तिच्या योगानें तारक ब्रह्माचें ज्ञान होतें असा तेथेंच उल्लेख आहे. यास्तव या श्रुतिप्रोक्त उपासनेचा व तिच्या फलाचा दृष्टान्त देऊन निर्गुण उपासनेमुळें विद्या प्राप्त होते असें येथें सांगितलेलें आहे. ॥१४०॥

-'निर्गुणोपासनेचें मोक्ष हेंच फल आहे, याविषयीं प्रमाण काय ?' उत्तर --

सोऽकामो निष्काम इति ह्यशरीरो निरिंद्रिय: ।
अभयं हीति मुक्तत्वं तापनीये फलं श्रुतम् ॥४१

अन्वयार्थ - ['स: अकाम: निष्काम:' इति-] "तो अकाम व निष्काम" (बृ. ४-४-६) असें; [तथा हि "अशरीर: निरिंद्रिय:" इति-] त्याप्रमाणें तो शरीररहित, इंद्रियशून्य; असें [तथा हि 'अभयं' इति-] व 'अभयरूप' असें म्हणून [तापनीये मुक्तत्वं फलं श्रुतं अस्ति-] तापनीय श्रुतीमध्यें मुक्तत्व हें निर्गुण उपासनेचें फल सांगितलेलें आहे.

प्रकाश:- येथें 'स: अकाम:' इत्यादि जें वचन घेतलेलें आहे तें बृहदारण्यकांतील व 'अशरीर:' इत्यादि नृसिंहोत्तरतापनीयांतील आहे; असें अच्युतराय म्हणतात. पण, 'स: अकाम:' इत्यादि वचन नृसिंहोत्तरतापनीयांतहि आहे. या दोन्ही वचनांचा सारांश असा:- हा आत्मा सर्व कार्यामध्यें ओतप्रोत भरून राहिलेला आहे; व हाच नृसिंहरूप ब्रह्म आहे; असें जो जाणतो तो मुक्त, निस्तृष्ण, ज्याला सर्व काम प्राप्त झाले आहेत असा व ज्यामुळें जो केवळ आत्मकाम आहे असा होतो. तसाच हा शरीररहित, इंद्रियरहित, प्राणरहित, मनरहित, सच्चिदानंद मात्र व स्वयंप्रकाश आहे, असें जो जाणतो; तसेंच हा ओंकार चिन्मय आहे व सर्व कार्यजातहि चिन्मय आहे, तस्मात् हें सर्व परमेश्वररूपच आहे. आणि हें सर्व अमृत, अभय आहे. हें ब्रह्म अभय आहे. असें जो जाणतो तो निरुपाधिक व ब्रह्म होतो. इत्यादि. ॥१४१॥

-'अहोपण, उपासनेच्या योगानेंच जर मुक्ति होते असें म्हटलें तर 'नान्य: पन्था०' इत्यादि श्रुतीशीं विरोध येतो !' उत्तर --

उपासनस्य सामर्थ्याद्विद्योत्पत्तिर्भवेत्तत: ।
नान्य: पंथा इति ह्येतच्छास्त्रं नैव विरुध्यते ।।४२

अन्वयार्थ - [हि उपासनस्य सामर्थ्यात् विद्योत्पत्ति: भवेत्-] ज्याअर्थीं उपासनेच्या सामर्थ्यामुळें विद्येची उत्पत्ति होते, [तत: 'नान्य: पन्था०' इति एतत् शास्त्रं न विरुध्यते एव-] त्याअर्थीं 'नान्य: पन्था०' इत्यादि शास्त्र तिच्याशीं विरोधच करीत नाहीं.

प्रकाश:- उपासना साक्षात्कारास कारण होते असें यापूर्वीं अनेक वेळां सांगितलेलें आहे. व साक्षात्कारावांचून मुक्तीचें अन्य साधन नाहीं असेंहि श्रुति म्हणत आहे. म्हणजे त्या दोघांचाहि परस्पर भिन्न विषय आहे. व त्यामुळें त्यांच्यामध्यें विरोधच येत नाहीं ॥१४२॥

-'मरणे ब्रह्मलोके वा०' -श्लो. १३६-या पूर्वोक्त अर्थी श्रुतीचें प्रमाण देतात -

निष्कामोपासनान्मुक्तिस्तापनीये समीरिता ।
ब्रह्मलोक: सकामस्य शैब्यप्रश्ने समीरित: ।।४३

अन्वयार्थ - [तापनीये निष्कामोपासनात् मुक्ति: समीरिता-] तापनीयोपनिषदामध्यें ['स: अकाम:' या वाक्यांत] निष्काम उपासनेपासून मुक्ति मिळते असें सांगितलें आहे. [तथा शैब्यप्रश्ने सकामस्य ब्रह्मलोक: समीरित:-] त्याचप्रमाणें शैब्यप्रश्नामध्यें सकाम पुरुषाला ब्रह्मलोक मिळतो असें म्हटलें आहे.

प्रकाश:- प्रश्नोपनिषदामध्यें शैब्याचा प्रश्न असून त्याचें उत्तर देतांना पिप्पलाद मुनींनीं सकाम उपासकास ब्रह्मलोकप्राप्ति होते; असें सांगितलें आहे. ॥१४३॥

-आतां पूर्वोक्त प्रश्नोपनिषदांतील वाक्यच अर्थत: येथें घेतात --

य उपास्ते त्रिमात्रेण ब्रह्मलोके स नीयते ।
स एतस्माज्जीवघनात्परं पुरुषमीक्षते ।।४४

अन्वयार्थ - [य: त्रिमात्रेण उपास्ते स ब्रह्मलोके नीयते-] जो अ, उ व म्, या तीन मात्रांनीं युक्त अशा ओंकाराच्या योगानें परम पुरुषाचें ध्यान करितो त्यास ब्रह्मलोकीं घेऊन जातात [स: एतस्मात् जीवघनात् परं पुरुषं ईक्षते-] व पुढें तो त्या समष्टिरूप हिरण्यगर्भाहून श्रेष्ठ अशा निरुपाधिक पुरुषास पाहतो.

प्रकाश:- जो कामी पुरुष ब्रह्मलोकाच्या इच्छेनें

त्रिमात्र ओंकाराच्या द्वारा परमपुरुषाचें सतत चिंतन करितो तो सामांकडून ब्रह्मलोकीं पोचविला जातो. व तेथें गेल्यावर समष्टिरूप हिरण्यगर्भाहून श्रेष्ठ अशा नित्य शुद्ध व चैतन्यघन आत्म्याचा त्यास साक्षात्कार होतो. ॥१४४॥

-आतां सकाम उपासक ब्रह्मलोकीं जातो, अशाविषयीं शारीरकसूत्रांचें प्रमाण देतात -

अप्रतीकाधिकरणे तत्क्रतुन्याय ईरितः ।
ब्रह्मलोकफलं तस्मात्सकामस्येति वर्णितम् ॥४५

अन्वयार्थ - [अप्रतीकाधिकरणे तत्क्रतुन्यायः ईरितः-] अप्रतीकाधिकरणांत 'तत्क्रतु-' नामक न्याय सांगितलेला आहे. [तस्मात् सकामस्य ब्रह्मलोकफलं इति वर्णितम्-] म्हणून सकाम उपासकाला ब्रह्मलोक हें फल मिळतें; असें वर्णन केलें आहे.

प्रकाशः- "अप्रतीकालंबनान्नयतीति बादरायणः, उभयथा दोषात्तत्क्रतुश्च" (वे. सू. ४-३-६) हें अप्रतीकाधिकरण होय. त्याचा सारांश- प्रतीकोपासकांस सोडून इतर सर्व विकारोपासकांस अमानव पुरुष ब्रह्मलोकीं पोंचवितो. असें बादरायण मुनि मानतात. व त्यामुळें पूर्वोक्त 'अनियमः सर्वासाम्' या सिद्धांताशीं विरोध येत नाहीं. कारण सर्व शब्दाचा अर्थ प्रतीकोपासकांहून अन्य उपासक असा करितां येतो. शिवाय ज्याचा जो संकल्प असतो त्यास त्याचीच प्राप्ति होते - असा आहे. म्हणजे या अधिकरणांत संकल्पाप्रमाणें प्राण्यास फल मिळतें असें ठरविलें आहे, व त्यास अनुसरूनच येथें कामनेप्रमाणें ब्रह्मलोक इत्यादि फल मिळतें असें म्हटलें आहे. ॥१४५॥

-'तर मग सकाम उपासकाला तत्त्वज्ञान कसें होतें ?' उत्तर --

निर्गुणोपास्तिसामर्थ्यात्तत्र तत्त्वमवेक्षते ।
पुनरावर्तते नायं कल्पान्ते च विमुच्यते ॥४६

अन्वयार्थ - [तत्र निर्गुणोपास्तिसामर्थ्यात् तत्त्वं अवेक्षते-] तेथें निर्गुण उपासनेच्या सामर्थ्यामुळें त्यास तत्त्वसाक्षात्कार होतो [च अयं पुनः न आवर्तते-] तदनंतर हा पुनरपि जन्मास येत नाहीं, [च कल्पान्ते विमुच्यते-] आणि कल्पाच्या शेवटीं मुक्त होतो.

प्रकाशः- निर्गुणोपासनेचें सामर्थ्यच कांहीं विचित्र असल्यामुळें ब्रह्मलोकीं गेल्यावरहि उपासकास तत्त्वसाक्षात्कार होतो; ज्ञान झाल्यामुळें तो पुनरपि जन्ममरण परंपरेंत पडत नाहीं; व ब्रह्मलोकाच्या लयाबरोबर त्याचाहि नित्य शुद्ध ब्रह्मांत लय होतो; असें याचें तात्पर्य समजावें. 'इमं मानवं आवर्तं नावर्तन्ते' 'न स पुनरावर्तते' 'ब्रह्मणा सह ते सर्वे०' इत्यादि पहा. ॥१४६॥

-प्रणवोपासनेचें प्रकरण चाललेलें असल्यामुळें तिचें द्विविधत्व सांगतात -

प्रणवोपास्तयः प्रायो निर्गुणा एव वेदगाः ।
क्वचित्सगुणताप्युक्ता प्रणवोपासनस्य हि ॥४७

अन्वयार्थ - [वेदगाः प्रणवोपास्तयः प्रायः निर्गुणाः एव-] वेदोक्त प्रणवोपासना बहुतकरून निर्गुणच आहेत. [हि प्रणवोपासनस्य सगुणता अपि क्वचित् उक्ता-] पण प्रणवोपासनेचें सगुणत्वहि क्वचित् सांगितलेले आहे.

प्रकाशः- वेदामध्यें बहुतकरून प्रणवोपासना निर्गुणच आढळते. पण हा अबाधित नियम आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण कोठें कोठें प्रणवाची सगुण उपासनाहि आढळते. ॥१४७॥

-तिच्या द्विविधत्वाविषयीं प्रमाण -

परापरब्रह्मरूप ओंकार उपवर्णितः ।
पिप्पलादेन मुनिना सत्यकामाय पृच्छते ॥४८

अन्वयार्थ - [पिप्पलादेन मुनिना पृच्छते सत्यकामाय-] पिप्पलादमुनींनीं प्रश्न करणाऱ्या

सत्यकाम शैब्यास [परापरब्रह्मरूप: ओंकार: उपवर्णित:-] पर व अपर ब्रह्मरूप ओंकार सांगितला आहे.

प्रकाश:- प्रश्नोपनिषदाच्या पांचव्या प्रश्नांत प्रस्तुत प्रकरण आहे. शिबिपुत्र सत्यकामानें आपल्या पिप्पलाद नामक पूज्य गुरूंस ओंकाराच्या उपासनेविषयीं प्रश्न केलेला असून गुरूंनीं 'हे सत्यकामा, जो ओंकार तेंच हें पर व अपर ब्रह्म आहे.' (प्र. ५-२) असें उत्तर दिलें आहे. ॥१४८॥

-कठवल्लीमध्यें यमानेंहि 'एतदालंबनं ज्ञात्वा' इत्यादि वाक्यानें उपासनेचें द्विविधत्व सांगितलें आहे, असें सांगतात -

एतदालंबनं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ।
इति प्रोक्तं यमेनापि पृच्छते नचिकेतसे ॥४९

अन्वयार्थ - [पृच्छते नचिकेतसे यमेन अपि 'एतदालंबनं ज्ञात्वा यो यत् इच्छति तस्य तत्' इति प्रोक्तम्-] प्रश्न करणाऱ्या नचिकेताला यमानेंहि 'या आलंबनास जाणून जो ज्याची इच्छा करितो तें त्यास मिळतें' असें सांगितलें आहे.

प्रकाश:- कठोपनिषदाच्या पहिल्या अध्यायाच्या दुसऱ्या वल्लीचा सोळावा श्लोक "हें अक्षरच अपर व पर ब्रह्म आहे. या अक्षराचीच ब्रह्मभावनेनें उपासना केली असतां ज्याला ज्याची इच्छा असते त्यास त्याची प्राप्ति होते." अशा अर्थाचा आहे व त्यावरून प्रणवोपासना दोन प्रकारची आहे असें ठरतें. ॥१४९॥

- सारांश-

इह वा मरणे वाऽस्य ब्रह्मलोकेऽथ वा भवेत् ।
ब्रह्मसाक्षात्कृति: सम्यगुपासीनस्य निर्गुणम् ॥५०

अन्वयार्थ - [सम्यक् निर्गुणं उपासीनस्य अस्य ब्रह्मसाक्षात्कृति:-] उत्तम प्रकारें निर्गुण उपासना करणाऱ्या ह्या पुरुषाला ब्रह्मसाक्षात्कार [इह वा मरणे वा अथवा ब्रह्मलोके भवेत्-] या जन्मीं, किंवा मरणसमयीं, किंवा ब्रह्मलोकीं होतो.

प्रकाश:- निर्गुण उपासना आत्मसाक्षात्काराचें कारण आहे व प्रतिबंधाचा क्षय होतांच तो (आत्मसाक्षात्कार) होतो. अर्थात् तो केव्हां व कोठें होईल याचा नियम नाहीं. एकशे छत्तीसाव्या श्लोकांत 'येथें मरणसमयीं, पुढच्या जन्मीं किंवा ब्रह्मलोकीं तत्त्वज्ञान होतें' असें जें म्हटलें होतें. त्याचाच एवढा वेळ विचार करून येथें उपसंहार केला आहे. ॥१५०॥

-'विचारानें तत्त्वज्ञान संपादन करण्यास असमर्थ असलेल्या मुमुक्षूचा निर्गुण ब्रह्मध्यानांतच अधिकार आहे' असा हा अर्थ आत्मगीतेंत सांगितला आहे, असें सांगतात-

अर्थोऽयमात्मगीतायामपि स्पष्टमुदीरित: ।
विचाराक्षम आत्मानमुपासीतेति संततम् ॥५१

अन्वयार्थ - [विचाराक्षम: संततं आत्मानं उपासीत-] विचार करण्यास असमर्थ असलेल्या पुरुषानें सतत निर्गुण ब्रह्माचें ध्यान करावें [इति अयं अर्थ: आत्मगीतायां अपि स्पष्टं उदीरित: अस्ति-] असा हा अर्थ आत्मगीतेमध्येंहि स्पष्टपणें सांगितला आहे.

प्रकाश:- आत्मगीतेंतील प्रस्तुत प्रसंगाच्या उपयोगीं अशीं तीन वाक्यें यापुढेंच घेतलेली आहेत. म्हणून त्यांचा येथें विस्तार करीत नाहीं. ॥१५१॥

-आत्मगीतेंतील तीन वाक्येंच घेतात -

साक्षात्कर्तुमशक्तोऽपि चिंतयेन्मामशंकित: ।
कालेनानुभवारूढो भवेयं फलितो ध्रुवम् ॥५२

अन्वयार्थ - [साक्षात्कर्तुं अशक्त: अपि मां अशंकित: चिंतयेत्-] साक्षात् जाणण्यास असमर्थ असलेल्या पुरुषानेंहि माझें नि:शंकपणें चिंतन करावें. [कालेन अहं अनुभवारूढ: च फलित: ध्रुवं भवेयम्-] योग्य समय आला असतां मी अनुभवारूढ व फलरूप अवश्य होईन.

-ध्यान सम्यग्ज्ञानाचा उपाय आहे, याविषयीं दृष्टान्त-

यथाऽगाधनिधेर्लब्धौ नोपाय: खननं विना ।

मल्लाभेऽपि तथा स्वात्मचिंतां मुक्त्वा न चापर: ॥५३

अन्वयार्थ - [यथा अगाधनिधे: लब्धौ खननं विना उपाय: न अस्ति-] ज्याप्रमाणें फार खोल असलेल्या निधानाची प्राप्ति करून घेण्यास खणण्यावांचून उपाय नसतो. - या दृष्टान्ताचीच दार्ष्टान्तिकांत योजना- [तथा मल्लाभे अपि स्वात्मचिंतां मुक्त्वा अपर: उपाय: न वर्तते-] त्याप्रमाणें माझ्या लाभाकरितांहि स्वरूपभूत स्वात्म्याचें चिंतन सोडून दुसरा उपाय नाहीं.

-व्यतिरेकमुखानें सांगितलेला अर्थच अन्वयमुखानें सांगतात -

देहोपलमपाकृत्य बुद्धिकुद्दालकात्पुन: ।
खात्वा मनोभुवं भूयो गृह्णीयान्मां निधिं पुमान् ॥५४

अन्वयार्थ - [पुमान् देहोपलं अपाकृत्य -] पुरुषानें देहरूप मोठ्या शिलेला दूर करून [पुन: बुद्धिकुद्दालकात् मनोभुवं खात्वा-] पुनरपि विवेक रूप कुदळीनें-मनोरूप भूमि खणून [मां निधिं गृह्णीयात्-] मज निधीचें ग्रहण करावें.

प्रकाश:- आत्मगीतेंतील या तीन श्लोकांत- ज्याला विचार करण्याचें सामर्थ्य नसेल त्यानें ब्रह्माचें सतत चिंतन करावें. म्हणजे विचाराचें फल जो आत्मसाक्षात्कार तो योग्य समयीं सहज होतो. ज्याप्रमाणें जमिनींत खोल पुरलेली संपत्ति जमीन खोदूनच वर काढावी लागते त्याप्रमाणें आत्मचिंतनरूप खननानेंच आत्म्याची प्राप्ति करून घ्यावी लागते. जेथें भांडार पुरलेलें असतें त्याच्यावर एक मोठी शिळा असते तसाच हा देह आत्मसाक्षात्कारावरील अति जड झांकण आहे. यास्तव भांडारावरील दगडाप्रमाणें या देहाचा निरास अगोदर करावा. म्हणजे प्रथम देहाभिमान सोडावा. तद्नंतर विवेकरूप कुदळीनें संकल्पात्मक मनास खणावें म्हणजे त्यांची कल्पनाशक्ति (विक्षेप) नाहींशी करून टाकावी. आणि असें झालें असतां जमीन खोदल्यावर जसें भांडार सांपडतें त्याप्रमाणें सर्वेश्वर हातीं लागतो. तात्पर्य, सतत आत्मानुसंधान केल्यास आत्मज्ञान झाल्यावांचून रहात नाहीं. ॥५२, ५३, १५४॥

-ज्ञानाला असमर्थ असलेल्या पुरुषाचा ध्यानांत अधिकार आहे, याविषयीं आणखी एका वाक्याचा उल्लेख करितात -

अनुभूतेरभावेऽपि ब्रह्मास्मीत्येव चिंत्यताम् ।
अप्यसत्प्राप्यते ध्यानान्नित्याप्तं ब्रह्म किं पुन: ॥५५

अन्वयार्थ - [अनुभूते: अभावे अपि 'अहं ब्रह्म अस्मि' इति एव चिन्त्यताम्-] अनुभवाचा जरी अभाव असला तरी 'मी ब्रह्म आहें' असेंच चिंतन करावें [ध्यानात् असत् अपि प्राप्यते किं पुन: नित्याप्तं ब्रह्म-] कारण ध्यानाच्या योगानें असत् वस्तुहि जर मिळविली जाते तर मग नित्य प्राप्त ब्रह्माविषयीं काय सांगावें ?

प्रकाश:- आत्म्याचा अनुभव येत नाहीं म्हणून आत्मचिंतनहि सोडणें चांगलें नव्हे. कारण त्याचा कधीं तरी उपयोग झाल्यावांचून रहात नाहीं असा शास्त्रनियम आहे. शिवाय ध्यानामुळें पूर्वी नसलेलें देवत्वहि जर प्राप्त होतें तर ध्यान करणाऱ्या पुरुषाच्या आत्मरूप व सर्वदा सर्वत्र असणारें ब्रह्म ध्यानामुळें प्राप्त होईल हें काय सांगावें ? देवाचें चिंतन केल्यास साधक देव होतो; असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे; पण ब्रह्म आत्मरूप असल्यामुळें साधकास जसें तें ध्यानापूर्वी व ध्यानसमयींहि प्राप्त असतें तें देवत्व नसतें. म्हणूनच त्यास 'असत्' व ब्रह्मास 'नित्य आप्त' असें या श्लोकांत म्हटलें आहे. ॥१५५॥

-ब्रह्मध्यानाचें फल दृष्ट-प्रत्यक्ष आहे, त्यामुळेंहि ध्यान अवश्य करावें, असें आतां सांगतात --

अनात्मबुद्धिशैथिल्यं फलं ध्यानाद्दिने दिने ।
पश्यन्नपि न चेद्ध्यायेत्कोऽपरोऽस्मात्पशुर्वद ॥५६

अन्वयार्थ - [ध्यानात् दिने दिने अनात्मबुद्धिशैथिल्यं फलं पश्यन् अपि पुरुष: न ध्यायेत् चेत्-] ध्यानामुळें प्रतिदिनीं मिळणारें अनात्मबुद्धिशैथिल्यरूप फल पहात असूनहि जर पुरुष ध्यान न करील तर [अस्मात् अपर: क: पशु: वद-] त्याच्याहून दुसरा पशु कोण, सांग पाहूं.

प्रकाश:- ध्यानाचें फल दृष्ट आहे. जसें जसें ध्यान दृढ होत जातें तसा तसा देहादिकांवरील आत्माभिमान नाहींसा होत जातो. म्हणजे देह आत्मा नव्हे; बुद्धीहि जड आहे; इत्यादि शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टींचा प्रत्यय येऊं लागतो. व असें प्रतिदिनीं अनुभवास येत असतांहि जो नराकृति ध्यान करीत नाहीं व बाह्यविषया मध्येंच निमग्न होऊन राहतो त्यांस मनुष्य तरी कसें म्हणावें ? हा मोठाच प्रश्न आहे. ॥१५६॥

-आतां येथवर उपपादन केलेला अर्थच थोडक्यांत सांगतात -

देहाभिमानं विध्वस्य ध्यानादात्मानमद्वयम् ।
पश्यन्मर्त्योऽमृतो भूत्वा ह्यत्र ब्रह्म समश्नुते ॥५७

अन्वयार्थ - [ध्यानात् देहाभिमानं विध्वस्य-] ध्यानाच्या योगानें देहाभिमानाचा विध्वंस करून [अद्वयं आत्मानं पश्यन् मर्त्य: अमृत: भूत्वा-] अद्वय आत्म्याला पहाणारा मर्त्य अमृत होऊन [हि अत्र ब्रह्म समश्नुते-] येथेंच ब्रह्माचा अनुभव घेतो.

प्रकाश:- ध्यानामुळें सर्व अनर्थांस कारण होणारा अभिमान नष्ट होतो. त्याच्या नाशानंतर मनामध्यें विक्षेपाचें कारणच न राहिल्यामुळें साधकास आत्मसाक्षात्कार होतो. 'जो ब्रह्मास जाणतो तो ब्रह्म होतो' अशी श्रुति असल्यामुळें आत्मसाक्षात्काराच्या योगानें मनुष्यधर्मवान् साधक अमर होतो; व या शरीरात असतांनाच जीवन्मुक्तीचा अनुभव घेतो. सारांश, ध्यान हें परम फलदायक आहे. ॥१५७॥

-आतां ध्यानदीपाच्या अनुसंधानाचें फल सांगतात -

ध्यानदीपमिमं सम्यक्परामृशति यो नर: ।
मुक्तसंशय एवायं ध्यायति ब्रह्म संततम् ॥५८

अन्वयार्थ - [य: नर: इमं ध्यानदीपं सम्यक् परामृशति-] जो पुरुष या ध्यानदीपाचा उत्तम प्रकारें विचार करितो [अयं मुक्तसंशय: एव संततं ब्रह्म ध्यायति-] तो संशयशून्य होऊन सतत ब्रह्माचें ध्यान करूं लागतो.

प्रकाश:- ह्या ध्यानदीपाच्या विषयाचें ग्रंथकारांनीं इतक्या उत्तम प्रकारें वर्णन केलें आहे कीं जो याचें दोन वेळ लक्ष्यपूर्वक चिंतन करील त्याची ध्यानाविषयीं श्रद्धा अवश्य वाढेल व तो खचित ब्रह्मचिंतनांत निमग्न होईल. त्याला ध्यानाविषयीं कोणत्याहि प्रकारचा संशय होणार नाहीं. सारांश, अति अभागी पुरुषावांचून दुसऱ्या कोणीहि जरी या प्रकरणांचे निरभिमान मनानें चिंतन केलें तरी त्याच्या मनांत आत्मचिंतनाविषयीं आदरभाव उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं. ज्ञानप्रतिबंधांचा क्षय व्हावा अशी ज्याची इच्छा असेल त्यानें श्रुतिस्मृतिप्रोक्त ध्यानाचे जरूर अनुष्ठान करावें. चित्ताच्या नाशाचे दोन उपाय आहेत. एक 'योग' व दुसरा 'ज्ञान.' योग म्हणजे चित्तवृत्तिनिरोध व ज्ञान म्हणजे बरोबर समजूत. पण सर्वच साधकांस हे उपाय साध्य होत नाहींत. यास्तव ज्यास जो साध्य होण्यासारखा असेल त्यानें त्याचा अंगीकार करावा. पण स्वत:चा उद्धार करून घेतल्यावांचून राहूं नये. हें या सर्व प्रकरणाचें प्रमेय सहा तात्पर्य बोधक लिंगावरूनहि सिद्ध होत आहे. पण विस्तारभयास्तव त्याचा येथें अक्षरश: उल्लेख करीत नाहीं. ॥१५८॥

इति पञ्चदश्यां ध्यानदीप: ॥९